म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वी. वा.
दा. क्र. ९५१३२

IRBK-0115132

# किती हसाल!

वा. क्र.

लेखक

प्रा. वि. मा. दी. पटवर्धन, एम्. एस्सी.

१५९३२
दा. क्र.

म. ग्रं. सं. आणि वाचनालय शाखा
वा. क्र. १५९३२

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

मूल्य एक रुपया

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

प्रथमावृत्ति : १९४४
पुनर्मुद्रण : १९४९

मुद्रक : बा. ग. ढवळे, कर्नाटक मुद्रणालय, १०३, शींव (पूर्व)
प्रकाशक : केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ-सदन, गिरगांव, मुं

# कानगोष्टी —

ग्रं. क्र. 95932

बालमित्रांनो,

'हास्यकळ्यां' नंतर माझी तुम्हांला ही दुसरी भेट. हास्यकळ्यांप्रमाणें याही पुस्तकांत तुम्हांला भरपूर हसविणाऱ्या गोष्टी आढळतील. मात्र त्या संख्येनें फार नाहींत. सातच आहेत. हल्लीं माणसांना पोटभर जेवतांही येत नाहीं. मग पोटभर हसायला तरी कुठून मिळेल ? तरीपण निराश होऊं नका. प्रत्येक गोष्टींतलें थोडेंसें 'सार' विनोदाचा भरपूर 'मसाला' घालून खमंग आणि रुचकर केलें आहे. त्याचा यथेच्छ आस्वाद घ्या.

साखरेचा तरी हल्लीं सांठा कुठें करतां येतो ? हप्त्यानेंच ती आणावी लागते ना ? तसेंच मनरंजनाचें. थोडा धीर धराल तर त्याचाही आणखी एक हप्ता तुमच्या पदरांत पडेल. म्हणच आहे 'धीर से बढे तकदीर !'

95932

तुमचा

वि. मा. दी. पटवर्धन

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

प्रथमावृत्ति : १९४४
पुनर्मुद्रण : १९४९

मुद्रक : बा. ग. ढवळे, कर्नाटक मुद्रणालय, १०३, शींव (पूर्व)
प्रकाशक : केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ-सदन, गिरगांव,

# कानगोष्टी

दा. क्र. 94932

बालमित्रांनो,

'हास्यकळ्यां' नंतर माझी तुम्हांला ही दुसरी भेट. हास्यकळ्यांप्रमाणें याही पुस्तकांत तुम्हांला भरपूर हसविणाऱ्या गोष्टी आढळतील. मात्र त्या संख्येनें फार नाहींत. सातच आहेत. हल्लीं माणसांना पोटभर जेवतांही येत नाहीं. मग पोटभर हसायला तरी कुठून मिळेल ? तरीपण निराश होऊं नका. प्रत्येक गोष्टींतलें थोडेंसें 'सार' विनोदाचा भरपूर 'मसाला' घालून खमंग आणि रुचकर केलें आहे. त्याचा यथेच्छ आस्वाद घ्या.

साखरेचा तरी हल्लीं सांठा कुठें करतां येतो ? हप्त्यानेंच ती आणावी लागते ना ? तसेंच मनरंजनाचें. थोडा धीर धराल तर त्याचाही आणखी एक हप्ता तुमच्या पदरांत पडेल. म्हणच आहे 'धीर से बढे तकदीर !'

94932

तुमचा

वि. मा. दी. पटवर्धन

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | शाळेंतील जुनी आठवण ... ... | १ |
| २ | बायकांना धोरणच कमी ... ... | १७ |
| ३ | डसला विंचू नि घरभर नाचूं ... | ३५ |
| ४ | अनारचा वाढदिवस ... ... | ४८ |
| ५ | गाडींत भेटलेला कुटुंबवत्सल गृहस्थ ... | ६० |
| ६ | मामा विरुद्ध आम्ही ... ... | ७३ |
| ७ | मांडवीची खांडवी ... | ८६ |


★




**मुलांनो,** तुम्ही शाळेंत जातां. शाळा म्हणजे आपलं एक लहानसं जगच. त्यांत आपल्या आवडीचे विद्यार्थी असतात. त्यांना आपण पुढारी समजतों. कांहीं आपल्याला आवडत नाहींत. त्यांची फजिती झाली, कीं आपणांस मौज वाटते. मास्तर म्हणजे आपल्या चिमुकल्या जगांतले फौजदार-जमादारच जसे कांहीं. बहुतेक सगळ्यांनाच आपण वचकतों; पण त्यांतल्या कांहींवर आपला लोभ असतो, कांहींवर राग असतो. अशा आपल्या या चिमुकल्या जगांत केव्हां केव्हां अशा गमती होतात, कीं त्यांची आठवण आपल्याला जन्मभर राहाते. अशा गमती सविस्तर टिपून ठेवल्यात, तर पुढं तुम्ही मोठे झाल्यावर त्रासलेल्या मनाची करमणूक करायला आणि तुमच्या बालमित्रांचीं मनं रिझवायला त्यांचा तुम्हांला फार उपयोग होईल. माझ्याजवळ असं टिपण आहे. त्यांतल्या कांहीं निवडक गमती येथें देतों.

* १ *

**मी** हायस्कूलमध्यें पहिलींत गेलों, तेव्हां आमच्या वर्गावर काळे नांवाचे एक मास्तर होते. अगोदरच आमची शाळा एका सार्वजनिक सोसायटीनें चालविलेली आणि त्यांतून काळे मास्तरांनीं बा. ए. चा उंबरा ओलांडलेला नसल्यामुळं त्यांना पगार कमी. काळे मास्तर नेहमीं त्रासलेले असायचे. रंगानं नांवाप्रमाणंच काळे अन् अंगानं खूप

लठ्ठ. उग्र चेहरा, काळ्या वांग्यासारखं मोठं थोरलं नाक अन् त्याच्याखालीं कुळंगी कुत्र्याच्या शेंपटीसारख्या चवरीदार मिशा. कपाळावर तिबोटी पांढरं गंध, कानांत भिकबाळी अन् डोक्यावर उपड्या टमरेलासारखी दिसणारी टोपी. काळे म्हणजे कर्दनकाळ वाटायचे आम्हांला. मुलांना असे झोडपून काढीत, कीं विचारतां सोय नाहीं.

"अभ्यास करीत नाहीं काय, हरामखोर? पण बच्चमजी, हा लंबोदर काळे तुमच्या सगळ्यांच्या बारशाला जेवलाय्, समजलांत!" आपल्या मिशांच्या हिरकुटासारख्या ताठ केंसांना उगीचच पीळ घालण्याचा प्रयत्न करीत ते ओरडायचे, "कणीक मऊ करीन एकेकाची, हां!"

त्यांच्या दणक्यांनीं आमच्या कणकेच्या पोळ्या होत होत एक वर्ष पुरं झालं. आम्ही सगळे दुसरींत गेलों. तुम्ही म्हणाल, 'असं कसं होईल? कुणीच नापास कसं झालं नाहीं?' कसे होणार? आम्हीं अभ्यास केला तो परीक्षेच्या धास्तीनं केला नव्हता; काळे मास्तरांच्या भयानं. या राक्षसाच्या तडाख्यांतून आपण केव्हां सुटतो हीच चिंता प्रत्येकाला लागलेली. त्यामुळं अभ्यासाचा प्रत्येकानं नुसता झक्कु ताड्या लावला. निकाल कळला त्या दिवशीं आमचीं तोंडं आनंदानं प्रफुल्लित झालीं. "सुटलों बुवा एकदांचा!" हा एकच उद्गार प्रत्येकाच्या तोंडावर स्पष्टपणें उमटलेला दिसत होता.

पण हाय रे दुर्दैवा! वर्ग बदलल्यावर आमचीं तोंडं चिमण्यांसारखी झालीं. आम्हांला काय माहीत, कीं आमच्याबरोबर काळे-गुरुजींचंही नशीब उघडलं होतं! त्यांना बढती मिळाली आणि ते दुसऱ्या यत्तेंत पुन्हां आमचे शिक्षक झाले. पुन्हां एक वर्षभर आम्हीं त्यांच्या हातच्या छड्या खाल्ल्या.

आश्चर्य वाटेल तुम्हांला, पण हें असं पांचवीपर्यंत चाललं. काळ्यांच्या हातचे रट्टे नि छड्या खाऊन आम्ही अगदीं मेटाकुटीला आलों.

आपल्या पाठीशीं लागलेली ही साडेसाती संपणार तरी केव्हां, असं जो तो म्हणूं लागला.

परमेश्वरालाच शेवटीं आमची दया आली म्हणायची. एक दिवस बातमी उठली, काळे लौकरच सेवानिवृत्त होणार.

"देवानं त्यांना पांच सहा वर्षं अगोदर जन्मास घातलं असतं तर आमच्या कपाळींचा वनवास अजीबात टळला नसता का?" मी तोंडचा हिशेब करून बोललों.

"त्यांच्या मुलाला म्हणे बडोद्याला कां कुठंशी नोकरी लागलीय्, तिकडे जाऊन राहाणार आहेत ते." सोनपाटकी म्हणाला.

"कुठं कां जाईनात" बाकीचीं मुलं म्हणालीं, "गेले म्हणजे एक पीडा गेली."

"अरे ए, पण कसं केलं तरी आपले क्लासटीचर आहेत ते. आपण त्यांच्याकरतां निरोपसमारंभ करायला हवा." मीं सुचविलं. उत्सव-समारंभांची मला जात्याच हौस!

"हॅट," चिंतू खेंकसला, "या मारक्या म्हसोबाला कसला निरोप न् करूच समारंभ?"

चिंतू आमच्या वर्गाचा मॉनिटर होता.

"आतां थोडेच येणार आहेत ते आपल्याला मारायला?" मी त्याची समजूत काढूं लागलों.

"तुला हवं असेल पुढं पुढं करून नाचायला, दुसरं काय?" सोनपाटकीनं माझं बिंग बाहेर काढलं.

"तसं नव्हे. आपली रीत आहे ती सांगितली मीं. परवां सहावीचे जांभळे मास्तर गेले तेव्हां नाहीं का केली सहावीच्या मुलांनीं पानसुपारी?"

उत्सव, पानसुपारी, कोणत्या मुलाला मनापासून नको असतात? मधूनं मला हळूच पाठिंबा दिला आणि त्याच्यामागून एकेकजण सगळेच म्हणायला लागले,

"देखल्या देवा दंडवत करायला हें हवंच. जाऊं द्या, करून टाका हा समारंभ."

दोन तीन दिवसांनीं चिंतू माझ्याकडे आला नि म्हणाला, "हें बघ विन्या, आपण संध्याकाळीं ग्राउंडवर बसून आपलीं भाषणं तयार करूं. ए वन् व्हायला हवींत. नाहीं का?"

"भाषणं?" मी चकित होऊन म्हणालों, "कशीबशी पानसुपारी करायची, तीं आणखी भाषणं कशाला?"

"नुसती पानसुपारी बरी दिसत नाहीं. एकदां करायचं म्हटलं म्हणजे रीतीप्रमाणं सगळं केलं पाहिजे. माझं तत्त्व असं आहे."

माझंही तसंच होतं; पण उघड दाखवीत नव्हतों इतकंच!

"बरं, येतों मी संध्याकाळीं ग्राउंडवर." मी खूष होऊन म्हणालों.

संध्याकाळीं एकत्र बसून आम्हीं आमचीं भाषणं लिहून काढलीं. निरोप द्यायचा म्हणजे मास्तरांचा गौरव करायला पाहिजे, त्यांचेविषयींचा आपला आदर व्यक्त करायला पाहिजे हें लक्षांत घेऊन काळ्यांना गोरे करण्याची आमची चढाओढ सुरू झाली. शब्दकोशांतले सारे सद्गुणवाचक शब्द आम्ही आठवूं लागलों.

"शिस्तीचे फार भोक्ते." चिंतू म्हणाला. सकाळच्या छड्यांचे वळ त्याच्या हातावर अजून स्पष्ट दिसत होते.

"आणि स्वच्छतेचेही पण." शेंबडानं बरबटलेलं न् माशांनीं गजबजलेलं काळ्यांचं उपरणं माझ्या डोळ्यांसमोर दिसत होतं.

"गोड शब्दांनीं मुलांचीं मनं वळवितात—" चिंतू असं म्हणतांना काळ्यांच्या तोंडाची सरबत्ती त्याच्या कानांवर आदळत होती.

"चिडणं, संतापणं हें कसं तें अगदीं माहीत नाहीं त्यांना." सकाळीं त्यांनीं मला बकोटल्यामुळं माझा खांदा थोडा दुखत होता तो चेपीत मी म्हणालों.

"त्यांनीं शिकवलेला धडा जन्मांत विसरायचा नाहीं—" चिंतू आपल्या पडलेल्या दांतांतून जिभेचं टोंक बाहेर काढून लिहूं लागला.



काळ्यांना गोरे करण्याची आमची चढाओढ सुरू झाली.

याप्रमाणं भाषणं तयार झाल्यावर आम्हीं तीं एकमेकांना म्हणून दाखविलीं.

पानसुपारीच्या दिवशीं आम्हीं जातीनं खपून शाळेच्या चौकांत पताका, तोरणं लावलीं. झाडांच्या कुंड्या आणून ठेवल्या. हेडमास्तरांच्या घरचा जाजम डोक्यावर वाहून आणला आणि खुर्च्या, टेबलं, हार, तुरे—सगळा थाट उडवून दिला. मास्तरदेखील आमच्या मेहनतीचं नि उत्साहाचं कौतुक करीत होते.

समारंभाला स्वागतपद्यानं सुरुवात झाली. नंतर हेडमास्तर बोलायला उठले. त्यांनीं प्रसंगाला साजेसं काळ्यांचं बरंच गुणवर्णन आपल्या भाषणांत केलं. काळेगुरुजी शाळा सोडून जात असल्यामुळं शाळेचं कसं न भरून येण्यासारखं नुकसान होत आहे, हें कातर आवाजांत स्पष्ट केलं. काळ्यांचा स्वभाव जितका कांटेकोर अन् कडक तितकीच त्यांची कळकळही अफाट, असा त्यांनीं आपल्या शिक्षकबंधूंना निर्वाळा दिला. पुढं गळा दाटून आल्यामुळं त्यांच्यानं बोलवेना. तेव्हां चौथी 'ब'चे टेंबे मास्तर उठले आणि त्यांनीं राहिलेले सर्व टेंभे काळ्यांसमोर पाजळून घेतले. काळ्यांच्या जाण्यामुळं टेंब्यांना बढती मिळणार होती, अर्थात् त्यांच्या काळेप्रेमाला भरती आल्यास नवल नव्हतं.

विद्यार्थ्यांतर्फे चिंतू नि मी बोलायला पुढं झालों. आमच्या भाषणांच्या वेळीं पोरांनीं टाळ्या पिटून अन् हंशा पिकवून एवढा गलका कां केला कुणास ठाऊक? बोलतांना चिंतू वाऱ्यानं हालणाऱ्या नारळीच्या झाडासारखा डोलत होता, तर मी खांबासारखा निश्चल उभा होतों. विजार खालीं घसरूं नये म्हणून मीं नेपोलियन बोनापार्टचा पवित्रा घेतला होता आणि कोटाच्या आंत हात घालून ती धरून ठेवली होती. आवाज तर मी अगदीं जज्जासारखा गंभीर ठेवला होता. माझं भाषण मी फारसं विसरलोंही नाहीं, तरीदेखील हीं कारटीं अशीं कां खिदळतात हें मला समजेना. कसेबसे आवंढे गिळीत, घाम पुशीत मीं आपलं भाषण संपविलं.

लगेच स्काउटचा बँड सुरू झाला, हारतुरे घातले; फोटो घेतला कीं नाहीं तें आतां आठवत नाहीं, पण पानसुपारी, अत्तर–गुलाब अगदीं दरबारी पद्धतीनं वांटले. शेवटीं टाळ्यांच्या गजरांत काळे मास्तर बोलायला उठले. त्यांचे डोळे पाण्यानें डबडबलेले असले तरी आम्हांला मध्यान्हींच्या सूर्यासारखेच वाटले; नव्हे, आमच्याकडे पाहणारा त्यांचा एक डोळा सूर्यासारखा धगधगीत न् लाल दिसला आणि बाकीच्या लोकांकडे पाहणारा दुसरा डोळा चंद्रासारखा प्रशांत दिसत होता म्हणतात. कांहीं असलं तरी आम्ही घाबरलों न् गर्दींत कुठंतरी मागच्या बांकावर जाऊन बसलों.

त्यांनीं आपल्या सहशिक्षकांचे नि आमचे आभार मानले व शेवटीं सद्गदित होऊन ते म्हणाले,

" मित्रहो, माझी आजपर्यंत कल्पना होती, कीं मी इथं जें जीव तोडून काम करतों तें पुष्कळांना आवडत नाहीं. माझा स्वभाव तापट, त्यामुळं माझे विद्यार्थी माझ्यावर नाराज. उतारवयामुळं मी जरासा फटकळ झाल्यामुळं माझे शिक्षकबंधूही माझ्यापासून चार हात दूर राहात. दिवसभर घसा कोरडा करूनही मला शिकवतां येत नाहीं असं वरिष्ठांनीं म्हणावं, यामुळं मी वैतागलों होतों. आज आपण सर्वांनीं इथं जमून माझा जो योग्यतेबाहेर गौरव केलात त्यावरून मला आढळून आलं, कीं मी चुकत होतों. आपल्या सर्वांना माझं बरं वाईट कार्य आवडलेलं आहे. माझ्या दोन विद्यार्थ्यांनीं माझी आतां जी स्तुति केली ती जरी प्रमाणाबाहेर असली, तरी तिच्यावरून माझ्या विद्यार्थ्यांचं मजवर असलेलं प्रेम व्यक्त झालं. यामुळं मला आतां इतका उत्साह वाटत आहे, कीं इतक्यांतच सेवानिवृत्त न होतां माझ्या शाळेची आणखी पांच वर्षं सेवा करावी, असं मीं ठरविलं आहे. आपण माझी सेवा अशीच गोड करून घ्यावी."

सगळा चौक टाळ्यांनीं दणाणून गेला, पण आमचे हात कांहीं केल्या जागचे हालेनात. भकास चेहेरे करून आम्ही 'पांचवी'चीं मुलं

व्यासपीठाकडे पाहात होतों. कानांनीं ऐकलं त्यावर आमचा विश्वासही बसेना. करायला गेलों काय न् झालं काय ? माझं मस्तक गरगरूं लागलं आणि चिंतू ? चिंतू—" चांगला भोंवला विन्या तुझा निरोप-समारंभ. खा मार लेको आतां मॅट्रिकपर्यंत." असं ओरडला न् एकदम बेशुद्ध होऊन पडला !

माझ्या बालमित्रांनो, अशा रीतीनं आमचे परमपूज्य काळे गुरुजी शाळेंत राहिले आणि आम्हीं सातवीपर्यंत त्यांच्या हातचा भरपूर मार खाल्ला ! " अती तेथें माती, " म्हणतात, तशांतलाच हा प्रकार आमच्याकडून झाला होता, नव्हे का ?

* २ *

त्या वर्षीं एक अत्यंत हौशी गृहस्थ आमच्या शाळेचे हेडमास्तर म्हणून आले. त्यांनीं काय करावं, दर बुधवारीं दुपारीं घंटेचे दोन टोले वाजवून शाळेच्या चौकांत सर्व विद्यार्थ्यांची सभा भरवावी. कोणातरी देशभक्ताला किंवा गांवांतील प्रसिद्ध व्यक्तीला बोलावून आणावं आणि त्याला आमच्यापुढं भाषण करायला विनंति करावी. एक तासभर त्या पाहुण्यांचं ज्ञानामृत आम्हांला पाजल्यावर घंटेचे तीन टोले मारावेत. तीन टोले म्हणजे सुट्टी. आम्हांला अत्यानंद व्हावा आणि आम्हीं थट्टामस्करी करीत घरीं निघून जावं.

ज्या दिवशीं शाळेला एकही मुलगा उशीरा येणार नाहीं, त्या दिवशीं दुपारीं एकदमच तीन टोले वाजवून सुट्टी जाहीर करावी. कधीं आम्हांला संध्याकाळीं बोलावून मॅजिकलँटर्ननं चित्रं दाखवावींत. कधीं दिवसाच्या जादूचे अथवा शक्तीचे प्रयोग दाखवून आमची करमणूक करावी. कधीं गांवाबाहेर सहली कराव्यात, वनभोजनें करावींत, नाहीं तर एखादा कारखाना पाहाण्यास जावें. एकंदरींत काय, त्या हेडमास्तरांनीं शाळेंत नव्या नव्या गमती उडवून दिल्या आणि लोकप्रियता मिळविली.

**स्वामी लवणानंदां**चा आमच्या शाळेंत धुडगूस सुरू होईपर्यंत हें ठीक चाललं होतं. शाळा आणि आमचे हेडमास्तर आम्हांला प्रिय

होऊन बसले होते. पण लवणानंद आल्याबरोबर सगळा रंग पालटला. बुधवार केव्हां येतो याची आनंदित मुद्रेनं वाट पाहाणारे आम्ही, "आला रे बाबा बुधवार" असे धास्तावलेले उद्गार भेदरट चेहरे करून काढूं लागलों. कां नाहीं काढणार? स्वामी लवणानंदांनीं आम्हांला तसा धाकच लावला होता.

स्वामी हें त्यांचं उपपद ऐकल्यावर आमची जी त्यांच्याबद्दल कल्पना झाली होती ती सपशेल फसली. ते अगदीं निराळे दिसत होते. अंगांत भगवी कफनी नव्हती, डोक्याचा गोटा केलेला नव्हता, भस्माचे पट्टे नव्हते, हातांत दंड नव्हता नि गळ्यांत रुद्राक्षंही नव्हतीं. चांगले बूट-पाटलोण घालीत. उंच धिप्पाड देह, त्यावर सैलसा कोट अन् इस्तरी न केलेली काळी विजार. मला वाटतं, बूट लष्करी तऱ्हेचे असत आणि डोक्याला एक पिवळी पगडी असे. पण आम्हांला प्रथम नवल वाटलं तें त्यांच्या मिशांचं. नाकाखालीं एक बोटभर भागांत त्या मुळींच उगवल्या नव्हत्या, पण नाकपुडीच्या पाळीपासून ओंटांच्या कोपऱ्यांपर्यंत दोहों बाजूंला मात्र त्यांचं जंगलच्या जंगल होतं. जोंधळ्याच्या पिकाची मध्येंच कापणी करून एक पट्टाच्या पट्टा मोकळा करावा तसा कांहींसा तो देखावा दिसे! कुणी म्हणत, ते मिशांना तूप लावीत त्यामुळं रात्रीं उंदरांनीं त्या कुरतडून टाकल्या. कुणी म्हणत, गर्दीत टांग्याच्या घोड्यासमोर ते उभे राहिले, तेव्हां टांगेवाल्यानं खाण्यासाठीं आपल्या तोंडासमोर कडब्याची पेंढी धरलीय असं समजून घोडयानं त्यांच्या तेवढ्या मिशांचा एक घासच केला होता. आणखी कोणीं कल्पना काढली, कीं त्यांची मुलगी चित्रकला शिकत असल्यामुळें तिला रंगाचे कुंचले करण्याकडे त्यांचा उपयोग झाला असावा. या सगळ्या कल्पनाच ठरल्या. खरं कारण निराळंच होतं आणि तें आम्हांला लौकरच समजलं.

एका बुधवारच्या सभेंत त्यांनीं आम्हांला "लवणांबुनस्याचा" प्रयोग दाखविला. लवणांबु म्हणजे मिठाचं पाणी अन् त्याचं नस्य म्हणजे तें नाकांतून ओतायचं आणि तोंडावाटे बाहेर टाकायचं. असं

केल्यामुळं शरीरांतले जंतु नाहींसे होतात, रोगाचा प्रतिबंध होतो, कुठलाही रोग बरा होतो, फुप्फुसं बळकट होतात, असे त्यांनीं आपल्या भाषणांत लवणांबुनस्याचे पुष्कळ गुण सांगितले. भाषणाच्या शेवटीं तो प्रयोग झाला. पांढऱ्या स्वच्छ मिठाची पूड हेडमास्तरांनीं स्वत: खलबत्त्यांत घालून कुटली. स्वामी लवणानंदांनीं खिशांतून पांढऱ्या स्वच्छ कांचेचा ग्लास काढला. फडक्यावर गाळलेलं स्वच्छ पाणी त्यांत भरून नंतर मिठाची पूड त्या पाण्यांत कालवली. तें खारट पाणी आम्हांला चाटून पाहायला सांगितलं. आम्हीं एकेक थेंब जिभेवर ठेवून ओकाऱ्या काढल्या. सगळीकडे हंशा पिकला.

स्वामीजी एका खुर्चीवर आमच्यासमोर हातपाय पसरून उताणे पडले आणि त्यांनीं नाक वर करून हेडमास्तरांना हुकूम दिला, 'ओता.' त्याबरोबर काय चमत्कार! हेडमास्तरांनीं त्यांच्या नाकपुडया वर करून, आपण बंबांत पाणी ओततों, तसं ग्लासांतलं सगळं मीठपाणी त्यांच्या नाकांत ओतलं. तें सगळं आंत गेलं, तरी स्वामीजींनीं हूं कीं चूं केलं नाहीं. उलट तें सारं आंत गेल्यावर ते ओरडले, 'हं ओता!'


दुसरा ग्लास तसाच रिकामा झाला. मग स्वामीजी सरळ बसले, तोंच महादू गडी तस्त घेऊन पुढें धावला. एका क्षणांत स्वामींच्या नाकांत गुप्त झालेली ती खारट पाण्याची गंगा तोंडांतून बाहेर पडली. फें फें–खां ख्यां–खूं– असे आवाज काढून स्वामीजींनीं शेवटचा थेंब बाहेर फेंकला आणि रुमालानें तोंड पुसून एखाद्या सर्कसवीराप्रमाणं त्यांनीं हेडमास्तरांशीं हस्तांदोलन केलं. आतां त्यांच्या मिशा अशा मेहरपी कंसासारख्या (गणितांतल्या, पुराणांतल्या नव्हे.) कां, तें आमच्या पूर्णपणें लक्षांत आलं.

येथपर्यंत सगळा आमच्या करमणुकीचा भाग झाला. पण पुढं त्याचं उद्भं निघालं. हेडमास्तरांनीं आपल्या खडया सुरांत सांगितलं,

"मुलांनो, आपलीं शरीरं निरोगी आणि निकोप ठेवण्याकरतां तुम्हीं स्वामीजींनीं सांगितलेला उपाय केला पाहिजे. मी स्वत: व माझीं मुलं रोज लवणांबुनस्य करूं लागलों आहोंत (टाळ्या). उपाय सोपा न् स्वस्त, प्रत्येकाला साधेल असा. मीं त्यांना विनंति केलीय् म्हणून ते दर

बुधवारीं शाळेस भेट देणार आहेत (टाळ्या). प्रत्येक यत्तेच्या प्रत्येक तुकडींतल्या दोन मुलांवर ते सर्वांसमक्ष हा लवणांबुनस्याच्या प्रयोग करतील (स्तब्धता). तुमच्या पालकांना याबद्दल मी एक नोटीस फिरवून कळविणार आहे. विनंति एवढीच, कीं ज्यांच्यावर हा प्रयोग व्हायचा त्या मुलांनीं घरून येतांना स्वच्छ मिठाची एक पुडी बरोबर आणावी. या उपदेशाप्रमाणं सर्वजण लवणांबुनस्य कराल तर आपल्या मायभूमीचे खरे सुपुत्र व्हाल, असा स्वामींचा तुम्हांला आशीर्वाद आहे."

हेडमास्तर बसले. टाळी तर कुणींच वाजविली नाहीं, उलट टांचणी पडलेली ऐकू येईल इतकी शांतता दोन क्षण तिथं पसरली. पण लगेच मुलांमध्यें किलबिल सुरू झाली. आतां पुढं आणखी कोणतं संकट वाढून येतंय् याकडे सर्वांचं लक्ष लागलं. सातवी 'क'च्या मास्तरांना स्वामी लवणानंदांनीं सांगितलं, "तुमच्या वर्गांतलीं दोन अशक्त न् इडकुळीं मुलं निवडून काढा मास्तर."




"तुमच्या वर्गांतलीं दोन अशक्त न् इडकुळीं मुलं निवडून काढा मास्तर."

सातवी 'क' चे मास्तर आपल्या शिष्यांना शोधूं लागले आणि लवकरच बांकाखालीं दडी मारलेल्या दोन पाप्याच्या पितरांना त्यांनीं बकोट्या धरून वर काढलं. दोघंही हातपाय झाडीत होतीं आणि हेडमास्तरांच्या समोर नेऊन उभीं करतांच तर तीं रडूं लागलीं. तेव्हां स्वामी लवणानंद त्यांच्या पाटीवर हात फिरवून म्हणाले, "अरे, घाबरूं नका पोरांनो. लवणांबुनस्यानं कांहींएक अपाय व्हायचा नाहीं. कुठं दुखायचं नाहीं, कुठं खुपायचं नाहीं, अन् एकदां सराव झाला म्हणजे तुम्ही आपसूखच चैनींत तें रोज करायला लागाल. हीं, हीं तुमचीं टोंचणारीं हाडं? मांसाच्या मुठी चढतील त्यांच्यावर. हं. चला या, असे बसा या खुर्चीवर!"

बिचाऱ्या कचरूनं भोकाडच पसरलं. हेडमास्तरांनीं एकेक डोळा वांग्याएवढा केला. "बरं, हें पहा," स्वामीजी मुलांची समजूत काढण्याकरतां म्हणाले, "मी तुमच्याबरोबर पुन्हा एकदां वाटलं तर नस्य करून दाखवितों. हेडमास्तर, दरखेपेला मी अगोदर नस्य करीन नि मग मुलं करतील."

"घ्या. आतां कसलं संकट राहिलंय् त्यांत?" हेडमास्तर गरजले, "चल रे कचऱ्या, बैस हितं. महादू, सावाजी जरा इकडे या."

दोन आडदांड गडी पुढं धावले आणि त्यांनीं बिचाऱ्या कचरूचे हातपाय गच्च धरून ठेवले. कचरू धडपडत ओरडत होताच. त्याच्या हालचालीमुळं ग्लासांतलं पाणी नाकांत नीट ओततां येईना. त्याला कच्चून दम भरीत हेडमास्तरांनीं तें ओतण्याचा स्वतः प्रयत्न करून पाहिला, पण व्यर्थ. सगळं पाणी त्यांच्या धोतरावर सांडलं. ते मागें झाले आणि गणपतला म्हणाले, "अरे, प्रयोगशाळेंत जा अन् एक बारीक नळीचं नरसाळं घेऊन ये. पाहातों, याची मस्ती कुठवर चालते ती!"

गणपतनं धावत जाऊन नरसाळं आणलं. मास्तरांनीं तें कचरूच्या नाकपुडींत खुपसलं. इतकं झाल्यावर जेमतेम एक पळीभर मिठाचं पाणी

त्यांतून ओतलं गेलं. कचरूच्या धडपडीमुळं आणखी ओतण्याचा बेत मास्तरांना सोडून द्यावा लागला.

हा भयंकर प्रयोग दर बुधवारीं आम्हांला पाहावाच लागे. हडकुळीं मुलं हल्लीं शाळेंत येतांना सदऱ्यावर सदरे घालून लठ्ठ दिसण्याचा प्रयत्न करूं लागलीं. ज्यांचे गळ्याचे कंठमणि उटंटळ दिसत ते गळ्याभोंवतीं उगीचच मफलर गुंडाळून येत. मी तर पोटावर अन् पाठीवर सदऱ्याच्या आंतून लहान गिरद्याच बांधूं लागलों. हेतु हा, कीं मास्तरांचें आपल्याकडे विशेष लक्ष जाऊं नये. कारण एरवीं कोणाच्याही डोक्यांत भरणारे लोडासारखे लठ्ठेश्वर हल्लीं मास्तरांच्या खिजगणतींतही नसत. त्यांची कावेबाज नजर एखादं फडतूस सावज बुधवारसाठीं टेहेळीत असायची. मला सारखी धास्ती वाटे, कीं आपला बारीकपणा आतां आपल्याला गोत्यांत आणणार.

एका बुधवारीं त्या लवणांबु-दिव्यांतून पार पडलेला पन्न्या मला भेटला, त्याला मीं विचारलं, "काय रे, कसं काय वाटतं?"

"अरे काय सांगूं? चंदनाची उटी लावल्यासारखं थंडगार वाटतं."

"तूं रे कधीं लावली होतीस चंदनाची उटी?"

"तसं नाहीं रे. पुस्तकांत तिचं वर्णन असतं त्यावरून म्हणतोंयूं मी. मजेदार वाटतं खरं, कापुरकांडी नाकांत घातल्यासारखं!" तो हंसून म्हणाला.

"कुणास ठाऊक? आपण कधीं चंदनाची उटीही लावली नाहीं. नि कधीं कापुरकांडीही नाकांत खुपसली नाहीं."

"अरे, त्याचं काय ऐकतोस विन्या? मला विचार." कचऱ्या लांबून ओरडला, "एकादी जळती सळई नाकांतून तोंडांत घालावी तसं वाटलं—बापरे, नको ती आठवण."

माझ्या अंगावर शहारे आले. पोटाशीं गिरदी नीट आहे कीं नाहीं तें मीं चांचपून पाहिलं आणि तेथून पाय काढूं लागलों. इतक्यांत

आमच्या वर्गांतला भाल्या मागून आला आणि माझ्या पाठीवर एक थाप मारून म्हणाला,

"जाऊं दे रे विनू. असं विचारून काय होणार आहे? हे आपल्याला खरं थोडंच सांगणार आहेत? आली वेळ म्हणजे पाहून घेऊं."

'आपण' म्हणायचं कारण तुम्हीं ओळखलंच असेल. आमच्या वर्गांत माझ्या किरकोळ आकृतीशीं स्पर्धा करणारा भाल्याच काय तो एक 'हडकुळा' जीव होता.

आणखी दोन आठवड्यांनीं व्हायचं तें झालंच. आमच्या युक्त्या-प्रयुक्त्यांना भीक न घालतां मास्तरांनीं मला नि भालू वाळिंब्याला बुधवारच्या त्या शूलवधासाठीं निवडून काढलंच. वास्तविक शामू शेवड्याचं पोट माझ्यापेक्षांही दोन इंच कमी होतं अन् त्याच्या गालफडांचीं खोबडीं झालेलीं होतीं. मास्तरांच्या निदर्शनास मीं तें आणलं, पण माझं कांहीं चाललं नाहीं. आम्ही बळी ठरलोंच. बुधवारच्या प्रयोगाकरतां मीठ घेऊन ये, असं मास्तरांनीं भाल्याला बजावलं.

बुधवारीं सभेची घंटा झाल्यापासूनच माझी छाती धडधडूं लागली. एखादं बकरं खाटकासमोर नेऊन उभं करावं तसं भाल्याचं मानगुट धरून मास्तरांनीं त्याला स्वामी लवणानंदांपुढं नेऊन उभा केला. मोठ्या कष्टानं मीं डोळे उघडे ठेवले. आमच्या शाळेंतल्या मुलांना हैराण करून शाळेंत भीतीचं साम्राज्य निर्माण करणारा तो स्वामी पुढं झाला. विकट हास्य करून त्यानं भाल्याची पाठ थोपटली आणि नेहमींच्या रिवाजाप्रमाणं पहिल्या प्रथम स्वत: नस्य करून दाखविण्याकरतां खुर्चीवर तो आडवातिडवा पसरला. भाल्यानं खिशांतून मिठाची पुडी काढून थरथरणाऱ्या हातांनीं ती मास्तरांजवळ दिली. एक बंपरभर पाण्यांत ती टाकली आणि चमच्यानं तें पाणी चांगलं हलवलं. चौकांत भयानक शांतता पसरली. स्वामी ओरडले, "ओता." मास्तर झुकून त्या नाकबंबांत तें पाणी ओतूं लागले. आम्ही सर्व भेदरलेले चेहेरे करून तो देखावा पाहूं लागलों.

दोन चार सेकंद गेले न् काय झालं कुणास ठाऊक ? मास्तरांच्या हातांतला बंपर स्वामींनीं एका झपाट्यासरशीं उडवला आणि एक भयंकर आरोळी मारून ते ताडकन् उठले. फ्यां फ्यां करून त्यांनीं नाक शिंकरण्यास सुरुवात केली. “ स्स् हाय ! मेलों, ठार झालों ! कोण ही आग ! आग ! ” असं ओरडत ते गडबडां लोळूं लागले. सगळी शाळा उठून चित्रासारखी तटस्थ उभी. हेडमास्तर, “ डॉक्टर, डॉक्टर ” हांका मारीत चहुंकडे धावत सुटले. बाकीच्या मास्तरांची तारांबळ तर कांहीं विचारूं नका. भूगोलाचे मास्तर नळावर गेले आणि त्यांनीं एक बकेटभर पाणी आणून स्वामींच्या अंगावर ओतलं. सायन्सचे मास्तर कोटस्थाने एक घमेलंभर रेती घेऊन आले आणि तें घमेलंच त्यांनीं लवणानंदांच्यावर उपडं केलं. गडीमाणसं उगीचच आग आग करीत ओरडत सुटलीं. त्यामुळं मुलंही घाबरून सैरावैरा पळत सुटलीं. खरोखरी काय झालं हें कोणालाच नीट सांगतां येईना. आम्हांला त्याची जरुरीही नव्हती. आपले नस्याचे हाल चुकले हाच आम्हांला मोटा आनंद होता. भाल्या तर त्या गर्दीत कुठं दिसेनासा झाला तो घरीं जाईपर्यंत सांपडलाच नाहीं.

दुसऱ्या दिवशीं शाळा सुरू झाल्याबरोबर हेडमास्तर छडी घेऊन आमच्या वर्गांत आले. त्यांचा चेहरा गंभीर होता. चष्म्यांतून लाल डोळे गरगर फिरतांना दिसत होते. मिशा फेंदारलेल्या वाटल्या. आमच्यासमोर उभं राहून त्यांनीं फर्मावलं, “ भालू वाळिंबे ! ”

“ यस् सर, ” भाल्या उभा राहून म्हणाला.

“ उभा राहा बांकावर. ” भाल्या डेस्कावर चढला.

“ स्वामी लवणानंदांच्या प्रयोगाकरतां मिठाची पूड म्हणून तूं काय

“ बरा ंस ? ”

नाहक खच् कांहीं नाहीं सर. म–मी–मिठाची —”

तिथं दहा अ ” टेबलावर काडकन् छडी आपटून ते ओरडले.

धोरणच कमी ! ” भाल्यानं न अडखळतां उत्तर दिलं.

"अस्सं. ही खोडी करून तूं शाळेच्या एका सन्मान्य पाहुण्याचा अपमान केलास; इतकंच नव्हे, तर त्यांना शारीरिक अपायही केलास. शाळेवर त्यांनीं केलेल्या उपकाराची तूं अपकारानं फेड करणारा कृतघ्न विद्यार्थी आहेस."

"त्यांचा पाहुणचार त्यांच्या पद्धतीनं परत केला सर."

"हात पुढं कर."

भाल्यानं हात पुढं केला. सप् सप्! त्यावर दोन छड्या बसल्या. भाल्या कळवळला. हेडमास्तर निघून गेले.

संध्याकाळीं भाल्याला आम्ही अक्षरशः खांद्यावर घेऊन नाचलों. खरोखरीच स्वामी लवणानंद आमच्या शाळेकडे पुन्हा फिरकले नाहींत!

* * *

पाहिलंत मुलांनो, दोन आठवणी सांगतां सांगतांच इतका वेळ गेला. पण वाचतांना गंमत वाटली कीं नाहीं? म्हणून म्हणतों, असे सगळे बारीकसारीक गमतीचे प्रसंग स्मरणवहींत टिपून ठेवा.




**दुपारीं** १२ ची वेळ. पुणें स्टेशनवरून निघालेला एक बैलाचा छकडा सरासरी रास्त्यांच्या वाड्यापाशीं आलेला. छकडयांत दोनच डाग. जाणारे येणारे त्या डागांकडे कौतुकानें बघत आणि तोंड फिरवून हसत. छकड्यांत ठेवलेली एक लहानशी करंडी आणि एका बाजूला टेकून बसलेले कान्होबा, हे ते दोन डाग होत. कान्होबांनीं एका हातानें डोक्यावर छत्री धरलेली असून दुसऱ्या हातानें गाडीच्या धक्क्यांनीं पडूं नये म्हणून डोक्यावरचा रुमाल सावरून धरला होता. गाडीवाला, कान्होबा आणि छकड्याचा बैल हे तिघेही घामानें निथळत होते. मध्येंच कान्होबा छकडेवाल्याला म्हणाले,

“ अरे, जरा हाण त्या बैलाला. केव्हांचा निघालाय् स्टेशनवरून. अजून अर्धा रस्ता राहिलाय्. ”

“ आतां दुपारचं जनावर कसं पळनार व्ह काका ? अरं तुज्या. . ” असें कायसेंसें बडबडून छकडेवाल्यानें हातांतील कासऱ्याचेंच एक टोंक बैलाच्या पाटीवरील माशा उडविण्याकरतांच जणूं काय झटकलें.

“ बरा मी आलों स्टेशनवर, नाहीं तर आज ही आठ दहा आणे नाहक खर्चून बसली असती. जिथं दोन आण्यांत काम व्हायचं तिथं दहा आणे वेंचायचा तडाखाच असतो तिचा. बायकांना मुळीं धोरणच कमी ! ” कान्होबा स्वतःशींच पुटपुटूं लागले.

कान्होबांची पत्नी राधा आपल्या घराच्या सज्ज्यांत येऊन कान्होबांच्या वाटेकडे डोळे लावून उभी होती. आज ऋषिपंचमी असल्यामुळें सकाळपासून बिचारीच्या पोटांत पाण्याच्या थेंबाशिवाय कांहींही गेलें नव्हतें. चेहरा सुकून गेलेला दिसत होता. माहेराहून आलेलें ऋषिपंचमीच्या सामानाचें पार्सल कान्होबा केव्हां घेऊन येतात याची ती चातकासारखी वाट पहात होती. त्या पार्सलावर तिची सारी भिस्त होती.

" जातांना चांगलं बजावलं होतं, कीं टांगा करून पार्सल लवकर घेऊन या. पैसेही बरोबर घेतले होते, मग आतां कां बाई उशीर हा ? "

असें ती मनांत म्हणत असावी, इतक्यांत कान्होबांचा छकडा मेहुणपुऱ्यांत प्रवेश करता झाला. छत्रीखालीं बसलेले कान्होबा आणि त्यांच्या पुढ्यांत ठेवलेली ती ऋषिपंचमीची करंडी राधाबाईनीं पाहिली मात्र—त्यांना धक्काच बसला ! ! आपल्या यजमानाच्या अकलेची कींव करावी, कीं काटकसरीचें कौतुक करावें हेंच त्या माउलीला समजेना !

पार्सल घेऊन कान्होबा घरांत प्रवेश करतात, तोंच ती कडाडली, " गिळा तुम्हीच तें सामान आतां ! माझ्या पोटांत सुखानं घास कसा जाऊं द्याल ? "

" अग....अग....प-पण झालं काय ? तुझं पार्सल घेऊन आलों कीं मी.... " त्या चंडिकेचा अवतार पाहून गोंधळलेले कान्होबा म्हणाले.

" झ्यालंऽऽ काय ? करून्‌च्या सवरून वर आणखी झ्यालं काय ? तो बैल तरी बरा शहाणा..........." रडकुंडीच्या आवाजांत राधाबाई.

" तूं म्हणालीस टांग्यांतून घेऊन या पार्सल. मला हा बैलाचा टांगा अगदीं स्वस्तांत मिळाला."

" स्वस्तांत मिळाला ! अहो, तुम्हांला आजच कशी ही काटकसर आठवली ? "

" म्हणजे दोन आण्यांत पार्सल घरीं आलं, ते दहा आणे कशाला द्यायचे घोड्याच्या टांग्याला ? तुला मुळीं धोरणच कमी ! "



“ गिळा तुम्हीच तें सामान आतां ! माझ्या पोटांत सुखानं घास कसा जाऊं द्याल ? ”

“दिवे ओंवाळा आपल्या घोरणापुढं. अहो, ऋषिपंचमी आहे ना आज ? आईनं विचारीनं कोण यातायात करून धाडलंन् पार्सल; पण तिला काय माहीत, आपले जांवई असे दिवटे असतील ! खुशाल बैलाच्या श्रमानं आणलंत पार्सल आणि वर पैसे वांचविले म्हणून फुशारकी........”

“ अर्र्र्र—” कान्होबा बोटें झाडीत म्हणाले, “ हें नव्हतं ध्यानांत आलं माझ्या. असा घोंटाळा झाला काय ? अगोदर ध्यानांत येतं तर मी स्वत: टोपली घेऊन आलों असतों ! ”

“ बैलाच्या पाटीवरून आणली काय न् तुम्हीं आणलीत काय, एकूण एकच ! ” राधाबाई हताश होऊन म्हणाली.

आतां सारा दिवस कडकडीत निरशन करावं लागणार या भीतीनें तिला सुचेनासें झालें !

"तुला किनई, धोरणच कमी!" तेवढ्यांत कान्होबांना स्फूर्ति झाली, "अग, बैलानं छकडा ओढला असला, तरी करंडी मीच मांडीवर घेऊन बसलों होतों. माझं ऐक. कुठच्याही कामांत शास्त्रार्थ काढावा आणि आपला तळीराम गार करावा."

पण राधेचीं मतें शास्त्रार्थ काढून समाधान मानण्याइतकीं 'तय्यार' झालेलीं नव्हतीं. यजमानांच्या पुढें जास्त उरस्फोड न करतां त्या रागारागानें घरांत निघून गेल्या. कान्होबा कपडे काढून स्नानगृहांत गेले आणि 'भीमरूपी महारुद्रा वज्र हनुमान....' करीत त्यांनीं डोक्यावरून घंगाळभर पाणी ओतून घेतलें.

दुपारीं, हिच्या अबोल्याला काय करावें याचा विचार करीत कान्होबा सतरंजीवर लोळत असतांनाच दारावर भाजी विकायला आली. एक म्हातारी 'उपासाला भाजी' असें ओरडत चालली होती.

"शुक् शुक्....ए बाई!" खिडकींतून तोंड काढून कान्होबा ओरडले, "भाजी ऋषिपंचमीची आहे का?"

"अन् मग यवढ्या उन्हाची कोन इकील भाजी? मंडई ओस पडलीया जनू!" पुण्याच्या भाजीवालीला साजेसें उत्तर तिनें दिलें.

तिला उभें राहण्यास सांगून कान्होबा खालीं उतरणार, तोंच राधा आंतून ओरडली,

"अहो, कशाला ती दारावरची भाजी घेतां? या भाजीवाल्या मोठ्या लुच्च्या असतात. मंडईंतलीच भाजी आणतात नि खुशाल ऋषिपंचमीची म्हणून चौपट किंमतीला विकतात!"

हे शब्द त्या शूर भाजीवालीनें ऐकले मात्र, डोक्यावरची पाटी दारांत ठेवून तिनें कंबरेचा दुपट्टा आवळला आणि 'माडीवरच्या बयेच्या' नांवानें गर्जना करायला सुरुवात केली,

"बया बया बया! आज ईस वर्सं धंदा करत्येंय् मी, पर वांकडा शब्द नाहीं ऐकून घेतला कुनाचा. ही भोवानी आली मला खोटं

कराया !.....अशीं पापं तुमच्यावानी बामनीनीच करायच्या. आमिच्या न्हाई टात्र हे धंदे...."

95932

ही मुलुखमैदान ऐकून कान्होबा बावरले.

"पाहिलंस !"

ते राधेला म्हणाले, "केवढ्या मोठ्यानं बोललीस ! रस्त्यावर ऐकू गेलं तें भाजीवालीला. धोरणच कमी तुला ! कर तिची समजूत आतां !"

"अहो, पण चांगले पसरलां होतांत आडवे, ते उठलांत कशाला तिला हांक मारीत ? लावा आतां तुम्हीच तिला वाटेला."

कान्होबा खालीं गेले. अनेक आर्जवें करून त्यांनीं भाजीवालीला गप्प केलें आणि दोन काकड्या नि चार वांगीं घेऊन स्वारी वर आली. बायकोच्या पुढयांत ती भाजी टेवून पैसे देण्याकरितां म्हणून त्यांनीं आपल्या कोटाच्या खिशांत हात घातला....

'बाप रे !' त्यांनीं सटकन् हात बाहेर काढून सगळे खिसे चांचपण्यास सुरुवात केली. आणखीच भयंकर. खिशांतील पैशाच्या पाकिटाला ठिकाण नाहीं ! घड्याळाचाही मागमूस लागेना. खिसे उलटे केले, कोट झटकला, पण व्यर्थ. खुंटीवरच्या इतर कपड्यांची उलथापालथ केली. कपाटें, ड्रावरें धुंडाळलीं. छे ! पाकीट आणि घड्याळ कोठेंच दिसेना. आतां मात्र त्यांचे पाय लटलटूं लागले. घाबऱ्या घाबऱ्या ते घरांत गेले आणि अगोदरच फणफणत बसलेल्या 'तिला' चांचरत विचारूं लागले,

"प.....प.....पैशांचं पाकीट पाहिलंस का माझं ?......."

"हें पहा बाई काय तें ! तुमचं पैशांचं पाकीटही मीच का संभाळूं आतां ?" असें म्हणत जरी ती उठली, तरी पुढच्या खोलींत जाऊन तिनेंही ट्रंका, पेट्या, टेबल, कपडे इत्यादि वस्तूंची उलथापालथ आरंभिली. जसजसा पैशाला उशीर लागूं लागला तसतशी भाजीवाली अधीर होऊन ओरडूं लागली.

95932

"हें बघ...." शेवटीं कान्होबा रडकुंडीला येऊन म्हणाले, "दे तिला तुझ्याजवळचे पैसे सध्यां."

"आतां कां ? आम्हांला धोरणच कमी ना ! दोन आण्यांचा बैलाचा टांगा केला नि पाकीट गमावून आले." राधाबाईंनीं हिणविलें आणि घरांत जाऊन वेणीफणीच्या पेटींतून पैसे काढून भाजीवालीला त्यांनीं वाटेला लावलें. भाजीवाली जातांच कान्होबा म्हणतात,

"कांहीं तरीच तुझं. पाकीट आपल्या घरांतून गेलंय् ! चांगलं आठवतं मला, मीं इक्कडेवाल्याला पैसे दिले तेव्हां पाकीट होतं."

"आपल्या आठवणीचं झालं आहे अलीकडे अंवोण. अहो, त्याला खिशांतूनच पैसे दिलेत, पाकिटांतून नाहीं. पाकीट मुळीं स्टेशनवरच हरवून आलां आहांत कुठं तरी. खिसा तर नाहीं ना कापला तुमचा कुणीं भामटयानं ?"

"हे: ! खिसा कापायला मी काय कुणी हा आहे वाटतं !"

"हात्तिच्या. परवां तर दादानं शेंडी कापली तुमची. केव्हां कापलीन् तें कळलं दिखील नाहीं तुम्हांला........"

"कळलं तर काय झालं. पण तुझा दादा ना तो ? म्हणून गप्प बसलों. माणसानं जरा धोरण संभाळावं लागतं."

"पण पाकीट घरांतून गेलेलं नाहीं !"

"घरांतूनच गेलेलं आहे खास !"

भांडणाच्या आवेशांत दोघांचेही आवाज एवढे चढले, कीं शेजारी-पाजारी ओसरीवर जमून कान्होबांच्या घरांत डोकावूं लागले. त्यांच्यापैकीं हिरव्यांचा बाळू पुढें झाला आणि मोठ्यानें विचारूं लागला,

"काका काका, काय हरवलं तुमचं ?"

कान्होबांना कुणी काका म्हटलें, कीं चीड यायची.

"उगीच मधें चोंबडेपणा करूं नकोस. नुकसान झालं आमचं नि याची नसती पीडा !"

कान्होबा वसकन् ओरडले, पण बाळू डरला नाहीं. उलट धिम्मेपणानें तो पुढें म्हणाला,

“ उकिडव्यांचा नाना मघांशीं तुमच्या घरांत शिरला होता. बाहेर आला तेव्हां कोटांत छपवीत होता कायसंसं—”

उकिडव्यांचा नाना म्हणजे कान्होबांचा आदल्या जन्मींचा दावेदारच होता. कारण त्या सगळ्या चाळींत त्यानें आपलें प्रस्थ फारच माजविलें होतें. आर्. एस्. एस्. मध्यें पोरांना तो कवाईत शिकवी. शिक्षण बेताचेंच झालेलें, पण पोरगा फार चलाख. पुष्कळ गोष्टी सांगायचा, मुलांना फिरायला न्यायचा, गमतीच्या नकला करून दाखवायचा, शारीरिक खेळांत अनेक बक्षिसें मिळवायचा. कोणाचेंही काम नडूं द्यायचा नाहीं. कोणालाही मदत करण्यास त्याची सदैव तयारी असे. त्यामुळें चाळींतल्या बायकांमुलांना तो फार हवाहवासा वाटे. सर्वांचा त्याच्यावर फार लोभ होता. परंतु कां कुणास ठाऊक, याच कारणामुळें कान्होबांचें मत त्याच्याविषयीं चांगलें नव्हतें. चाळींतलीं मुलें आपल्याला हसतात, त्याचें कारण नानाची फूस असें त्यांच्या मनानें घेतलें होतें. हा नान्या आपल्या चाळींतून एकदांचा जाईल तर बरा असें त्यांना वाटे. त्यामुळें आतां बाळूनें नानाचें नांव घेतांच कान्होबा गरजले,

“ कोण तो हरामखोर ना ? अरे देवा, घात झाला ! मला वाटलंच होतं, कीं तो केव्हां तरी हा पराक्रम करणार म्हणून ! ”

“ अहो, उगीच काय एखाद्यावर आळ घेतां ? अगोदर नीट चौकशी तरी करा, तो कशाला आला होता त्याची ? ”

राधाबाईनीं तक्रार केली.

“ हो, हो तर; आतां चांगली चौकशी करवितों थांब. ”

“ म्हणजे ? ”

“ आत्तां जातों नि पोलिसला घेऊन येतों ! ”

"अगबाई! चोर झाला फरारी आणि त्या गरिबाला कां हा वंमवोस?"

"चूप. ओरडूं नकोस, नाहीं तर सगळीकडे बोभाटा होईल आणि चोर खरोखरीच फरारी होईल. बायकांनीं या कामांत अगदीं बोलूं नयें. या गोष्टी कायदेशीरच व्हाव्या लागतात. ती मंडळी फार वस्ताद. आपल्यासारख्या सरळ माणसांना दाद द्यायची नाहींत!"

राधाबाईंच्या आक्षेपाला न जुमानतां कान्होबांनीं आपला ठराव अमलांत आणला. लगबगीनें चौकीवर जाऊन ते पोलीस-शिपायाला घेऊन आले. नंतर त्या शिपायानें नाइकाला बोलाविलें. नाइकानें जमादारास आणलें आणि कान्होबांच्या घरांत त्यांचा एकच धुडगूस सुरू झाला. प्रश्न विचारून विचारून त्यांनीं दोघांस बेजार केलें. जबान्या झाल्या, सामानाची उलथापालथ झाली!

"घड्याळ केवढं होतं?" जमादारानें प्रश्न केला.

"होतं एवढं एवढं!" कान्होबांनीं हातांनींच दाखविलें.

"एवढं म्हणजे? साठ्यांच्या बिस्किटाएवढं का?"

"हो, हो,—नाहीं....हजामतीच्या साबणाएवढं!"

"कांटे किती होते त्याला?"

"काय कीं बुवा?"

"घड्याळ तुमचंच होतं ना?"

"म्हणजे?"

"मग कांटे कसे सांगतां येत नाहींत?"

"तीन होते तीन!"

"पुढच्या बाजूला कीं पाटीमागें?"

"अँ?"

"उत्तर द्या."

"पुढच्या!"

"छडा होता?"

नों. नं.

"नाहीं गोफ!"

"काळा कीं पांढरा?"

"तांबडा!"

"घड्याळाचा मेक?"

"पुण्याला घेतलं होतं टिळकांकडं!"

"कोणते टिळक?"

"मंडईजवळचे आपले!"

"म्हणजे?" जमादार आणि क्लार्क एकमेकांकडे पाहातात.

"अहो टिळक वॉचमेकर!"

"ते झाले दुकानदार, पण घड्याळ बनवलं होतं कोणीं?"

"तुम्ही कंपन्यांचीं नांवं घ्या म्हणजे पाहातों आटवलं तर!"

"नाईट ॲन्ड डे!! व्हाईट वे लेड लॉ!! खटाव मकनजी....मुल्ला ॲन्ड मुल्ला!!"

"हां हां. मुल्ला ॲन्ड मुल्लाच असतील!"

"बरं, पाकिटांत काय काय होतं?"

"दहाच्या पांच नोटा–तीन रुपये—एक पंचवीस रुपयांचा चेक, पोस्टल सेव्हिंग्ज बँकेची रिसीट–एक आण्याचीं पोस्टाचीं तिकिटं तीन. आणि....आणि...."

"आणखी काय?"

"एक वस्तऱ्याचं पातं!"

"कुठल्या कंपनीचं?"

"जिलेटचं!"

"सामान ओळखूं शकाल ना केव्हांही?"

"हो....हो!"

"वहीम कोणावर?"

"उकिडव्यांचा नाना!"

"कुठले उकिडवे....दाखवतां का?"

"हो हो, चला."

पोलीसपार्टी आणि कान्होबा तडक उकिडव्यांच्या दाराशीं उभे राहिले. उकिडवे हपीसांत गेले होते, काकू घरांत देवपूजा करीत होत्या. ही टोळधाड आकस्मिक रीतीनें घरावर आलेली पाहून त्या गांगरून गेल्या. शिवाय पाकीट, घड्याळ, चोरी नि आपला नाना यांचा उल्लेख त्या लोकांनीं केला तेव्हां तर त्या मटकन् खालींच बसल्या.

"आमच्या नानाचा संशय?" त्या कातर स्वरानें म्हणाल्या, "अरेरे, देवा, दुनियेंत न्याय तरी राहिला आहे का नाहीं! अहो, माझा नाना किती सरळ मुलगा! असलं घाणेरडं कृत्य त्याच्याकडून कसं होईल? छे छे, बाबांनो, नांव नका काढूं."

"कुठं आहे तुमचा नाना?"

"बाराच्या गाडीनं मुंबईला गेला!"

कान्होबांचा चेहराच उतरला!

"कशाला?" नाइकांनीं विचारलें.

"तें नवीन शारीरिक कवाइतीचं कॉलेज निघायचं आहे ना? त्यांत जागा मिळायची आहे म्हणे त्याला. काल तिकडून पत्र आलं म्हणून निघाला आज!"

"आरोपी फ़रारी झाला म्हणायचा!" कान्होबा पुटपुटले.

"देवा, देवा, तुम्ही त्याला आरोपी म्हणतां खुशाल! अहो, तो कांहीं पळून नाहीं गेला. सकाळीं जातांना सगळ्यांचा निरोप घेऊनच गेलाय्!" म्हातारी रडत म्हणाली.

बाईंकडून उकिडव्यांच्या हपीसाचा पत्ता घेऊन चौकशीसाठीं पोलिसांनीं तिकडे मोर्चा वळविण्याचें ठरविलें. उकिडव्यांच्या घरावर चांगलें लक्ष ठेवा, असें कान्होबांना बजावून जाण्यास ते विसरले नाहींत.

घरांत जातांच, नाना पळून गेल्याचें वर्तमान कान्होबांनीं राधेच्या कानांवर घातलें. "पाहिलंस....तुझ्या बोभाटयामुळं त्याला सुगावा लागला आणि चोर पळाला!"

"अहो, कां त्या उकिडव्यांच्या राशीला लागतां उगीच? सज्जन माणसं तीं, त्यांची अशी अब्रू घेणं चांगलं नाहीं. बाळू सांगतो काय आणि तुम्ही डोक्यांत तेवढंच घेऊन हीं थेरं करतां काय? सगळंच नवलं!"

"तुम्हां बायकांना माणसांची परीक्षा मुळींच नसते. अग तीं उकिडव्यांचीं माणसं सज्जन का? वा:! मग जगांत लुटारू म्हणायचं तरी कोणाला? छे, छे, तुला अगदीं धोरण नाहीं बुवा."

"जळ्ळं तुमचं धोरण तें! कसं तुम्हांला एखाद्याचं चटकन् नांव घेववतं कुणास ठाऊक? बाई ग, पोलिसांच्या तावडींत सांपडल्यावर बिचाऱ्या नानाचे काय हाल होतील, कुणास ठाऊक! शहारेच येतात ग बाई अंगावर...."

"यायचेच!! आमच्या कष्टाचे पैसे हातोहात गेले तेव्हां नाहीं कुठं आले ते शहारे?" कान्होबा चिडून म्हणाले.

दुसऱ्या दिवशीं कान्होबा हपीसांतून घरीं येऊन कपडे काढताहेत तोंच राधेनें जेव्हां त्यांच्या तोंडासमोर टिकटिक करणारें त्यांचें छोटें घड्याळ धरलें, तेव्हां त्यांचा चेहरा फोटो काढण्यालायक झाला!!

--"म्हणजे? एवढ्यांतच चोरी सांपडली वाटतं?"

"घड्याळ सांपडलं!"

"म्हणजे? नाना इथंच आहे तर! च्छ! काय बेरड हीं उकिडवे माणसं. तरी मी म्हणत होतों तुला, वरतून दिसायला सात्व पण पोटांत लोकांना लुबाडण्याची हाव आहे बरं त्यांच्या!"

"नाना नव्हे, शिदू!"

"शिदू कोण?"

"आपला परीट. त्यानं कोट नेला धुवायला, त्याबरोबर चुकून घड्याळ गेलं! तें त्यानं दुपारीं आणून दिलंन्!"

-"मग पैशांचं पाकीटही त्याच हरामखोरानं...."

"अहो, पण तुम्हीच ना म्हणालांत, कीं छकडेवाल्याला पैसे दिले तेव्हां पाकीट होतं म्हणून...."

"खरंच कीं! दड्याळ सांपडलं तरी पाकीट चोरण्याचं काम एकंदरींत नानाचंच!"

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मुंबईहून पोलिसांची तार आली. अगदींच त्रोटक होती ती! "चोर धरलाय, माल ओळखायला या!"

राधाबाईच्या तोंडावर तारेचा कागद फडकावीत कान्होबा म्हणतात, "बघ बघ, डोळे उघडून पहा जरा! टेलिग्राम आला आहे. तरी मी सांगत होतों पहिल्यापासनं, बायका त्या बायकाच! त्यांना सगळीं माणसं सारखींच दिसतात. अग, त्याला धोरणी दृष्टि लागते!"

राधेनें तार पाहिली. तोंड वाईट करून ती म्हणाली, "त्या मेल्यांना काय होतं तार करायला? आपण मुळींच जाऊं नये. उलट माल ओळखायला इकडे आणा, म्हणून उत्तर पाठवावं! हो मुंबईला जाऊन यायचं म्हणजे फुकट नाहीं. चांगला पंधरा रुपये खर्च येईल नि एवढं करून कांहीं हातीं लागलं तर ठीक!"

"अग, पोलीसखातं म्हणजे तुमच्या सुपांतला कोंडा नाहीं, समजलीस! म्हणे, त्यांना अच्चं उत्तर पाठवा न् तच्चं पाठवा! एकदां त्यांच्या हातांत केस दिली, म्हणजे त्यांच्या सल्ल्यानं चालावं लागतं. तुम्हांला नाहीं कायदा माहीत नि उगीचच लेक्चरं देत सुटायचं...."

"पण काय सांपडलं आहे, तें विचारा तारेनं!"

"वा:, असं कोणी सांगत असतं वाटतं! गुन्ह्याची चौकशी म्हणजे चेष्टा नाहीं. जरा गुप्त पोलिसांच्या गोष्टी वाचीत जा म्हणजे समजेल, यांत काय काय धोरणं संभाळावीं लागतात तीं! हं, मुकाट्यानं सामानाची बांधाबांध कर बघूं."

"इश्श, माझी धिंडका कशाला आणखी तुमच्याबरोबर?"

"कशाला म्हणजे? माल ओळखायला!!"

"ओळखा तुम्हीच. मी साफ सांगतें, येणार नाहीं. उगीचच पैसे वर नाहीं आले दोघांनीं मुंबईला ट्रिप काढायला!"

"अग, पण जरा ऐकतेस का माझं........"

"मी येणार नाहीं!" तिनें टांसून सांगितलें!

अर्थात् कान्होबा एकटेच दुपारच्या एक्सप्रेसनें मुंबईस रवांना झाले. आपण हिचें कांहीं एक न ऐकतां योग्य ती सावधगिरी घेतली, याची त्यांना धन्यता वाटली. हिचें ऐकून नानाला सोडला असता, तर आज माल हातीं लागता ना, चोर सांपडता ना. शिवाय एकदां त्याला चट लागली असती, म्हणजे पुढें त्यानें आणखी काय काय लुटारूपणा केला असता, कोण जाणे?

सारांश, आपण आडमुठेपणा दाखविला नसता, तर आपलें धोरण यशस्वी होतें ना, अशी त्यांची खात्री झाली.

सकाळीं लवकर उठून कान्होबांनीं ठेवणींतले कपडे अंगावर चढविले आणि स्वारी मोठ्या ऐटींत पोलिसचौकीवर दाखल झाली. तेथें पुण्याचे ते जमादारसाहेब आणि इतर कांहीं पिवळ्या पगडीवाले त्यांची वाट पाहात होतेच. बाजूला पिंजऱ्यांत एक बावळटसर तरुण खालीं पाहात आंगठ्यानें जमीन उकरीत होता. डोक्याला टोपी नव्हती आणि अंगांत एक मळकट कुडतें दिसत होतें. कान्होबांना सलामी देऊन जमादारांनीं फर्माविलें,

"पिंजऱ्याकडे पहा साहेब."

कान्होबांनीं पाहिलें.

"आरोपीला ओळखतां तुम्ही?"

"हो, चांगलाच ओळखतों." कान्होबांनीं जास्त निरीक्षण न करतां ठोकून दिलें. कारण नानानें आपली मान वर करण्याच्या अगोदर त्यांना तेथून पोबारा करावयाचा होता. त्याच्या डोळ्याला डोळा भिडविण्या-इतकें धाडस आपल्या हातून व्हायचें नाहीं, हें त्यांना माहीत होतें!!

"बरं, ह्यो पगता का जरा?"

असें म्हणून जमादारसाहेबांनीं खिशांतून एक कागदाची पुडी काढली. हळूच त्या पुडीचा कागद उलगडून आंतील वस्तऱ्याचें एक गंजलेलें पातें त्यांनीं कान्होबांच्या तोंडासमोर धरलें!



जमादारसाहेबांनीं वस्तऱ्याचें एक गंजलेलें पातें कान्होबांच्या तोंडासमोर धरलें.

" ह्यों पगा नीट. "

कान्होबांनीं अगदीं नीट पाहिलें. जिलेटचेंच होतें तें !

" तुमचंच आहे ? "

" हो ! "

" पाकिटांत होतं ? "

"शंकाच नाहीं!"

"हवालदार, टिपूनश्यानी घ्या!"

जमादारांनीं एकाला फर्माविलें. पातें पुन्हा कागदांत गुंडाळून खिशांत ठेवलें आणि हवालदारांची व त्यांची जी कुजबुज सुरू झाली, ती संपेच ना! कान्होबांनीं खाकरून पाहिलें, पाय आपटले, तरी कोणी पाहीना. शेवटीं धीर करून त्यांनीं विचारलेंच,

"मला दाखवितां ना?"

"दाखविला कीं!" जमादार वसकन् ओरडला.

"म्हणजे? पात्याशिवाय आणखी नाहीं का कांहीं सांपडलं?"

"पैसे व कुठचा चोर ठेवील तुमच्याकरतां जपूनशान?"

"नाहीं, पण कागद वगैरे?"

"काढूं समदं वझं, वझं! मुद्देमाल तर हातीं लागला आपल्या!"

हवालदारांनीं आश्वासन दिलें. कान्होबांच्या पायाखालची भुई सरपटूं लागली. अंगाला घाम सुटला. एवढा खर्च करून आपण येथें आलों तें नुसतें एक भिकारडें पातें ओळखण्यासाठींच, हें ध्यानांत येतांच त्यांना कसेंसेंच वाटूं लागलें.

"बराय, जातों मी?"

"कुठं?"

"घरीं!"

"वाईच थांबा. जबाब व्हायचा हाये!"

"जबाब? जबाब नाहीं देत आतांच. अगोदर माल पडूं दे पदरांत!"

"माल गेला चोरबाजारांत! जा बसा धुंडीत चोरबाजार वाढूळ. पर अदुगर जबाब झाल्याशिवाय हितून हलायचं नाहीं!!"

"म्हणजे? तुम्ही कोण अडवणार मला?"

"अव रावसाहेब, चौकींत पाय घातला मंजी इन्स्पेक्टरसायबांच्या

हुकुमाशिवाय त्यो भाईर काढतां यायचा न्हाई. हितं येनं लई सोपं पर भाईर पडनं लई कठीण हाय!"

जमादार हेल काढीत म्हणाले. बाकीचे लोक फिदी फिदी हसूं लागले.

"मी नाहीं जाणत इन्स्पेक्टर बिन्स्पेक्टर!" असें म्हणून कान्होबा बाहेर पडणार, इतक्यांत दोन शिपायांनीं त्यांचे खवाटे धरले. हवालदार करडया स्वरांत म्हणाले,

"हितं बसा खुर्चीवर मुकाट सायब. येरीच मस्ती करन्यापुन कायबी फायदा नाय. वो सकारामा, मस्तीला चारशेबावन सेकशान लागतो, न्हव का रं?"

सगळी पोलीसचौकी कान्होबांच्या डोक्याभोंवती फिरूं लागली. जबाब, प्रतिजबाब, सह्या, साक्षी वगैरे सर्व विधी उरकतां उरकतां संध्याकाळचे सात वाजले. दरम्यान त्यांना तेथील लोकांनीं चार-पांच तरी चौक्यांत हिंडवलेंच असेल. शेवटीं एकदांचा तो फार्स संपला आणि थकलेल्या भागलेल्या कान्होबांनीं रात्रीची पॅसेंजर गांठली.

उजाडतां ते पुण्यास येऊन दाखल झाले. त्यांच्या चेहऱ्यावरूनच मुंबईच्या कामाचा फज्जा झाला असावा हें राधेनें ओळखलें. पण तोंडधुणें वगैरे होईपर्यंत ती कांहींच बोलली नाहीं. चहा घेतांना मात्र तिनें विचारलें,

"सांपडला का सगळा मुद्देमाल?"

"न-न-नाहीं. आजच सगळा नाहीं, पण हातीं लागेल हळूहळू!" कान्होबा म्हणाले.

"चोर तर सांपडला ना?"

"मग पोलिसांची बहादरी ती काय राहिली? अग, आतां त्याला जरा चवदावं रत्न दाखवलं म्हणजे तोच दाखवील सारा माल. हे तुमचे हीरो नानासाहेब उकिडवे बरं! बाबू चष्मेवाला तरी बरा यांच्यापुढं!"

इतकें ते म्हणत आहेत, तोंच ओसरीवरून आवाज आला, "कां बुवा ? कान्होबा, आज आमच्या नांवाचा एवढा जयघोष कां चालल्लाय् सकाळच्या प्रहरीं ?"

आवाजाच्या मागोमाग आंत आलेल्या व्यक्तीकडे नजर जातांच कान्होबांना आश्चर्याचा धक्का बसला. त्यांच्या तोंडून शब्दही धड बाहेर पडेनात. "ऑं ? म्हणजे ? असं कसं झालं ? न–न–नाना तूं इकडे कुठें ? काल तर होतास पोलीसचौकींत !" ते बडबडूं लागले.

"कोण मी ? हॉ, हॉ हॉ !" नाना मोठ्यानें हसूं लागला.

"इश्श. कांहींतरीच काय बोलतां ? तो कालपासून इथंच आहे ! अगबाई, मुंबईचा उन्हाळा तर बाधला नाहीं ना आपल्याला ?"

"चावटपणा पुरे झाला तुमचा !" कान्होबा गुरगुरले, "खरी भानगड काय आहे हें समजलं पाहिजे मला."

"भानगड कांहींच नाहीं. पहिल्या प्रथम हें आपलं पाकीट संभाळा !" असें म्हणत राधेनें पोलक्याच्या आंत छपवून ठेवलेलें पाकीट पटकन् कान्होबांच्या पुढ्यांत टाकलें. कान्होबांनीं एकाद्या अधाश्यासारखें तें तपासून पाहिलें. त्यांचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. पाकिटांत त्यांचें जिलेटचें पातें आणि बाकीचे जिन्नस जसेच्या तसे होते, मात्र पातें कालच्याइतकें गंजलेलें नव्हतें !

"क....कुठं मिळालं हें तुला ?"

"पार्सलहपीसच्या काऊंटरवर तें विसरून आलांत तुम्ही त्या दिवशीं ! मीं स्टेशनवर जाऊन चौकशी केली, तेव्हां तिथंच पत्ता लागला. पार्सलक्लार्कनीं तें स्टेशनमास्तरांजवळ देऊन ठेवलं होतं. आंतील कागदांवरून त्यांना आपला पत्ता कळला आणि रेल्वेच्या पोलीसाकरवीं ते आपली वस्तु आपल्याकडे पाठविणारच होते; इतक्यांत तिथं गेलें नि पाकिटाची चौकशी केली !!"

ही हकीगत ऐकून कान्होबांचें अगदीं आइस्क्रीम झालें.

"प....पण नाना तर मुंबईला गेला होता ना ?"

त्यांनीं घुटमळत विचारलें.

"छे. उकिडवेकाकूंनीं मला सांगितलं, कीं तो वाटेंत कल्याणला त्याच्या मामांच्याकडे उतरणार; म्हणून मींच केली त्याला एक तार आणि बोलावला परत! हो, म्हटलं आपल्या पायीं त्याला उगीच नको वनवास व्हायला!"

कान्होबा मनांतून चांगलेच वरमले. काय बोलावें हेंही त्यांस नीट सुचेना. गोंधळलेल्या मनःस्थितींत ते म्हणाले,

"अग, पण त्याच्या नोकरीचं काम होतं मुंबईत. तुझ्या तारेमुळं तो तसाच परत आला! केवढं नुकसान केलंस बरं त्याचं? त्यापेक्षां जरा दोन दिवस वाट पाहातीस तर? एकंदरींत धोरणच कमी बुवा तुम्हां बायकांना! काय नाना? खरं कीं नाहीं?"

नानानें नुसतेंच हसून आपला अभिप्राय प्रगट केला. कान्होबांच्या मनांत मात्र एका मागून एक प्रश्न उभे राहूं लागले.

"तें पातं कुठलं?"

"चौकीवरील पिंजऱ्यांतला तो गृहस्थ कोण?"

"मी बेधडक त्याची ओळख देऊन बसलों, त्याचं काय?"

"आणि वरती जबाबही लिहून दिला मीं मूर्खासारखा!!"

"छे छे! लचांडच झालं हें एक!"

❀


# डसला विंचू कि घरभरला!



**आपल्या** समाजांत अजूनही कांहीं वेडगळ समजुती कशा कायम आहेत याचें प्रत्यंतर मला त्या ‘ प्रसंगीं ’ मिळालें. विंचू चावल्याचा तो प्रसंग माझ्या स्मरणांतून कधींही जायचा नाहीं तुम्हांला त्याचीच गंमत आज सांगणार आहें मी.

गेल्या वैशाखांतली गोष्ट. आमचें घर आमच्या गोतांतल्या साऱ्या माणसांनीं गजबजून गेलें होतें. तुम्ही विचाराल, एवढं वऱ्हाड तुमच्या घरीं एकदम कसं जमलं ? खोटं कशाला सांगू ? वऱ्हाडच होतं तें. माझ्या बहिणीच्या लग्नाकरतां जमलीं होतीं तीं सारीं माणसं.

संध्याकाळीं मी माझ्या सौभाग्यवतीसह ( यापुढें मी तिचा सौ. असा संक्षिप्त उल्लेख करणार आहें. ) अक्षतीला निघालों होतों.



बोलावण्यांची मोहीम उरकीत उरकीत अंधार पडायच्या वेताला आम्ही शेवटच्या घरापाशीं येऊन पोचलों. या घरीं फक्त पुरुषांनाच बोलावणीं करायचीं असल्यामुळें सौ. गाडी घेऊन पुढें गेली. घर एका गल्लींत होतें. गल्लींत दिवा नसल्यानें काळाकुट्ट अंधार होता. जेमतेम अक्षत देऊन आम्ही घरांतून बाहेर पडलों आणि ठेंचाळत गल्लींतून चालूं लागलों. आम्ही म्हणजे मी नि भटजी !

चार पांच पावलें मी चाललों असेन नसेन, इतक्यांत निखाऱ्याचा स्पर्श व्हावा तसा माझ्या पायाच्या आंगठ्यास एक भयंकर चटका बसला. इतका भयंकर, कीं त्याच्या झटक्यानें माझ्या हातांतली चांदीची वाटी उडाली. लगेच भटजींनीं काडी पेटवून पाहिलें, तों विंचू. माझ्या आंगठ्याला डंख मारून बेटा तुरुतुरू दगडांच्या खोबणींत जाऊन लपायला पाहात होता. मी वहाण काढून हातांत घेणार, इतक्यांत काडी विझली.

मला तसाच सोडून देऊन भटजी धावत धावत घरांत गेले आणि एक कंदील घेऊन आले. मला वाटलें, वाटी पहायला आले असतील. पण छे, त्यांनीं वाटी माझ्या हातांत दिली आणि एका हातांत कंदील, नि दुसऱ्या हातांत वहाण घेऊन ते विंचू शोधूं लागले ! मीं म्हटलें, “ हें काय भटजी, शोधीत काय बसलां आहां ? अगोदर घरीं चला.”

“ थांबा बापूसाहेब, आत्तां शोधून काढतों त्या गुलामाला.”

“ अहो, त्याला कशाला शोधायचा ? एवढ्या दगडांच्या राशींत तो लौकर कसा सांपडणार ? ”

“ मारला पाहिजे त्याला.”

“ कां ? दुसऱ्यांना चावूं नये म्हणूनच ना ? ”

“ अं हं. विंचू मारला म्हणजे तुमचा विंचू उतरेल ! ”

“ भटजी, एखाद्या माणसाला ठेंच लागली, तर त्याच्या जखमेला

अगोदर औषध लावायचं, का ज्या दगडावर ती लागली तो दगड रस्त्यांतून उकरून काढण्याचा खटाटोप करीत बसायचं?"

"बापूसाहेब, ठेंच लागली तर तिचं विष राहात नाहीं. पण विंचू उतरायला रामबाण उपाय म्हणजे तो विंचू ठेचणं!"

"पण भटजी," मी जरा रागानें म्हणालों, "अगोदर तो चढेपर्यंत वाटच कशाला पाहायची? घरीं चला पाहूं आतां, लौकरच कांहींतरी औषधोपचार केला पाहिजे."

भटजींना आपला उद्योग सोडून द्यावा लागला. आम्ही दोघेही कसेबसे घरापर्यंत चालत आलों. पायाला रग लागल्यामुळें मला पाऊल चटचट उचलतां येत नव्हतें. भटजींना विंचवाची धास्ती बसली असल्यामुळें तेही दबकत चालत होते.

घरीं येतांच मी आमच्या नानांच्या खोलींत गेलों आणि भिंतीला टेकून जरा स्वस्थ बसलों. नानांवर माझा फार भरंवसा. त्यांना औषधांची फार चांगली माहिती असे. माझ्या विंचवावर ते तेव्हांच उतारा देतील अशी माझी कल्पना होती; परंतु दुर्दैवानें नाना घरांत नव्हते. जरूरीच्या कामानिमित्त ते जवळच्या खेड्यावर गेल्याचें समजलें.

दरम्यान भटजींनीं मला विंचू चावला हें घरभर जाहीर केलें. त्यामुळें सौ. घाबऱ्या घाबऱ्या मी बसलों होतों तेथें आली आणि काय झालं व कसं झालं तें सारं विचारूं लागली. तिचा रडकुंडीस आलेला चेहरा पाहून मीं तिला सर्व सांगितलें आणि थोडा धीरही दिला. तिनें चटकन् आपल्या पातळाची एक चिरटोळी फाडली आणि माझा आंगठा करकचून बांधला. पायाची आग कमी व्हावी म्हणून ती ओल्या फडक्यानें पायाला गार पाणी लावूं लागली.

"अगबाई कमळा, गार पाणी का ओतते आहेस बापूच्या पायावर?" माझ्या आईची चुलतमावशी 'बयो' कमरेवर हात ठेवून सौ. ची हजेरी घेऊं लागली.

"असं तुझ्या विंग्रजी पुस्तकांत दिलंय वाटतं मॅट्रिकच्या?" बयोनें सौ. चें वर्म काढलें.

"मग काय लावूं?" सौ. नें तिकडे लक्ष न देतां नम्रपणें विचारलें.

"घासलेटांत आंगटा बुडवून ठेव जरा." असें म्हणून बयोनं फसकन् एका चिमणीचा बर्नर काढून खालच्या टमरेलांत माझा आंगटा बुडविला. आंगठा बांधलेला पाहून तिनें विचारलेंच,

"हें काय, बांधलास कशाला?"

"असूं दे." मीं सांगितलें, "त्यानें विष बांधून राहातें."

"काय बापू, कशशं वाटतंय्?" माझे एक कोंकणांतले चुलतमामा विचारूं लागले आणि खोलींत येऊन त्यांनीं सरळ माझ्या उजव्या हाताला बैठक मारली. माझ्या पोटांत भीतीनें गोळा उठला, कारण आमच्या या मामांची वैद्यकीय कीर्ति सगळ्यांना ठाऊक होती. चोचे, डाग, बिब्बा, फासण्या, चिमटा, कोलदांडा वगैरे अघोरी शस्त्रकर्में करण्यांत ते फार पटाईत होते.

सौ. नें त्यांना सहज विचारलें, "आपल्याला नाहीं का एखादं सोपं औषध माहीत?"

"आहे तर काय झालं. अगदीं जहालीम औषध आहे पण तुम्ही विचाराल तेव्हां ना?" मामा वाद्या वर सारीत म्हणाले.

"चुकलें मी. माझ्या ध्यानांत नाहीं आलं!" सौ. नमतें घेऊन म्हणाली.

"बरं बरं, पाहूं या तर खरं." मामा जानव्याचें जुनें दांतकोरणें हातांत घेऊन पुढें झाले. "थोडं उकरून काढतों, चार फांसण्या मारतों, अर्ध्या तासांत उतारा. शद्या, ए शद्या, जरा थोडं पोट्याश परम्यांगानेट घेऊन ये पाहूं."

मामांचा अवतार पाहून मला कसेंसेंच वाटायला लागलें! मीं पायाची चाळवाचाळव केली. सौ. ला वाटलें, माझ्या वेदना वाढत चालल्या; म्हणून मी नको नको म्हणत असतांही तिनें माझा पाय मामांच्या हातीं दिला. त्यावर मामांनीं दांतकोरण्यानें आपलें

कोरीव काम सुरू केलें. माझ्या आरडयाओरडयाकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. जखम चांगली पोखरल्यावर त्यांनीं तिच्यांत पोटॅश परमँगनेट भरलें व वर कसलेंसें ॲसिडही आणून ओतलें. खरोखरीच त्याच्यामुळें होणाऱ्या आगीपुढं मला विंचवाच्या दंशाचा विसर पडला !

मामांनीं पेटवून दिलेली आग जराशी कमी होते न होते, तोंच फुपाटा आला ! म्हणजे माझ्या काकूची मामेबहीण अक्का तेथें उपस्थित झाली.

"हें काय, तुम्हींच का केलंत हें?" तिनें मामांना विचारलें.

"हो. कां?"

"जळ्ळं लक्षण तुमचं. विंचवाच्या दंशाला कुणीं कधीं तांबं लावलं आहे का?" दांतकोरण्यानें माझी जखम उकरलेली कळल्यामुळें अक्काबाई तेथें धावत आल्या होत्या. तिच्या त्या एकाच वाक्यानें सौ. चा चेहरा भयभीत झाला. कांहींतरी भलतीच गोष्ट झाली, अशा धास्तीनें ती मामांकडे आणि अक्कांकडे टकमका पाहूं लागली.

"हें बघ कमळा, अगदीं भिऊं नकोस. दांतकोरण्यामुळं कांहीं बिघडत नाहीं." मामांनीं तिला धीर दिला. अक्कांशीं त्यांचें कांहींतरी खाजगी वैर होतें. त्यामुळं त्या दोघांचा अबोला असे.

"हें बघ कमळा, आमच्या चिंतूला विंचू चावला होता ना तिगस्तां......."

अक्कांनीं सत्यकथा सांगण्यास आरंभ केला.

"हं!"

"तेव्हां पुष्कळ औषधं केलीं असलीं, तरी पण शेवटीं इकडच्या औषधानं गुण आला. आला म्हणजे कसा पण? अगदीं कानांत सांगितल्यासारखा विंचू जो उतरला, तो सप्तपाताळावेरी! अर्ध्या घटकेंत चिंतूला झोंप लागली."

"अगबाई, कुठचं औषध तें?" सौ. नें आतुरतेनें विचारलें.

"अगदीं सोपं आहे तें. सांगितलं तर हसाल तुम्ही."

माझ्या पोटांत धस्स झालें. अक्काबाईंच्या औषधापासून स्वतःचा बचाव करण्यासाठीं मी सौ. ची समजूत घालूं लागलों,

"विंचवाचं किनई, औषधावर नसतं फारसं. कुणाकुणाला विंचू अजिबात चढत नाहीं. चिंतूचं असंच कांहीं तरी असेल."

पण या 'युक्तीच्या चार गोष्टी' फुकट गेल्या. सौ. गाल फुगवून म्हणाली,

"हो, आपला मुळीं विश्वासच नाहीं कशावर! अनुभवाशिवाय एवढं हें कोण सांगेल? नुकसान तर कांहीं व्हायचं नाहीं ना औषध करून पाहिल्यानं?"

"नाहीं. पण माझ्यावर तुमचे हे प्रयोग........"

"सांगावं गडे औषध तें." सौ. नें सरळ अक्काबाईंची मनधरणी केलीच.

"औषध असं आहे," अक्काबाई सांगूं लागल्या, "एखाद्या लेकुरवाळीचे चार केस जाळून त्यांची राख लावा आंगठ्याला. आत्तां विंचू उतरेल."

लग्नाचें वऱ्हाड घरांत आल्यावर लेकुरवाळ्यांना काय तोटा? नाझी चौकशी करायला आलेल्या सुशीलामामीच आयत्या अक्काबाईंच्या तडाख्यांत सांपडल्या. खोलीच्या दारांत पाऊल ठेवतांच अक्कांनीं मामींच्या सैलशा अंबाड्यांतले चार केस हिसकले; परंतु त्यांचा बेत फिसकटला. त्या हिसक्यानें मामींचा अंबाडा सुटून त्यांतलें गंगावन अल्लाद अक्कांच्या हातांत आलें. आपल्या दांतांच्या ब्रशाएवढ्या केसांची चारचौघांत शोभा केल्याबद्दल मामी अक्कांच्यावर खवळलेल्या वाघिणीसारख्या तुटून पडल्या.

"पण बाई, मला काय माहीत तुमचीं हीं सोंगं? पोरीसोरी घालतात या शेपट्या, तें एकवेळ शोभून दिसतं. पण तुम्हांला ग कशाला या वयांत हीं थेरं? चांगली लेकुरवाळी तूं. आम्हांला मेल्यांनो नाहीं कधीं अशीं नाटकं करावीं लागलीं तीं?" अक्काबाई जोरजोरानें आपलें समर्थन

करूं लागल्या. त्यांचें भांडण पाहाण्याकरितां तेथें परिवाळें आणि लेकुरवाळ्या बायकांचा एकच तोबा उडाला, पण कुणी आपले चार केस कांहीं जाळायला देईना. अक्काबाईंचें औषध फुकट गेलेलें पाहून मी त्यांना म्हणालों, "जाऊं द्या अक्का, एवढ्या कष्टी कां होतां? आतां किनई तुमच्या वेळच्यासारखीं स्वार्थत्यागी माणसं राहिलीं नाहींत; कलियुग आहे हें !"

सगळींजणें हंसलीं; पण सौ. ला कांहीं सुचेना. अक्काबाईंचें औषध तयार करण्याकरितां तिनें आपल्या केसांना हात घातला होता, पण आपले युवराज अद्याप जन्माला यायचे आहेत याची मीं तिला आठवण करून देतांच ती हिरमुसली झाली. इतक्यांत तिच्या नशिबानें व माझ्या कमनशिबानें माझे एक चुलतीचे आतेभाऊ (कीं आत्याचे चुलतभाऊ?) पुढें झाले आणि हातावर तंबाखूचा खल करीत म्हणाले, 'आरे काय वाशलॅं थेए (घोळ) घॉऊन ? एक पॉल धयून आणा, कुणी तॉई !"

"पॉल ? पॉल कशाला ?" मीं भीत भीत विचारलें.

"त्याचं ऑश्शं आहे, दंशाची जागा पॉलीनं चाटलीन् म्हणजे कशलॉई जॉलीम विंचू असला, तरी धारेला लागलेल्या तरीसारखा वहात येतो बाहेर !" त्यांनीं एक पिंक टाकून खुलासा केला.

"जाऊं द्या अप्पा. आतां जागा उकरली आहे, तेव्हां पालीचंच विष बाधायचं एखाद वेळेस."

"हे: वेडा कुठचा. जा रे भावड्यॉं, पॉलीस पकडून आण बघूं !"

भावड्या या कामगिरीवर धावत निघाला आणि थोड्या वेळानें हातांत कायसेंसें घेऊन आला. तो हल्लींच बालवर्गांत जाऊं लागला होता, तेव्हां प्राण्यांची ओळख त्याला फारशी नसणार अशी शंका येऊन मीं अप्पांना म्हटलें, "पहा, त्यानें पाल आणलीय, का दुसरंच कांहीं ?" अप्पांनीं आपल्या धोतराचा पदर भावड्यापुढें पसरला आणि ते म्हणाले, "बघूं भावड्या, यांतमधें टाक बरें पॉलीस."

भावड्यानें हातांतला प्राणी अप्पांच्या धोतरांत टाकला, त्याबरोबर अप्पा घाबरून ओरडले, "अरे कारट्याँ, ही रे कुठची पॉल? हा तर बेडूक! अरे-अरे-धरा रे कुणी तरी याला!"



"अरे कारट्याँ, ही रे कुठची पॉल! हा तर बेडूक!"

अप्पा खोलींत नाचूं लागले. बेडूक उड्या मारी, तसतसे अप्पा मोठ्यानें किंचाळत आणि धावत. लहानपणापासून अप्पा बेडकाला अतोनात भीत हें मला माहीत होतें; पण तें त्या वात्रट भावड्याला कुणीं सांगितलें? त्या बेडकाला हुसकून लावतां लावतां मंडळींची कोण त्रेधा उडाली. ती पाहून मी मात्र क्षणभर माझें दुखणें विसरलों.

एवढा वेळ निवान्तपणें संध्या करीत बसलेले मोरूकाका आतां खोलींत प्रवेश करते झाले. जसें कांहीं काय झालें हें त्यांच्या गांवींच नाहीं, असा अजाण मुलासारखा चेहरा करून त्यांनीं विचारलें,

"काय आहे रे ही गडबड?"

“ बापूरावांना विंचू चावलाय्.” भावड्यानें त्यांच्या कानाजवळ ओरडून खुलासा केला.

“ लांब हो, शिवशील मला. केवढ्यानं ओरडतोय् गुलाम. ऐकायला येतंय् मला चांगलं !” भावड्यावर हात उगारून ते खेंकसले. भावड्या पळाला.

“ फोनोची तवकडी उगाळून लावली का कोणीं ?” त्यांनीं सौ. ला विचारलें.

“ खरंच, तेवढं वरीक राहिलंय.” बयो म्हणाली.

“ आणा पाहूं एखाद्या तडकलेल्या तबकडीचा तुकडा.”

झालें. घरभर फोनोच्या तबकडीकरतां धावपळ सुरू झाली. फोनो सांपडला, त्याच्या तबकड्याही सांपडल्या; पण तडकलेली अशी एकही हातीं लागेना. खरंच, हा मोठा चमत्कार वाटतो. आपल्याला वस्तु नको असली म्हणजे ती हवी तेवढी सांपडते. घरांत मुलांच्या खेळांत तबकडीचे तुकडे मीं किती तरी वेळां पाहिले होते, पण आतां आम्हांला तुकडा हवा होता ना ? मग तो कसा सुखानें सांपडेल ?

शेवटीं सौ. म्हणाली, “ नसला तुकडा सांपडत तर फोडा एखादी जुनी रेकॉर्ड. अशा वेळीं कुणी रेकॉर्डकडे का पाहात असतं ?”

एवढें म्हणण्याचा अवकाश. सगळ्या रेकॉर्डांचा ढीग दामूकडून खोलींत आणविण्यांत आला. पण रेकॉर्ड कोणतें मोडावें यावर आमचें भांडण सुरू झालें !

“ ही मलकाजानची कवाली आतां जुनी झालीय्. टाका हीच फोडून !” सौ. म्हणाली.

“ वाहवा, तिच्यासारखी कवाली आतां ऐकायला मिळायची नाहीं.” अप्पा.

“ मग ही टेंब्यांची पेटी ?”

“ कशाली आहे ?” मामा.

“ वद जाऊं कुणाला शरण....!”

" उद्यां श्रीमंतपूजनाच्या वेळीं लावा हां ती. " सुशीला मामी.

" वरं हा तराणा ? " सौ. नें विचारलें.

" अग, ती नानांची पेटंट प्लेट ! " मीं आठवण दिली.

शेवटीं एकदांची वाजंत्रीची एक प्लेट फोडावी असें ठरलें. दामूनें बाहेर जाऊन वरवंट्यानें तिचे तुकडे केले. मोरूकाकांनीं एक तुकडा सहाणेवर गंधासारखा उगाळला आणि सौ. नें त्याचा लेप माझ्या आंगठ्यावर घातला.

माझ्या खोलीच्या आंत व बाहेर घरांतल्या बायका-पुरुषांनीं आतां एकच गर्दी करून सोडली. ज्यांच्या काकेमाम्यांना अगर भाच्या-पुतण्यांना कधींकाळीं विंचू डसले होते, त्यांच्या नवलकथा सांगण्यास त्यांनीं आरंभ केला. त्या त्या प्रसंगीं विंचवाच्या दंशावर करण्यांत आलेल्या अनेक उपायांची त्या इतिहासांत खानेसुमारी झालीच. ती कटकट मला इतकी त्रासदायक होऊं लागली, कीं मीं डोळे मिटून घेतले आणि त्यांच्या संभाषणांत मुळींच भाग घ्यायचा नाहीं असें ठरविलें. बऱ्याच वेळानें ही गोष्ट त्यांच्या लक्षांत आली. सुशीलामामी एकदम म्हणाल्या, " काय ग कमळा, बापू बोलत कां नाहीं ? "

" त्रास होत असावा फार. " सौ. नें सूतोवाच केलें.

" अगोबाई, " अक्कांनीं शंका काढली, " दांतखीळ तर बसली नाहीं ना ? "

" म्हणजे ? " मामा गंभीर चेहरा करून विचारतात, " विंचू चावल्यानं वांचा जातं वाटतं ? "

" आमच्या चिंगीच्या वेळीं असं झालं होतं खरं ! " मोरूकाकांनीं निर्वाळा दिला.

" म्हटलं, कसं वाटतंय आतां आपल्याला ? " सौ. नें खरोखरीच घाबरून कांपऱ्या आवाजानें विचारलें, मीं तिचा हात दाबूनच नुसतं ' ठीक आहे, भिऊं नको ' असें दर्शविलें.

" मला वाटतं, मांत्रिकाला बोलावून घ्यावा. " अप्पांनीं सूचना केली.

" हें पहा, आणणार असलांत तर फावडे गल्लींतल्या घारेशास्त्र्यांना आणा. विंचवाचा मंत्र घालणारा साऱ्या पंचक्रोशींत त्यांच्याइतका दुसरा जरवी मनुष्य नाहीं ! " मोरूकाकांनीं आपला अनुभव सांगितला. फावडे गल्लीचं नांव ऐकतांच मी दचकलों, कारण त्याच गल्लींतून या नाटकाला आरंभ झाला होता.

ठराव पास होऊन सदूला मांत्रिकाकडे पिटाळण्यांत आलें. तो मांत्रिकाचा निरोप घेऊन आला, " दंशिताच्या डोक्याला कडुलिंबाचे टहाळे बांधा. गार पाण्यांत पाय बुचकळून ठेवा. गोमूत्रानें स्नान घाला. दारावर गंधानें दोन सटवाया काढा आणि दोन लिंबें नि चतकोर भाकरी तयार ठेवा. गुरुजी म्हणाले, तुम्ही एवढी तयारी करा तंवर मी येतोंच ! " अर्थात् मांत्रिकाच्या सूचनेबरहुकूम एकेक विधी सुरू झाले. माझ्या डोक्याला कडुलिंबाच्या मुंडावळी बांधण्यांत आल्या; इतक्यांत हे सोपस्कार पसंत न पडून सौ. नें तक्रार केली,

" पण मी म्हणतें, गोखले डॉक्टरांना आणून दाखवलं, तर काय बिघडेल ? "

" इश्श, " बयो गरजली, " यांत ग काय कळतंय डॉक्टराला, कमळे ? हें विषबाधेचं काम. विंचू म्हटला, म्हणजे कसाही डॉक्टर असला तरी त्याच्यापुढें नांगी टाकतो ! "

" छे छे छे, डॉक्टराचं काम नाहीं हें ! "

" आमची चिंगी, चार तास कोकलत होती. डॉक्टरानं पुष्कळ सुया घातल्या, औषधं फासलीं, पण ढिम्म झालं नाहीं ! "

असे जिकडून तिकडून बयोच्या शब्दांचेच प्रतिध्वनि उमटल्यामुळें सौ. ला अधिक बोलण्याचा धीर झाला नाहीं. अशा तऱ्हेनें जवळ जवळ अर्धा तास निघून गेला, तरी शास्त्रीबुवांचा पत्ता नाहीं. तेव्हां पुन्हा एकदां सदूला तिकडे पिटाळण्यांत आलें.

अंमळशानें सदू धावत धावत आला आणि घाबऱ्या घाबऱ्या सांगूं लागला, " शास्त्रीबुवा यायला निघाले होते, पण........ "

"पण काय?" सगळ्यांनीं एकदम विचारलें.

"जोडयांत पाय घालतांक्षणीं त्यांना जोड्यांतला विंचू डसला."

"डसेना का? मांत्रिकाला काय त्याचं?"

"मी गेलों तेव्हां ते मोठमोठ्यानें ओरडत लोळत होते. मला म्हणाले, 'शास्त्रीबुवा मेला तुझा, तूं चालता हो!'"

"लोळतील कसे?" बयो म्हणाली, "मंत्र घालीत असतील."

"कुणाला ठाऊक?" सदूनें उत्तर दिलें. "गडबडा लोळत होते खरे. अग आई, अयाई ग, मेलों, असं ओरडतही मधून मधून. मी यायला निघालों, तेव्हां म्हणाले, 'तुझ्या घरीं फोनोच्या प्लेटचा तुकडा असला तर घेऊन ये बरं बाळ!"

"वाहवा, मोठा पराक्रमीच दिसतो हा मांत्रिक!" मामा डोळे मिचकावीत मोरूकाकांना म्हणाले. सगळीं माणसें हसूं लागलीं. मलाही हसूं आवरेना, त्यामुळें माझ्या मौनाचें बिंग फुटलेंच.

"अरे हा हसतोय," मोरूकाका ओरडले, "कोण म्हणतंय याची दांतखीळ बसली म्हणून?"

"खरं सांगायचं म्हणजे मला झोंप यायला लागली होती," मी धीर करून स्पष्टच बोललों, "पण तुमच्या गलक्यामुळें स्वस्थता मिळेना!"

हें ऐकून मंडळी उमगली. एकेकजण खोलींतून पाय काढूं लागला! सौ. मुकाट्यानें माझें अंथरूण घालूं लागली. पांच मिनिटांत गर्दी नाहींशी झाली. खरोखरीच त्या गोंधळापायीं मला इतका शीण आला होता, कीं गादीला पाठ लागतांच विंचवाच्या वेदना होत असतांही माझा डोळा लागला! झोंपेपुढें आंगठ्यांत टोचत राहाणाऱ्या शेकडों सुयांचेंही मला विशेष दुःख वाटेना!

* * *

मी जेव्हां जागा झालों, तेव्हां बाहेर चांगलीं उन्हें पडलेलीं दिसत होतीं. घड्याळाकडे पाहिलें, तों दुपारचे दोन वाजलेले. मी उठून तोंड धुतलें आणि सौ. ला हांक मारली.

पण तिला ती कसची ऐकूं जाणार? घरांत जोराची भांडाभांडी चालू असल्याचें मलाच स्पष्ट ऐकूं येत होतें. भांड्यांची आदळ-आपट भरीला असल्यामुळें घराला तांबटआळीचें स्वरूप आलें होतें. सारीं माणसें अगदीं वरच्या पट्टींत ओरडत होतीं. जरा पुढें होऊन मीं कानोसा घेतला. त्यांच्या भांडणाचा विषय ऐकून मला हसूं आलें.

तुम्हांलाही तें आलें असतें. माझा विंचू खरोखरी कोणाच्या औषधा-मुळें उतरला, या प्रश्नावर तें रणांगण माजून राहिलें होतें! कालच्या रात्रींतलीं सगळीं सोंगें या भांडणांत मोठ्या हिरीरीनें भाग घेत होतीं. प्रत्येकाचें म्हणणें, "माझ्याच औषधानं बापूला गुण आला!"

शेवटीं नाना खेड्यावरून परत आले, तेव्हां वादाचा निकाल लागला! सगळा प्रकार त्यांनीं सौ. कडून विचारून घेतला. वादीप्रतिवादींच्या जबान्याही त्यांना ऐकून घ्याव्याच लागल्या. सगळ्यांचें म्हणणें संपल्यावर त्यांनीं अगदीं शांतपणें आपला निकाल जाहीर केला, "अरे कसले तोडगे नि कसलीं औषधं? विंचवाचं शास्त्र असं आहे, कीं सरासरी बारा तासांनीं त्याचा वेग कमी होतो आणि चोवीस तासांनीं तो साफ उतरतो. आपण उगीच आपल्या समाधानाकरतां औषधं करतों इतकंच!"

नानांची ती अधिकारवाणी ऐकून साऱ्या युद्धमान राष्ट्रांचीं तोंडें जरदाळूसारखीं झालीं असल्यास नवल नाहीं. मी पटकन माझा कॅमेरा घेतला आणि एखाद्या भुतासारखा त्यांच्यासमोर जाऊन उभा राहिलों!

❀




त्या दिवशीं आमचा मोठा साहेब कचेरी पाहायला यायचा असल्या-मुळें माझी गडबड उडाली होती. सकाळीं आठ नाहीं वाजले, तों ह्पीसचें काम मीं हातावेगळें केलें आणि आतां आंघोळीला जाणार, इतक्यांत खिडकीवर टप्‌दिशीं आवाज आला. कोणीं तरी हळूच डोक्यांत टप्पल मारावी तसा मी दचकलों.

रामप्रसादांच्या अनारनें गलोल घेतल्यापासून माझ्या त्या खिडकीच्या तावदानांना आतांपर्यंत सहा भोकें पडलीं होतीं. आतां आणखी सातवें पडायला नको म्हणून मीं चटकन् खिडकी उघडली. पाहतों तों अनार आपल्या लाडक्या गोफणीनें माझ्या खिडकीचें निशाण करून नेमबाजीचे प्रयोग करीत आहे. खिडकी उघडल्याबरोबर गलोल फिरवीत तिनें ललकारी दिली, "जोशी काऽऽऽऽका!!"

बंदर बागेंतले सारेच शेजारी अनारचे काका होते.

"गंमत सांगूं का तुम्हांला काका?" अनार आपल्या मानेला एक झटका देऊन आपले रेशमी केस जागच्या जागीं फेकून म्हणाली, "शनिवारीं किनई माझा वाढदिवस आहे असं पपा म्हणतात. वाढदिवसाला खूप मज्जा करायची आहे. पपा म्हणाले, 'तुझ्या आवडत्या मित्रांना बोलाव आपल्या पार्टीला!' पार्टी म्हणजे काय हो काका?"

"पार्टी म्हणजे फार गंमत असते अनार. खूप लोक येतात जेवायला. जिलेबी करायची असते त्या दिवशीं, हां, जिलेब्बी...." तिला

म्हणायला सुरुवात करीत आणि ढेकण्यांचा एक डोळा अगोदरच फिरायला गेला असल्यामुळें ते संतापत व कानांत बोटें घालीत!

घरीं गेल्यावर मीं ती सारी हकीगत गंमत म्हणून शैलेला सांगितली; परंतु ती फणकाऱ्यानें म्हणाली, "न का जाईनात ढेकणे! आपण तरी कुठं जात आहोंत?" फटाक्याचा बारच वाटला मला तो!

"म्हणजे?" मीं विचारलें.

"कावळ्यांची मंडळी येणार आहेत ना तिथं!"

"कुणीं सांगितलं?"

"अनारच म्हणाली."

आमचें तसें कुणाशीं भांडण नव्हतें. पण कावळे! फारच ओंगळ मनुष्य तो. येतां जातां त्याचें मार्क्स न् लेनिनशिवाय दुसरें बोलणें नाहीं. आमचें चार खंडीचें कोंकणांतलें शेत बेटयाच्या डोळ्यांवर आलें होतें. 'भांडवलवाले' म्हणायचा आम्हांला. पान खाऊन तोंडाचा सदोदित लालबावटा. बोलणें नेहमीं घसा खरवडून. प्रत्यक्ष पंचाग्नीच जसा कांहीं. त्यामुळें आमचें विशेष जमत नसे. अर्थात् शैलेला मी म्हणालों,

"खरं आहे तुझं म्हणणं. तीं सोंगं तिथं जाणार असतील, तर आपण आपलं चार पावलं दूर राहिलेलं बरं!"

९५९३
१४९३२

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उजाडतां मी अनारला आमच्या छोटया बागेंत बोलावलें आणि जड अंतःकरणानें ती बातमी तिला सांगितली. अनारचे डोळे लागलीच डबडबले.

तिला समजावण्याकरितां मी म्हणालों, "हें बघ अनार, जरी जेवायला आलों नाहीं, तरी एका माणसाला आम्ही एक जम्मत देणार. मोठी मोठी जम्मत. तर मग खूष कीं नाहीं? आं? हां, मग हस पाहूं आतां!"

खरेंच तिला खुदकन् हसूं आलें. लहान मुलांचें हें असें होतें. क्षणांत ऊन तर क्षणांत पाऊस!

ऑफिसमध्यें पाऊल टाकतांच अचानक परदेशीच भेटले. भेटल्याबरोबर प्रश्न, "काय जोशी, जाणार का अनारच्या वाढदिवशीं?"

" तुम्ही ? "

" काय करावं, मोठा पेंच पडलाय. किती गोड शब्दांनीं बोलावलंन् पोरीनं. फार लोभ तिचा माझ्यावर. जितकी वात्रट तितकीच मिठ्ठी आहे बेटी. पण हा लेकाचा भडाग्नि... "

" कोण भडाग्नि ? "

" लंबोदर ढेकणे हो. तो अडमडणार आहे ना तिथं ? म्हणून तर सारं मुसळ केरांत गेलंय्. अन् मी ऐकतों, कावळ्यांचंही तसंच झालंय थोडंसं. तुम्ही जाणार हें ऐकल्याबरोबर कावळ्यांनीं नकार दिला. "

" जाऊं द्या झालं पांडोबा. आतां कांहीं तरी देणगी देऊन प्रसंग साजरा करावा झालं. "

" तसंच ठरवलंय् मीं. "

परदेशी आपल्या कामाला निघून गेले. पण माझ्या मनांत एक किंतु उत्पन्न झाला. अनारनें दिलेल्या निमंत्रणांचा गोंधळ मला जरा चमत्कारिक वाटूं लागला. तो सहज उद्भवला असेल कीं काय याची शंका उत्पन्न झाली. खुद्द रामप्रसादच विश्रांतिगृहांत भेटले, तेव्हां त्यांच्याजवळ मीं गोष्ट काढली,

" कसं काय बाबूजी, शनिवारीं पार्टी देणार म्हणे जंगी ? "

" कसली ? " त्यांनीं गोंधळलेल्या मुद्रेनें प्रश्न केला.

" वा, जसे कांहीं त्या गांवचेच नाहीं. अहो, अनारच्या वाढदिवसाची ? "

" आश्चर्य आहे. "

" आं ? "

" ही हूल उठवली तरी कोणीं ? "

" म्हणजे ? पार्टीबिर्टी सगळ्या गप्पाच का ? " मीं अडखळत विचारलें.

" तर काय हो. देशावर जाऊन आलों त्यांत फार खर्च झाला. आतां पार्टीला पैसे कुठून आणूं ? "

एवढें बोलून बाबूजी उठून गेले नि ढेकणे, कावळे आणि कंपनी आंत आली. अर्थात् कावळे नि परदेशी एका टेबलापाशीं व ढेकणे नि

मी दुसऱ्या टेबलापाशीं अशी विभागणी झाली. आमच्या कुजबुजीमुळें तेथील वातावरण सुंद होऊन गेलें. मधून मधून आम्ही आमच्या सामनेवाल्यांकडे तिरस्काराचे कटाक्ष फेकीत होतों. आजकालच्या अहिंसक वातावरणास अनुकूल असे नयनबाण हेंच काय तें आमचें लढाईचें शस्त्र असे!

पण असें किती वेळ चालणार? गांवांत आग लागल्यावर विहिरींचें भांडण कुठवर चालणार? आमच्या परदेशांना लवकर वाचा फुटली आणि प्रथम आपल्या हास्यविनोदानें त्यांनीं वातावरण पुष्कळ हलकें केलें. सगळ्यांचें संभाषण साहाजिकच सरतेशेवटीं एका मुद्द्यावर आलें.

"आतां चक्क उजेड पडला!" कावळे म्हणाले, "त्या पोरीनं बनवलंन् सगळ्यांना. पार्टीबिर्टीच्या साऱ्या थापा. तिनं मुद्दामच बोलावणीं अशा खुबीनं केलीं, कीं कुणी जेवायला तर येऊंच नये, पण प्रत्येकाकडून बक्षीस मात्र उपटतां यावं."

"काय वस्ताद पोरी हो या!" परदेशी कौतुकानें उद्गारले.

"कौतुक कसलं करतां कार्टीचं त्या?" ढेकणे गंभीर स्वरानें म्हणतात, "एवढ्या लहान वयांत असल्या हिकमती कांहीं चांगल्या नाहींत. मोठेपणीं नडतात हीं अवचिन्हं."

"बरं, पण आतां पुढं काय!"

"एवींतेवीं आपल्याला तिच्याकरतां वस्तु ह्या खरेदी कराव्या लागणारच. तेव्हां मी म्हणतों, आपण अशा कांहीं देणग्या द्याव्या, कीं आपोआप कान टोचले गेले पाहिजेत तिचे. मग तिला त्या आवडोत अगर न आवडोत!"

"कबूल." सर्वांनीं हात वर केले.

"स्त्रीशिक्षणावरून इस्त्री! हा आमच्या कृष्णाजीपंतांचा नवीन ग्रंथ बक्षीस देण्यास योग्य आहे." ढेकणे म्हणाले. केवळ पुन्हा भांडणें नकोत म्हणून तिला आम्हीं पाठिंबा दिला.

"भरतकामाचं साहित्य." कावळे पुटपुटले. तेंही पास झालें.

"एक हजार पाकक्रिया!" मीं सूचना मांडली.

"नवीन चकलीच्या सोऱ्या!" कुणीसें म्हणालें.

"तिला खाणावळ का काढायची आहे पुढें मोठेपणीं?" परदेशांनीं विचारलें.

"बरं, मग ठोकळ्यांचं रामायण द्या!" कावळे.

"हो, म्हणजे सगळ्यांचीं तावदानं फोडायला बरी सोय झाली!" मी.

"असूं द्या हो," परदेशी आग्रह करूं लागले, "मात्र एक लाल बावटाही घेऊन द्या, म्हणजे कावळे खूष."

आम्ही लगेच बाजारांत गेलों आणि वरील प्रकारच्या निरुपद्रवी, कडवट पण आमच्या मतें अनारला वठणीवर आणण्यास योग्य अशा वस्तूंची खरेदी केली. नंतर विलायती पद्धतीप्रमाणें त्या साऱ्या वस्तु आमच्या अभिनंदनपर चिठ्ठयांसह तिच्याकडे पाठवून दिल्या. "कशा लागतील या कोयनेलच्या गोळ्या?" असे उद्गार काढून आपण आज केवढी बहादुरी केली अशा फुशारकीनें आम्ही हसत हसत परतलों.

बंदरबागेंत आम्हीं पाऊल टाकतांच आम्हांला कोण सामोरें आलें असेल बरें? दुसरें कोण? खुद्द बाबूजींची स्वारी! आम्हांला नमस्कार करून ते हसत हसत म्हणाले, "साहेबजी, औरत की करामत सबसे और रहती है!"

"म्हणजे?"

"अहो, आमच्या मागं बाईसाहेबांनीं सारा बेत ठरवूनही टाकला होता! आम्हांला पत्ताही लागूं दिला नाहीं."

"कसला बेत?" आम्हीं बिचकून विचारलें.

"अनारच्या वाढदिवसाचा. तिच्या मैत्रिणींना बोलावलंच आहे, पण आपणही सर्व मंडळींनीं शनिवारीं अवश्य आलं पाहिजे. अनारची शपथ आहे तशी."

आतां असें खिंडींत गांठल्यावर आम्ही तरी काय म्हणणार?

( वा. न.

"वा, वा, फार आनंदाची गोष्ट. अनारला भेट म्हणून आतांच कांहीं वस्तु आम्हीं आपल्या घरीं पाठविल्या आहेत. त्या तिला द्या आणि आम्ही सारे काका तिचा एकेक गालगुच्चा घ्यायला येणार आहोंत असें सांगा तिला !" असें कांहीं तरी बोलून मीं सर्वांच्या वतीनें त्यांच्या निमंत्रणाचा स्वीकार केला.

परंतु आम्ही आमच्या बायकांसह जेव्हां शनिवारीं सकाळीं रामप्रसादांच्या घरीं गेलों, तेव्हां पुढचें दार लागलेलें दिसलें. घरांतही अगदीं सामसूम ! अनारनें आपला वाढदिवसाचा नवीन नेम इतक्या नेमानें पाळल्याबद्दल मी मनांतून तिला धन्यवाद देऊं लागलों. आमची चाहूल लागतांच कमलदेवींनीं ( अनारची आई ) दार उघडलें. त्यांचा चेहरा पाहून मात्र माझ्या पोटांत धस्स झालें. सारिडॉनच्या जाहिरातींत बाई असते ना एक ? तिच्या चेहऱ्यासारखा अगदीं पडलेला होता तो. आम्हीं मुकाट्यानें आंत गेलों.

"काय सांगूं आपल्याला भाईसाहेब !" कमलदेवी म्हणाल्या, "काल दुपारपर्यंत पोर चांगली खेळत होती हो. अन् संध्याकाळीं जो ताप भरला, तो एकदम एकशेंचार ! आमच्या तोंडचं पाणीच पळालं. सगळ्या आनंदाचा विरस."

"अगबाई," शैला उद्गारली, "पण झालं तरी काय तिला असं ?"

"गालगुंड !"

बाप रे ! गालगुंडाचें नांव काढतांच आम्ही केवढ्यांदा दचकलों. मी तर माझ्या गालफडांवरून हातही फिरवून पाहिला. परदेशींनीं पाऊल मागें घेतलें. बायका तर चांगल्याच घाबरल्या. गालगुंडाची सांथ चारच वर्षांपूर्वी आमच्या बंदरबागेंत येऊन गेली होती, तिची आटवण सगळ्यांना अजून ताजी होती. भयंकरच ती सांथ !

कमलदेवी म्हणाल्या, "मुलांना मीं तसंच लावून दिलं परत. पण तुम्हांला कांहीं एवढं भ्यायचं कारण नाहीं असं डॉक्टर म्हणाले अन् पोरीनंही सारखा ध्यास घेतलाय तुम्हांला भेटायचा. तुमच्या भेटी तिला

मिळाल्यावर तुम्हांला एक गाणं म्हणून दाखवायचं तिनं ठरवलं होतं. मग येतां ना जरा माडीवर ?"

पुन्हा आम्ही खिंडींत सांपडलों. कसें केलें, तरी शेजारधर्म होता आमचा ! तिची विचारपूस केल्याशिवाय जाणें अशक्य होतें. आम्ही चोरपावलांनीं कमलदेवींच्या मागोमाग माडीवर गेलों. माझें मन मला खायला लागलें होतें.......बिचारीच्या ऐन वाढदिवशीं आपण अशा देणग्या देऊन तिची खोडी काढायला नको होती. कसें केलें, तरी ती एक अचपळ पोर आणि तिनें खरोखरीच भावड्या मनानें आपल्या आवडत्या काकांना बोलावलें असलें तर ? आपण कांहींतरीच विकल्प काढला आणि तिच्याशीं प्रतारणा केली. त्यांतून बिचारी तापानें फणफणत पडलेली. किती दुराग्रही आम्ही. एवढ्याश्या टीचभर पोरीच्या वाटेला गेलों.......असे पश्चात्तापाचे विचार माझ्या डोक्यांत येऊं लागले. बाकीच्यांच्या मनांतही त्यांचेच पडसाद उठत असावेत हें त्यांच्या चेहऱ्यावरून स्पष्टच दिसत होतें.

अनार एका लहानशा खाटेवर पांघरूण गुरफटून मलूल होऊन पडली होती. ज्या गालाचा गालगुच्चा घेण्यास आमचे हात नेहमीं पुढें व्हावे, तो गाल गुरोळीसारखा फुगल्यामुळें आम्हांला पाहावतही नव्हता. डोळ्यांवर तापाची झांपड आलेली दिसली. चेहरा काळवंडून गेला होता. समोरच्या मेजावर आम्हीं दिलेल्या देणग्या व्यवस्थितपणें मांडून ठेवलेल्या दिसल्या. भरतकामाकरतां लोकर आणि रफियाचे गुंडेही आणलेले दिसत होते.

आम्ही ममतेचे चार शब्द कसेबसे बोललों. तिनें डोळे उघडले आणि अतिशय क्षीण आवाज काढून ती म्हणाली, "तुम्हीं बक्षिसं दिलींत तीं मला आवडलीं काका; खूप नाहीं आवडलीं, पण त्यांच्याशीं खेळल्यावर तीं मला आणखी आवडतील. जोशीकाका, मला वाटलं, तुम्ही बिगूल वाजवाल एखादा !...मी गाणं म्हणून दाखवूं का तुम्हांला एक ?" आणि खरोखरीच ती आपल्या मंजूळ कांपऱ्या आवाजांत,

"क्षणोक्षणिं पडे, उठे परि बळें पुन्हा वापडी...." ही कविता म्हणूं लागली.



अनार एका लहानशा खाटेवर पांघरूण गुरफटून मलूल होऊन पडली होती.

एकंदर वातावरण करुणरसानें इतकें भरून गेलें, कीं आमच्या मनांतले पश्चात्तापाचे बोल आम्हांस आणखीच भेडसावूं लागले. आम्हीं केलेल्या खोडसाळपणाचें परिमार्जन आतां कसें तरी करायला पाहिजे होतें. खिशांत माझ्या हाताला लागले तेवढे दोन रुपये मी एक उपरति-निदर्शक हास्य तोंडावर फडकावीत तिच्या हातांत खाऊ म्हणून दिले. ढेकण्यांनीं पांचाची नोट दिली. कावळ्यांनींही कांहीं तरी

ह्यातावर ठेवलेंच. सर्वांनीं माझें अनुकरण केल्यावर आम्हीं गोड शब्दांनीं अनारचा निरोप घेतला. त्या रात्रीं आमच्यापैकीं कोणालाच झोंप आली नाहीं.

दुसऱ्या दिवशीं क्लबांत रामप्रसाद भेटतांच मीं विचारलें, "आतां कशी आहे अनार?"

"अगदीं छान. आतांच मुकुंदाकडे खेळायला गेलीय्!" त्यांचें अनपेक्षित उत्तर आलें. मी चकित झालों.

"थट्टा नका करूं बाबूजी, खरंच सांगा ना, तिचं कसं आहे?"

"अहो, थट्टा नाहीं जोशी. ती पोर भारी बिलंदर. आमच्याकडून तिनं वाढदिवसाची देणगी म्हणून रंगांची पेटी घेतलीन् मागुन आणि केलंन् काय माहीत आहे का?"

"सांगा, सांगा."

"तें गालगुंडाचं सारं नाटक केलंन्. एखाद्या धंदेवाईक नाटक्याला मागं टाकलंन् चिमखडीनं. तुम्ही खाऊ देऊन गेलांत मात्र! लगेच तोंडांतला चेंडू टाकून दिलान्, पांघरुणं भिरकावलीन् आणि तोंडावरचं रंगकाम सगळं पुसून टाकलंन्. उड्या मारीत आमच्यापुढं येऊन उभी राहिली, तेव्हां आजाराचा लवलेश नाहीं! डॉक्टरांना देखील वनवलंन् तिनं काल!"

मी वेडयासारखा 'आ' वासून त्यांचे उद्गार ऐकत होतों. हंसावें कीं रडावें हेंही समजेना. उत्तर काय द्यावें, या विचारांत मीं गटांगळ्या खात आहें, तोंच क्लबाच्या मागच्या बाजूस मोठमोठे आवाज नि गलका ऐकूं आला. पाहातों तो अनारनें आपल्या सर्व बाळगोपाळांची एक मिरवणूक काढली होती. अग्रभागीं एक बंबी आगबोट कर्णकठोर शिट्या फुंकीत होती. तिच्या मागून कुणी पडघम, कुणी बिगूल, कुणी पिपाण्या, कुणी हवाई बंदूक, कुणी बेंडबाजा अशीं सर्व प्रकारचीं वाद्यें वाजवीत ऐटीनें चालले होते. तुतुर तुतुर तुर्रर, ढमक ढम् ढम् ढम्! पों पों, पॉम्

'पॉम्', इत्यादि गगनभेदी आवाजांनीं सगळा बंदरबाग हादरत असल्याचा मला भास झाला.

"ओहोहो, कुठून एवढीं इरसाल वाद्यं जमा केलीं या कार्ट्यांनीं ?" मी चिडून म्हणालों.

"कालच्या खाऊंतून अनारनं आपल्या सोबत्यांना वाढदिवसाच्या या देणग्या दिल्या आहेत !" रामप्रसादांनीं खुलासा केला आणि तेही मिस्किलपणें हसले !

❀




"**बरं** का काकू, गाडी फार वेळ उभी राहात नाहीं. तुम्ही पटकन् चढून जागा पकडा. मी सामान आंत टाकतों. हां बगम, पुढं जायचं नाहीं हां. अग, तूं हात धर पाहूं त्याचा. नाहीं तर धावेल तो एखादे वेळीं."

याप्रमाणें सर्वांना 'होशियार' करून मी दोन हातांत दोन आणि बगलेंत दोन असे चार बोजे घेऊन प्लॅटफार्मवर उभा राहिलों आणि गाडी स्टेशनांत येतांच समोरच्या दाराकडे मुसंडी मारली. "औरतका डब्बा, ये औरतका डब्बा...." असं ओरडत एका माणसानं माझ्या पायांत तंगडी घातली नसती तर मला कांहीं त्या दिवशीं जागा मिळती ना. त्यानें केलेल्या पदक्षेपामुळें मीं फलाटाला नमस्कार घातला खरा. पण त्यामुळें माझ्या हातांतले बोजे निसटून महंमद निसारच्या चेंडूसारखे तात्काळ समोरच्या डब्यांत जाऊन पडले.

गाडी कितीही उभी राहिली, तरी आम्हांला ती लवकर सुटल्यासारखीच वाटायची. कोण धांदल असे आमची सामान लावण्याची!

"अहो, तेवढी ट्रंक बांकाखालीं सारा."

"छे छे मिस्टर, ती वळकटी वरून खालीं पडेल हो."

"अगबाई, ट्रंकेचं कुलूप समोर नको का यायला?"

"मला वाटतं ब्यागेचं झांकण नीट लागलं नाहीं बापू."

अशा उद्गारांच्या कोलाहलांत मीं सामान कसं तरी जिथल्या तिथं वसवलं आणि एकदां हुश्श केल्यावर खिडक्यांची उघडझांप करीत बसलों. आगगाड्यांच्या खिडक्या उघडणें आणि मिटविणें हीं कामें बंदुक भरणें नि उडवणें या कामाइतकींच जोखमीचीं असतात, हें आज कित्येक वर्षांच्या अनुभवावरून माझ्या मनांत पक्कें ठसलें आहे. रेल्वे कंपन्यांनीं उतारूंवर उगवलेला सूडच तो; अन् त्यांतल्या त्यांत माझ्यासारखा धांदरट माणूस भेटल्यावर....

"अन् बग....म?" सौ. नें म्हणजे बगमच्या आईनें एकदम किंकाळी फोडली. त्याबरोबर बेताबातानें वर अडकवून ठेवलेलें खिडकीचें झडप निसटलें आणि धाडकन् माझ्या हातावर आदळलें.

"ओ हो हो हो...."

"सूर कसले काढताहां? अगोदर सांखळी ओढा. बगम खालीं राहिला." सौ. म्हणाली.

काकू खिडकींतून बाहेर पाहूं लागल्या. त्यांचे जे हाल झाले त्यावरून आगगाडीच्या खिडकीच्या दुसऱ्या एका अवगुणाची कल्पना आली. या खिडक्या रेल्वेवर्कशॉपमध्यें कामानें पिचून निघालेल्या मजुराचें माप घेऊन कंपनीनें केल्यामुळें खेडेगांवच्या मोकळ्या वातावरणांत पोसल्या गेलेल्या काकूंचा हमचौरस देह त्यांतून जाणें सुतराम् शक्य नव्हतें. प्रस्तुत खिडकींत तर काकूंना आपले खांदे देखील कोंबतां येईनात. उलट खिडकींत गच्च बसलेलें त्यांच्या मानेचें बूच मला मोठ्या कष्टानें ओढून काढावें लागलें.

या शोकनाटकाचा नायक बगम मात्र आम्हांला प्रथम कोठेंच दिसेना. तेव्हां सौ. च्या आग्रहाखातर सांखळीला हात घातलाही होता मीं. पण इतक्यांत ट्रंकेच्या मागून दोन चिमुकले पाय बाहेर आलेले दिसले आणि त्यांच्या मागोमाग बगमही एखाद्या सुरवंटासारखा बाहेर पडला. बांकाखालीं जाऊन सिगारेटचे चंदेरी कागद गोळा करीत होता बेटा. कोठल्या वस्तूचा बगम कसा संग्रह करील याचा नेमच नसे. त्याच्या सांठकपणाचें काकू नेहमीं कौतुक करीत असत.

तो होता सारा तीन वर्षांचा रांगता पोर. हल्लींच कुठे लटपटणाऱ्या पायांनीं चार दोन पावलें टाकूं लागला होता. पण महा व्रात्य. त्राहि भगवन् करायचा सगळ्यांना. अन् काकू जवळ असल्या म्हणजे तर काय? पाहायलाच नको. आमच्याकडे 'तुम्ही कुठल्या झाडाचा पाला' अशा तुच्छतेनें बघे आणि काकूंच्या पाठीशीं उभा राहून मला वेडावायलाही कमी करीत नसे.

काकू म्हणजे माझी नव्हे, सौ. ची आणि त्यामुळेंच तर ही सारी भानगड व्हायची. बगम व्रात्यपणा करायला लागला, कीं काकूंना आपलें बालपण आठवे. त्या त्याच्याबरोबर नाचूं लागत. त्यामुळें चांगलाच शेफारून तो वाटेल तें करी. माझ्या डोक्याचें स्टेशन करायचा अन् 'टाण टाण' करीत घंटा म्हणून माझी शेंडी खसाखस हिसकायचा. आतां तर मी धोक्याची सांखळी खेचणार होतों तें त्यानें पाहिलेंच होतें. म्हणून मी मांडीवर घेतांक्षणीं त्यानें माझी शेंडीची गांठ पकडली आणि "सांखळी, —मा....सा....खळी. हुम्, खेच्यो" अशीं मुक्ताफळें तोंडावाटे काढीत ती तो कचाकच ओढूं लागला. काकू समोर असल्यामुळें त्याच्या पाटींत धपाटा देण्याची सोयच नव्हती, म्हणून मीं नुसता त्याच्या मांडीला हळूच बारीकसा चिमटा घेतला. त्याबरोबर एखादा विंचू डसल्यासारखी त्यानें किंचाळी मारली आणि पंचमांत केंकटायला सुरुवात केली.

"ओग माझा छव्या तो—" करून काकूंनीं त्याला पटकन् उचलून घेतला.

"बरा अनायासें सुटींवांचून खोकला गेला." मी पुटपुटलों.

"मामा चावला, मामा चावला" असें कांहींसें म्हणत बगम माझ्याकडे बोट दाखवून रडत होता. अजून आपल्या वाक्यांत कर्ता कर्म घालण्याइतकी त्याची प्रगति झाली नव्हती.

"बरं का बापू, मुलांना कसं खेळवावं तें अगदीं समजत नाहीं तुम्हांला. आमच्या सांवळ्याजवळ मुलांचं मानसशास्त्र का कायसं पुस्तक

आहे तें वाचायला दिलं पाहिजे तुम्हांला एकदां. मुलं म्हणजे फुलं. त्यांच्याशीं अशी धसफस् करून कसं चालेल ?" काकू मला लेक्चर देऊं लागल्या.

"हे: घटकोघटकीं मानसशास्त्र वाचायला लावणारीं मुलं, मुलं कसलीं तीं ?" मी त्रासून म्हणालों. मग काय विचारतां ? काकूंची कुस्तीचं मैदानच ती ? किती वेळ गर्जत होती देव जाणे !

बगमनें गळा काढायचें बंद केलें, पण तो काकूंच्या कानांत काड्या घालूं लागला. त्यांच्या चष्म्याच्या घराचा तर त्यानं चावून चावून पापडच करून टाकला होता, पण तो काकूंचा प्रश्न असल्यामुळें मीं हूं कीं चूं केलें नाहीं. माझी शेंडी परत सुरक्षित टोपींत घालून मीं आपला तोंडासमोर 'टाईम्स' उघडून धरला.

टाईम्सवर झडप घालण्याचा बगमनें प्रयत्न केलाच, पण आतां सौ.ही सावध झाली होती. • चड्डी घालण्याचें निमित्त करून तिनें त्याला काकूंच्या मांडीवरून उचलला. उठतां उठतां काकूंच्या नाकाचा एक बोचकरा काढलाच गुलामानें.

"बाई बाई, काय ग हे मने," काकू आपलें नाक तरतरीत ठेवण्याचा प्रयत्न करीत म्हणाल्या, "त्या पोराचीं नखं किती दिवसांत काढलीं नाहींस कुणास ठाऊक ?"

"तो काढूं देईल कुणाला, तेव्हां ना ?" सौ. नें वेळ मारून नेली. इकडे काकू आपला लुगडयाचा ओला झालेला पदर पिळून काढूं लागल्या.

चड्डी घालतांना बगमची नि सौ.ची दोघां पैलवानांसारखी झटापट सुरू झाली. आजुबाजूच्या उतारूंच्या अंगावरही बगमनें पुष्कळ हिसक्या मारल्या आणि भोकाड पसरलें. हातांनीं सौ.चे केस उपटण्याचें काम चालू होतेंच. पाय तर असे झपाट्यानें नाचवीत होता, कीं त्याची आणि चड्डीची गांठ पडणेंच शक्य नव्हतें.

पोर एवढें रडतेंसें पाहून लोकही म्हणूं लागले,

"नका बाई त्याला त्रास देऊं. पोराची मर्जी म्हणजे जशी राजाची मर्जी."

त्या एकंदर झटापटींत सौ. ची एक बांगडी वाढवली. पदराला मोठा थोरला धस गेला आणि तिनें नीटनेटक्या रीतीनें घातलेल्या अंबाड्याची स्थिति धनुकली मारून नुकत्याच पिंजारलेल्या कापसासारखी झाली. अन् एवढं करूनही सामना बगमनेंच जिंकला.

"नवरा-बायको, दोघंही सारखींच. मुलाला खेळवावं कसं, एकाला माहीत असेल तर शपथ? करायचीं काय मेल्यांनो तीं खंडीभर पुस्तकं वाचून?" काकूंचा तोंडपट्टा सुरू झाला.

किती वेळ तो चालला असता कुणास ठाऊक? पण तेवढ्यांत एक स्टेशन आलें आणि आमच्या समोरच्या बांकावर एक नवीनच उतारू येऊन बसला. बेट्याच्या हातांत चारपांच सुटे बोजे होते आणि शिवाय त्याची सूटकेस, बिस्तरा वगैरे सामान हमालानें आंत आणून ठेवलें तें निराळेंच. "या गृहस्थाला इतकं सामान प्रवासांत नेणें जमतं तरी कसं बुवा?" मी एकीकडे सौ. ला म्हणालों.

गृहस्थ मोठा सभ्य अन् आनंदी दिसला. हातांत खुणेचें बोट घातलेली कसलीशी इंग्रजी कादंबरी होती. तींतील पानें तो मधूनमधून वाची आणि मधूनमधून बाहेर धावणाऱ्या जगाकडे कौतुकानें बघे. पोषाख चांगला ऐटबाज होता. मधूनच तोंडानें एखादी गाण्याची लकेर काढी आणि गाणें ऐकणाऱ्या जाणत्या इसमाप्रमाणें हातवारे करी. या नवीन 'मामा' कडे बगमचें लक्ष अन् बगमकडे त्या मामाचें लक्ष एकदमच गेलें.

मामानें एकदां आमचें सर्वांचें सिंहावलोकन केलें आणि मग तो बगमला विचारूं लागला, "काय रे बाळ, तुझं नांव काय?"

"बघम्."

"कुठं चाललास?"

"भूल."

" भूर कुठं? आजोळीं कीं काय?"

या प्रश्नाला उत्तर देण्याऐवजीं 'वाळानं' त्यांच्या घड्याळाचा छेडा हिसकला. त्याबरोबर खिशांतून घड्याळ काढून मामांनीं तें त्याच्या कानाजवळ धरलं, आणि म्हणाले,

" ही बघ गंमत. कशी वाजतेय?"

" किट किट किट—" बगम खूष होऊन म्हणाला आणि घड्याळावर त्यानें झडप घातली. मला वाटलें, येथें त्यांचे सलोख्याचे संबंध संपणार. पण छे, मामानं एखादी डबी निर्विकारपणानें पुढें करावी तसें आपलें घड्याळ खुशाल बगमच्या हातांत दिलें. माझ्या छातींत धाकधुक व्हायला लागलें. कारण बगम हा जातिवंत बोलर असल्यामुळें हातांत आलेली वस्तु फार वेळ जवळ ठेवीत नसे. त्यानें घड्याळ कानाशीं लावलें आणि पुन्हा तोंडानें उद्गार काढले, " किट किट किट—"

त्या दोघांचा लवकरच दोस्तीचा करार होण्याचा रंग दिसूं लागला. पण इतक्यांत बगमनें "मामा, झेला" असा इषारा देऊन घड्याळाचें बोलिंग टाकलेंच. "हां हां. हें काय बगम?" मी त्याच्या डोक्यांत एक टप्पल देऊन ओरडलों. बरें झालें 'मामा' ही 'कॅच' घेण्याच्या कामांत पटाईत होते म्हणून. नाहींतर आज घड्याळाची डबीच होत होती त्यांच्या!

त्यांचा नुसता हातच आपल्या कानांवर टेवून बगम म्हणूं लागला, " मामा–हुम्म्–किट किट किट. गध्याळ–"

असा त्यांचा खेळ किती तरी वेळ चालला होता, तरी बगमचें पालुपद संपलें नव्हतें–" आणखी–मामा–किट किट किट—"

" जेनूं काम तेनूंच थाय–" काकू त्या मामांकडे कौतुकानें पाहात मला म्हणाल्या, " पाहिलंत का बापू, मुलं कशीं खेळवावींत तें? जरा धडा घ्या म्हटलं. कुटुंबवत्सल माणसंच पाहिजेत असल्या कामाला, नाहीं तर तुम्ही—"

मनांतून काकूंचा मला अतोनात संताप आला. साहजिकच आहे. एका तिऱ्हाइत माणसाच्या देखत असें वर्मी बोललेलें कुणाला खपेल? आणि तेंही सौ. च्या काकूनें? छे छे. मला तें सहन होईना. पण करणार काय? आगगाडीचा डबा तो–अन् उतारूंनीं चिकार भरलेला. तिथें भांडण काढून आपलीच शोभा व्हायची, असा विचार करून मीं आपला पुन्हा 'टाईम्स' उघडला आणि त्यांतल्या मथळ्यांचे शब्द मोजूं लागलों.

मला असेंही वाटत होतें, कीं त्या 'किट किट' पायीं बगम मामांना लवकरच जेरीस आणणार आणि मामा त्याला हळूच एकादा चिमटा घेणार. पण छे, मामांच्याजवळ बगमला खेळविण्याच्या अनेक क्लृप्त्या दिसल्या. कागदाच्या पिपाण्या करून ते दोघे "ब्यांड" वाजवूं लागले. एक पिपाणी बगमनें चावून गट्ट केल्यावर त्या गृहस्थानें खिशांतून एक निळीतांबडी पेन्सिल काढली आणि मग दोघांची चित्रकला सुरू झाली. मी, सौ. आणि गाडींतले कित्येक 'बुवे' यांचीं बगमनें भयंकर व्यंगचित्रें रेखाटलीं आणि कागदांच्या चिटोऱ्यांनीं सगळा डबा भरून टाकला.

आतां त्यांची दाट मैत्री जमल्यासारखी दिसली. काकूच काय, पण सौ. देखील आपल्या बगमच्या सुतासारख्या सरळ वागणुकीचें आश्चर्य करूं लागली. माझ्याकडे एक खोडकर कटाक्ष फेंकून ती म्हणालीसुद्धां– "आतां पहा कसा गुलाम खेळतोय तो. अन् मघाशीं भूत शिरलं होतं जसं अंगांत."

आपल्या बॅगमधून लिमलेटच्या गोळ्या काढून 'मामांनीं' देखील तिचीच री ओढली, "मोठा खेळकर आहे बुवा तुमचा छोकरा. अगदीं कॅप्टन् नायडू होणार मोठेपणीं. होय ना रे बगम?"

"होऽऽयी" करून बगमनें आपल्या नवीन मामांच्या अंगावर कुठें तरी टाळी दिली.

"लिमलेटच्या गोळ्या दिल्या तरी चालतील ना?" हसून त्या कुटुंबवत्सल गृहस्थानें सौ. ला. विचारलें.

"हो. पण एकच द्या. कालच खोकत होता तो."

पण बगमला कुठलाही जिन्नस मूठ भरल्याशिवाय मिळाला असें वाटत नसे; त्यामुळें एकच गोळी हातावर पडतांच त्यानें बेलाशक ती खिडकीबाहेर भिरकावली. वाऱ्यानें उलटी येऊन ती फटकन् मामांच्या चष्म्याच्या भिंगावर बसल्यामुळें कांचेला एक तडा गेला. बगमला आनंद होऊन तो टाळ्या पिटूं लागला.

खरोखर मी त्या ठिकाणीं असतों, तर लिमलेटच्या गोळीप्रमाणें बगमलाच कुठें तरी भिरकावला असता. बाळलीला झाली, तरी तिलाही कांहीं सीमा आहे. समोर दिसेल तें 'बेचिराख' करणारी बाळलीला निदान मला तरी सहन झाली नसती. पण त्या गृहस्थानें मुकाट्यानें पुन्हा बॅग उघडली आणि थोड्या लिमलेटच्या गोळ्या नि थोडा बेदाणा एकत्र करून बगमची मूठ भरली. बगमनें अर्थातच त्या नैवेद्याचा एकदम बोकणा भरला.

त्या गृहस्थाच्या शांत व धिम्म्या स्वभावाचें मलाही आतां आश्चर्य वाटूं लागलें. बगमच्या अति कठीण कसोटीला तो उतरला होता, त्यामुळें बगमची कळी त्याच्यावर खुलली होती. आपण होऊन तो त्याच्या मांडीवर जाऊन बसला. काकू तर उघड म्हणाल्याच, "पाहिलात ना चमत्कार बापू? असा लाघटपणा हवा मुलांच्या बाबतींत; तर खरा कुटुंबवत्सल गृहस्थ."

यावर एक खरमरीत उत्तर माझ्या जिभेवर आलें होतें. पण मला डुलकी येऊं लागली होती, इतकेंच नव्हे, तर तोंडासमोर कुठलीशी सिनेमाची जाहिरात होती त्यामुळें सिनेमांतल्या कांहीं प्रसंगांचीं स्वप्नेंही पडूं लागलीं होतीं. हें सुख काकूंच्या रागावर वाया घालविण्यास मी तयार नव्हतों. म्हणून मीं काकूंना उत्तर दिलें नाहींच,

पण तोंडापुढचा टाईम्सही बाजूला केला नाहीं. अहाहा, गाडी मला कशी पाळण्यांत घातल्यासारखी हलवीत होती. !

असा किती वेळ गेला कुणास ठाऊक ! पण एंजिनचा एक भोंगा भोंक्कन् खिडकीसमोरच वाजल्यामुळें मी दचकून जागा झालों. झोंपेंत अर्थातच मी शेजारच्या 'प्याशींजर' च्या अंगावर कलंडलों होतों. त्यामुळें तोंडावरचा टाईम्स बाजूला सारून उठून बसायला मला थोडा वेळ लागला. गाडी धडाधडा धावत होती. तिनें किती स्टेशनें मधें टाकलीं याची कल्पना येण्यासाठीं डोळे किलकिले करून मी पाहूं लागलों तों–अरे बापरे !

समोरच्या बांकावर एक वानर बसलेला !

झांपड साफ उडाली. मीं डोळे चोळले आणि जरा धोतर सावरून बांकावर पाय घेऊन बसूं लागलों. त्या वानराकडे थोडा वेळ टक लावून पाहिल्यावर मात्र माझ्या ध्यानांत आलें, कीं तो खरोखरीचा वानर नव्हे. बगमचेंच तें एक चमत्कारिक रूपांतर झालेलें होतें. अजूनही बोटें चोखण्याचा त्याचा चाळा चालूच होता, त्यावरून सर्व प्रकार माझ्या ध्यानांत आला. डोक्यापासून पायांपर्यंत चाकोलेटनें माखलेला होता तो. अन् जवळच चाकोलेटचा डबा उघडा न् रिकामा पडलेला.

उकाड्याच्या दिवसांत चॉकोलेट कसें पाघळतें हें मुलांना निराळें सांगायला नकोच. एखाद्या गेरू लावलेल्या राक्षसपार्ट्याप्रमाणें बगमचा सगळा मुखडा चॉकोलेटनें रंगलेला होता. मूळचा सुंदर बदामी रंगाचा अंगरखा रेल्वे हमालाच्या डगल्यासारखा दिसत होता. हातपायदेखील चॉकोलेटनें बरबटलेले. डोळ्यांच्या जागीं तेवढ्या दोन कलिंगडाच्या बिया लुकलुकत होत्या. भूगोलाच्या नकाशांत उंच डोंगर ज्या रंगांनीं दाखवितात तशा खंगरी विटेच्या रंगाचें तें सारें ध्यान दिसत होतें. उरलेंसुरलें चॉकोलेट चाटण्याच्या नादांत स्वारी अगदीं 'रंगून' गेली होती !

तो प्रकार पाहिल्यावर माझ्या छातींत धडधडूं लागलें. या खादाड-पणामुळें पोटबीट फुगून भलताच कांहीं प्रसंग गुदरला तर ध्या काय? आजूबाजूला पाहिलें, तों डब्यांतले पुष्कळ उतारू मधल्या स्टेशनांवर उतरून गेले होते. वगमचा औट घटकेचा दोस्त तो 'मामा'ही कुठें दिसेना. त्याची बॅग वरच्या फळकुटावर जशीच्या तशीच होती, त्यावरून तो पायखान्यांत किंवा चहाच्या डब्यांत गेला असावा, असा मीं तर्क केला. पाटीकडच्या बांकावरचे दोन तीन पुरभय्ये डारढूर घोरत होते आणि हुक्क्याच्या नळ्या त्यांच्या तोंडांत तशाच अडकून राहिलेल्या होत्या.

काकू आणि सौ. तर काय? मध्यान् रात्र झाली होती त्यांची. काकूंनीं आपल्या गांटोड्याचें उसें केलें होतें नि त्यांचें तोंड उघडें असून एकसारखें हालत होतें. कुणाला तरी त्या स्वप्नांत मानसशास्त्राचे धडे देत असाव्या! सौ. नें तोंडावर माशा बसूं नयेत म्हणून पदरानें तें झांकून टाकलें होतें. तिच्या झोंपण्याच्या पद्धतीवरून तिला गाढ झोंप लागलेली दिसत होती.

आतां काकूंना उठविण्याचें धाडस करावें कीं नाहीं या विचारांत मी आहें, तोंच गाडीला एक जबरदस्त हिसका बसून तें काम अनायासें घडून आलें. काकूंच्या डोक्याखालचें गांठोडें एकदम निसटून खालीं पडलें आणि काकूंच्या शरीराचा वरचा भाग जड असल्यामुळें तोही बांकावरून घसरला. त्याबरोबर "काय ग आई मेल्यांचा उच्छाद तरी!" असें ओरडत त्या उठून बसल्या. दोन जांभया न् बरेच आळोखे-पिळोखे दिल्यावर त्यांचें लक्ष वगमकडे गेलें आणि त्याचें ध्यान पाहिल्या-बरोबर त्या मोठ्यानें किंचाळल्या—"अगबाई, मने—भूत!"

सौ. ही खडबडून जागी झाली आणि किंचाळूं लागली.

"झालंय् काय तुला ओरडायला?" मीं तिला दटावलं, "वगम आहे तो."

"काय झालं? काय व्हायचं राहिलंय? आगगाडीखालीं उडी नाहीं टाकलीन् मेल्यानं हें नशीबच. इतकं कसं दगडासारखं अंत:करण बाई. जरा कुठं डोळा लागला माझा, तर हा एवढा प्रकार." सौ. तणतणली.

"अग मने, अगोदर त्याला–" असें म्हणत काकूंनीं बगमला उचलला नि नळाखालीं नेऊन धरला. बगमची नि त्यांची झटापट मला पाहावेना. मीं डोळे मिटून घेतले.

"आतां काय डोळे मिटतां? जरा त्याच्यावर लक्ष ठेवलं असतंत तर—काय काय खाल्लं आहेन् मेल्यानं कुणाला ठाऊक?"

"लक्ष काय ठेवणार कपाळ? तुझ्या काकूनं शेफारून ठेवलाय त्याला–तो का माझं ऐकतो? आणि ते कुटुंबवत्सल 'मामा' होतेच कीं त्याला संभाळायला."

"अगोबाई, खरंच कीं. त्यांच्याच चाकोलेटवर ताव मारलेला दिसतोय कारट्यानं. पण बाई, ते दिसत नाहींत ते कुठं?"

"तर तर. त्यांनीं घेतलाय पत्कर तुमचीं मुलं संभाळण्याचा! ते गेले असतील फराळाला किंवा चहाच्या डव्यांत."

स्टेशन सोडून गाडी चालू झाली, तरी मामा परत आले नाहींत म्हणून मीं सौ. ला तसें सांगितलें. वास्तविक मलाही तें एक गूढच पडलें होतें. कारण त्यांची बॅग तर समोर दिसत होती आणि त्यांना जाऊन बराच वेळ झाला होता तरी त्यांचा ठिकाणा नव्हता.

बगमला आंघोळ घालून काकू परत आल्या आणि तो केंकाटत असतांनाच त्याचें अंग पुसूं लागल्या. त्याला आतां दुसरे कपडे घालणें भागच होतें, तेव्हां सौ. त्याचे कपडे ट्रंकेंतून काढण्याकरतां उठली. आतां बगम आकाशपाताळ कसें एक करणार याची मला कल्पना असल्यामुळें मी म्हणालों, "राहूं द्या जरा तसाच त्याला."

"अं हं. सदला, मामा" बगम रडतां रडतां ओरडलाच. ही कला त्याला चांगली अवगत होती.

" थांब बाबा, तोच काढत्येय–" सौ. म्हणाली आणि खालीं वांकून ओरडली—

" अगबाई, आपली ट्रंक ! "



' अगबाई, आपली ट्रंक ! '

मी दचकलों. काकू तर तीन फूट वर उडाल्या. आज सौ. चा 'अगबाई' दिवस होतासें दिसलें.

डब्याचे सर्व कानाकोपरे धुंडाळले, पण ट्रंकेचा पत्ता नाहीं. आमची धडपड ऐकून पुरभय्ये जागे झाले. त्यांपैकीं एकाला मीं विचारलें, " आमची ट्रंक पाहिली ? "

" नाहीं. "

" नाहीं ? आमच्या इथं मामा बसले होते ते कुठं गेले ? "

"ओ जंटलमन साहाब? ते गेले उतरून एका स्टेशनवर आपल्या बाडबिस्तऱ्यासह."

"म्हणजे? दुसऱ्या डब्यांत गेले म्हणतां?"

"सामान घेऊन गेले ते. एक बडा पेटारा था उसके पास."

"हरे राम! मामा कसला हा? अट्टल डाकू भेटला कीं," मी मटकन खालीं बसतां बसतां उद्गारलों. त्याची बॅग मीं उघडून पाहिली, तों काय! आंत कागदाचे कपटे न् लिमलेटच्या गोळ्या! सगळा डबा माझ्या भोंवतीं फिरूं लागला.

सौ. च्या तोंडचें पाणी पळालें आणि तें डोळ्यांवाटें बाहेर पडूं लागलें. चारदोन सोन्याचे डागही होते तिचे त्या ट्रूंकेंत. शिवाय कपडे. छे! छे. मोठाच धक्का तो आम्हांला.

"काय मेल्याचं सोंग तरी. बॅलिष्टर दिसत होता जसा कांहीं." काकू कडाडल्या. पण त्यांनाही घाम फुटलेला दिसत होताच.

"हा कारटा तरी बघा-कसा त्या चोरापुढं तोंड मिटून राह्यला. नाहीं तर तिन्ही त्रिकाळ केंकटत असतो मेला–" सौ. बगमवर घसरली.

"आतां कां ओरडतां? कुटुंबवत्सल गृहस्थ नव्हता का तो?" मीं काकूंना शांतपणानें म्हटलें.

❀


मामा विरुद्ध आम्ही

'**बन्या** काठी आण—'

'काठी नको. खराटा बरा.'

'छे, खराट्याच्या झपाट्यांत नाहीं सांपडायचा तो. केरसुणीच हवी त्याला.'

'अरे हा पहा निघाला पेटीमागून.'

'पाहातां काय. धरा, ठोका. छोट्या, मार केरसुणी !'

'तुमच्या गादींत गेला तो नाना.'

'असं का ? मग बरा सांपडला. हळूच उलगडा. हां—अरे अरे हा पहा निसटला–इकडून धप् धप्—हरे राम—हाणा--हाणा--झाडू--धप्—धप्—फटक्—अंहं. गेलाच तो त्या लाकडाच्या ढिगाऱ्यांत !'

खरंच होतं तें. इतक्या सशस्त्र वीरांचे वार चुकवून त्या एवढ्याशा उंदरानं गुंगारा दिला आणि स्वारी लाकडांच्या ढिगांत छपून बसली.

उंदीर म्हटल्याबरोबर छोटूच्या अंगांत लढाईचं वारं संचरे. हवी ती वस्तु घेऊन तो उंदराच्या मागं लागायचा आणि सगळ्या घराची उलथापालथ करून टाकायचा.

शेजारच्या बन्या बुरकुल्याच्या घरांतून येत असत हे उंदीर. थोडीशी शेतीवाडी होती बुरकुल्यांची, त्यामुळें घरांत बाजरी नि जोंधळ्याचीं पोतीं नेहमीं असायचीं. उंदीर न् घुशींचं नंदनवनच तें.

"पण आम्हांला कां हा रिकामा त्रास ?" छोटू बन्याला म्हणे, "आमच्या घरांत उंदीर औषधाला दिसत नव्हता. तुम्ही शेजारी आलांत ते उंदरांना घेऊनच. तुमच्या घरचे उंदीर सायंफेरी करायला आमच्याकडे येतात. छे. यांच्या विरुद्ध आतां रीतसर मोहीम केल्याशिवाय ही ब्याद टळायची नाहीं."

छोटूनं एक दिवस पिंजरा आणला. म्युनिसिपालिटीचे लोक फुकट पिंजरा लावायला देत. पदरचा छदाम खर्च व्हायचा नाहीं. मग आपण मोहिमेंत भाग कां न घ्या, अशा विचारानं मीही छोटूच्या योजनेंत सामील झालों.

छोटूच्या आईला मुद्दाम थालिपीठ बनवावं लागलं हें खरं. तिनं कुरकुरही केली हें नसतं लचांड घरांत आणल्याबद्दल. पण खमंग थालिपीठ उंदराबरोबर आपल्यालाही मिळणार आहे हें मी विसरलों नव्हतों, त्यामुळं मीं तिकडे फारसं लक्ष दिलं नाहीं. संध्याकाळीं छोटूनं थालिपीठाचा एक खमंग तुकडा पिंजऱ्यांतील हुकाला अडकविला आणि तो पिंजरा लाकडांच्या ढिगाऱ्यापाशीं ठेवून दिला.

दुसऱ्या दिवशीं उठल्याबरोबर आपल्याला उंदीरमामा पिंजऱ्यांत अडकलेले दिसणार, या आशेनें छोटूनें पिंजऱ्यांत डोकावून पाहिलें. पण पाहातो, तों पिंजऱ्याचें दार तसेंच उघडें अन् थालिपीठाचा तुकडा मामांनीं लंबे केलेला!

"पिंजऱ्याचा हूक तूं फार घट्ट लावलास, म्हणून असं झालं," मीं त्याची समजूत घातली.

"आज अगदीं अलगत हूक अडकव अन् पहा गंमत!"

"पण मी म्हणतें," सौभाग्यवतीनं मध्येंच तोंड घातलं, "थालिपीठाचा तुकडा लावावा नि आपण जरा वाट पाहात जवळ बसावें. आला म्हणजे मारावा."

सौ.चं टीक होतं. कारण आज पुन्हा थालिपीठ बडवावं लागणार होतं ना तिला!

अंधारांत असा दबा धरून उंदराची शिकार करणं ही गोष्ट बोलायला सोपी होती, पण ती करतांना कसल्या प्रसंगांना तोंड द्यावं लागणार होतं तें माझं मला माहीत! त्या दिवशीं धावणारी चपळ वस्तु धरण्याची नि मारण्याची मीं कवाईत आरंभिली. ढेकणापासून सुरुवात केली मीं. तुम्हांला वाटेल, हा गृहस्थ इतका भित्रा कसा? पण हा भीतीचा प्रश्न नाहीं. हें चलाखीचं काम आहे. पहा बरं, ढेकूण सहजासहजीं हातीं लागतो का तें. उडणारा डांस हवेंतल्या हवेंत थापटणं तर त्याहून कठीण. अन् झुरळ? वहाणेचा फटका नेमका बसला नाहीं तर कसं सैरावैरा उठतं नि पटकन् आपल्याच धोतरांत शिरतं, हें

अनुभवाखेरीज कळायचं नाहीं. तेव्हां या गोष्टींची कवाईत केल्यावरच मला थोडा आत्मविश्वास वाटूं लागला. त्या रात्रीं मी पिंजऱ्याजवळ अंधारांत डॉन ब्रॅडमनप्रमाणं केरसुणी घेऊन मामांना सपाटा द्यायच्या पावित्र्यांत उभा राहिलों.

थोडया वेळानं खुस् खुस् चिर्रर्र फर्रर्र असे आवाज होऊन कांहींतरी धावतें आहे असा भास झाला. आलेली व्यक्ति माझ्या पायांवरून सर्रदिशीं धावत गेली. मी दचकलों. पाय झाडला—पण तो पिंजऱ्याला लागला आणि बंदुकीसारखा फाडकन् आवाज होऊन पिंजऱ्याचं दार लागलं.

"काय शिंचा त्रास आहे गुलामाचा...." असं चरफडत, पिंजरा पुन्हा नीट लावण्याकरतां मीं त्याचं दार उघडलं. पण हायरे दैवा—! थालिपिठाचा तुकडा अलगत तोंडांत पकडून मामा पुटकन् बाहेर पडले आणि विजयी दिमाखानें लाकडाच्या ढिगांत दिसेनासे झाले. "अरे हरामखोरा, नीचा—" वगैरे अपशब्दांची माझ्या तोंडून सरबत्ती चालू असतांनाच छोटू जागा झाला. त्या किल्ल्याला वेढा देऊन उंदीर पकडण्याचं काम मला पुढं ढकलावं लागलं.

तीन चार दिवस असेच गेल्यावर तो हरामखोर सरळ माझ्या मेजावर खिसमीस खायला आला. किती बेरड झाला होता तो आतां? थालिपीठ खाऊन चांगला गुबगुबीत झालेला दिसला. आज टेबलावर आला, उद्यां हा बेरड माझ्या तोंडांतला घांसदेखील उडवायला कमी करायचा नाहीं अशीं चिन्हं दिसूं लागलीं.

"छोटू," मीं म्हटलें, "या पिंजऱ्यांत कांहीं हंशील नाहीं. फार हुशार झालेत हल्लीं उंदीर. अन् त्यांतल्यात्यांत आपला हा तर अगदीं शकुनिमामांचाच अवतार. पिंजऱ्यांत न सांपडतां थालीपिठाचा तुकडा पळवावा कसा हें त्याला चांगलंच माहीत आहे.

"खरंच गडे," सौभाग्यवतीनें सूर काढला, "रोज थालीपिठ करतां करतां कंटाळलें मी. आतां भाजणीदेखील गेलीय संपून."

"मग नाना, आतां सांपळा आणा." छोटूनं सल्ला दिला.

"सांपळा? अयाई ग...." सौ. किंचाळली. सांपळ्यांत सांपडलेल्या उंदराचं छिन्नभिन्न कलेवर तिच्या डोळ्यांना दिसत असावं.

"हो, मग त्याशिवाय कसा सांपडणार हा टकसेन? सगळ्या घराला बिळं पाडून ठेवलीन् बेटयानं. भिंतींना बोरघाटाचं स्वरूप आलंय जसं कांहीं. त्याच्या सगळ्याच गुप्त हालचाली अन् शिवाय खंडीभर पिसवा आहेत त्याच्या अंगावर. अशा शत्रूला गिरफदार करायचा कसा?"

"तें कांहीं नाहीं. छोटू म्हणतो तेंच बरोबर आहे. लकडीशिवाय मकडी वळायची नाहीं. सांपळ्याशिवाय हा शत्रु सांपडायचा नाहीं."

संध्याकाळीं जुन्या बाजारांतून मीं सांपळा खरेदी करून आणला. फांशीं देण्याच्या यंत्रासारखाच भयंकर वाटला तो. पण छोटूनं तो निर्विकार मनानं धुऊन काढला आणि त्याची सर्व कळ समजावून घेऊन रात्रीं त्यांत थालीपिठाचा तुकडा घालून, लावून ठेवला.

त्या रात्रीं मामा त्या बाजूला मुळीं फिरकलेच नाहींत!

"मला वाटतं, मामा आजारी असावेत—" मीं सकाळीं तोंड धुतां धुतां तर्क केला.

"आजारी कसला? दुभत्याच्या कपाटाची कडी काल उघडी राहिली, अन् मेल्यानं शंकरपाळ्यांचा फन्ना उडवलान् कीं." सौभाग्यवतीनं रिपोर्ट दिला.

"बरोबर. उडणारच फन्ना. रुचिवैचित्र्य पाहिजे ना. थालीपिठापायीं मुरडा व्हायची वेळ आली, मग काय करतील मामा?" मीं वकिली केली.

"आज मुळीं सांपळ्यांत शंकरपाळाच लावूं—" छोटूनं री ओढली. "शंकरपाळे कर ना आई पुन्हा थोडे."

"बरं आहे बाबा, त्या मेल्याची चालूं द्या दिवाळी अन् माझी मात्र सक्तमजुरी. थोडंसं अनारश्याचं पीठही भिजविलें. हो, शंकरपाळ्यांनाही कंटाळली असली स्वारी, तर...."

"हे:, आपल्याला नाहीं बुवा पटत हें." मीं सौभाग्यवतीच्या कबुलीचा फायदा घेण्याकरतां नाटक केलें. "रुचिवैचित्र्य म्हटलं, म्हणजे कांहीं तरी झणझणीत पाहिजे. कडबोळीं केलींस किनई, तर मामा नक्की लागतील गळाला."

"हो, मी बसलेंय आतां कडबोळीं करायला!" सौभाग्यवती फणकारली.

पण सर्व बाजूंनीं विचार केल्यावर रात्रीं आम्हीं सांपळ्यांत कडबोळंच लावलं आणि आज मात्र शत्रु आपल्या तावडींत सांपडणार या आनंदांत झोंपीं गेलों.

पहांटे चारच्या सुमारास फटाक्यासारखा आवाज झाला.

"सांपडला रे सांपडला" असं ओरडत मी उठलों आणि आनंदानं पिंजऱ्यावर झडप घालणार, इतक्यांत "अग आई ग—मेलें मेलें—उठा कुणीतरी लवकर" अशा किंचाळ्या ऐकूं आल्या. त्या ऐकतांच आनंद पार मावळला. थरथरत्या हातांनीं कसा तरी कंदील लावला आणि युद्धक्षेत्राची पाहाणी करायला गेलों.

बापरे, किती विलक्षण तो देखावा! उंदीरमामा सांपडण्याऐवजीं सौ..च त्या भयंकर सांपळ्यांत अडकलेली. पायाचं एक बोट सांपडल्यामुळं एका पायानं लंगडी घालीत ती मोठ्यानं ओरडत होती. हो हो करून तिला धीर देत मीं कशीतरी त्या सांपळ्यांतून तिची सुटका केली.

"आगऽआई ग. बोट तुटलं ग आई माझं. स्स्स्. काय मेलीं निलाजरीं माणसं हीं या बुरकुल्यांचीं. शेजारीं आग लागली तरी थेंबभर पाणी टाकायचीं नाहींत. तुम्हांला करायचीच उंदरांची धर्मशाळा तर जा म्हणावं गांवाबाहेर राहायला. पण आम्हांला कां छळतां मेल्यांनो? मरतही नाहींत हीं उरफट्या काळजाचीं.:......"

सौ. च्या तोंडाची फटफटी सारखी वाजतच होती. मीं तिच्या बोटाला मलमपट्टी केली अन् सांपळा मुकाट्यानं अडगळीच्या खोलींत टाकून दिला.

"तूं कशाला गेलीस तिथं सांपळ्याजवळ?" छोटूनं जाग आल्याबरोबर मुद्याचा प्रश्न केला. "खरंच, माझ्या लक्षांतच आला नव्हता तो!"

"मग काय करूं?" सौ. नें खुलासा केला, "पहाटवेरी वाट पाहिली त्या मेल्याची. तो कांहीं आला नाहीं. तेव्हां म्हटलं, कडबोळं तरी धड आहे कीं नाहीं तें पाहावं. हो पुन्हा लावायचं झालं ' तर



उंदीरमामा सांपडण्याऐवजीं सौ. च त्या सांपळयांत अडकलेली.

भाजणीपासून तयारी करावी लागेल मला. तुमचा होतोय खेळ, पण माझीं हाडं निघताहेत त्या मेल्याचे चोचले पुरवतां पुरवतां......."

मला कोणीं सांगितलं, कीं बाजारांत उंदरांचं औषध मिळतं, त्यांत साखर घालून गोळया कराव्या आणि त्या अडगळीच्या जागीं टाकून द्याव्या. हें पक्वान्न उंदीर हटकून खातात आणि औषध विषारी असल्यामुळं मरून जातात. शत्रूचा निकाल लावण्याचं हें नवं तंत्र ऐकून मला बरं वाटलं आणि लगेच मीं तें सारं अमलांत आणलं.

मामांसाठीं त्या गोळ्या तयार करून घरभर पेरून दिल्या. "आतां सांपळे नकोत नि ते पिंजरे नकोत," असे सुटकेचे उद्गार काढून मी त्या दिवशीं ऑफिसांत गेलों. आतां आपलं घर हां हां म्हणतां निर्मूषक होणार याविषयीं मला शंका राहिली नाहीं.

पण "योजितो नर एक–दैव योजी दुसरें" हेंच खरें. हपीसांतून संध्याकाळीं परत येतों, तों घरांत मोठा गोंधळ! छोटूचा धाकटा भाऊ वसंता निपचित पडलेला. ओकाऱ्या नि जुलाब होऊन अगदीं बेजार झाला होता तो. डोळ्यांना पदर लावून सौभाग्यवती रडत बसलेली. एका कोपऱ्यांत छोटूही वाईट तोंड करून भिंतीवर रेघोट्या काढतोय्. गंभीर चेहरा करून डॉक्टर बापुरावांनीं वसंताच्या छातीवर नळी टेकलेली. माझ्या उरांत धडधडूं लागलें!

"नाना, तुम्हीं टाकलेल्या पेपरमिंटाच्या गोळ्या वसंतानं खाल्ल्यान्–" छोटू म्हणाला.

"ऐकलं का? पटकी झालेली दिसते बाळाला...." सौ. रडत रडतच सांगूं लागली.

"पटकीबिटकी कांहीं नाहीं. मीं विषाचा उतारा दिला आहे. आत्तां हुषार होईल पहा तो–" डॉक्टरांनीं धीर दिला.

त्यांच्या म्हणण्याप्रमाणं वसंता हुषार झाला अन् आम्हीही शहाणे झालों! पण आम्हांला आमचा उपद्व्याप निस्तरावयास दोन दिवस लागले. अडगळीच्या जागेंतून त्या विषारी गोळ्या निपटून काढणं तितकं सोपं काम नव्हतं. त्या दोन दिवसांत मामा 'सीक' होते म्हणा, अगर हवापालट करायला गेले होते म्हणा–पण घरांत फिरकले नाहींत एवढं खरं.

—पण जर्मन बॉम्बफेक्या विमानांप्रमाणं दोन दिवसांनीं त्यांनीं जो धुमाकूळ घातला, तो न भूतो न भविष्यति! मामांचीं पथकेंच्या पथकें घरांत चहूंकडे आपलें विध्वंसक कार्य करीत होतीं. लोड न् गाद्यांचा कापूस घरभर पसरला. गाद्यांचीं नुसतीं खोळें शिल्लक ठेवलीं. गव्हाच्या पोत्यांना खिंडारें पाडून आंत बोगदे तयार केले. टेबलें, खुर्च्या, कपाटें

नि वैळ्का यांवर लेंड्याच लेंडया! लोक म्हणत, " तुमच्यांकडे एवढे वेलदोडे तरी कोण सोलून टाकतं बुवा?"

गजाननमहाराजांनीं मूषकराजाला आपला घोडा बनविलं, तें उगीच नाहीं; तसं त्यांनीं केलं नसतं, तर मूषकमामांनीं त्यांचा एक मोदकही शिल्लक ठेवला नसता. पिवळ्या पितांबराची मच्छरदाणी करायलाही कमी केलं नसतं! सारांश, तो हल्ला पाहून मामांशीं तह करावा कीं काय या विचारांत मी पडलों.

शास्त्रीबुवांजवळ मीं ती गोष्ट काढली. त्यांच्याजवळ उंदरांवर मारण्याचा एखादा मंत्र असेल असं मला वाटलं. पण ते म्हणाले, "भारतीय युद्धांत मूषकास्त्र कोणीं सोडलंच नाहीं. मग मंत्र कुणाला ठाऊकी असणार? पण मी म्हणतों, मंत्राची काय जरूर? मूषक-मार्जारसिद्धान्त तुम्हांला ठाऊकी आहे ना?"

भूमितींतल्या सिद्धान्तांनीं मला मॅट्रिक परीक्षेंत सतावलेलं असल्यामुळं सिद्धान्त म्हटला, कीं माझ्या पोटांत गोळा उभा राही! पण शास्त्रीबुवा म्हणाले, "हा सिद्धान्त अगदीं सुलभ आहे नाना. उंदरांना जर घरांत पाऊल टाकूं द्यायचं नसेल, तर मांजर पाळायला पाहिजे. आहे ठाऊकी?"

म्हणतात ना, गरजवंताला अक्कल नसते. 'ठाऊकी' करून घेणं भागच होतं मला. सरळ दामूकडे गेलों. मांजरपाटाचा व्यापारी होता ना तो? तेव्हां माझी कल्पना, त्याला मांजरांसंबंधीं बरीच माहिती असावी. पण दाम्याकडे गेल्यावर कळलं, कीं मांजर नि मांजरपाट यांचा तसा कांहीं संबंध नाहीं.

—पण दाम्यानं मला निराश केलं नाहीं. त्याची इराणी मांजरी ज्वालामुखी दोन महिन्यांपूर्वीं व्याली होती. आणि बोक्यानं मटकावून देखील तिचीं पांच सहा मोठीं पिलें दामूच्या घरांत म्यांव म्यांव करीत दिवसभर हैदोस घालीत. त्या अवाढव्य मांजर-कुटुंबापायीं दामूला एक वेळ जेवून सहावें लागे! म्हणून मी माझी नड सांगतांच दामूला आनंद झाला आणि त्यानं पटकन एक गुबगुबीत पांढ्या उदी रंगाचं मांजर

माझ्या स्वाधीन केलं. त्याचीं नखं न बोंचतील अशा बेतानं मी त्याला कडेवर घेऊन घरीं आलों! वाटेनं तें सारखं गुर्रर्र–फुस्स्–पर्रर्र असले आवाज काढीत होतं. त्याचं उंच कपाळ, तपकिरी डोळे नि फिंदारलेल्या मिशा पाहून मीं ठरविलं, कीं त्याचं नांव 'चंडिका' ठेवायचं. कारण त्या मिस् ज्वालामुखी होत्या हें निराळं सांगायला नकोच.

माझी कल्पना अशी होती, कीं चंडिकेचं नि आमच्या घरांतल्या माणसांचं पटायचं नाहीं. पण ती साफ चुकली. दोनच दिवसांत सौ. आणि मुलें यांची चंडिका जिवलग मैत्रीण बनली. एखाद्या विनयशील कुमारिकेप्रमाणें माझ्यापासून ती दूर राहात असे.

आमच्या कुटुंबांत चंडिकेचं आगमन झाल्याबरोबर मामांनीं जें पलायन केलं तें कायमचंच. आतां रात्रीं आम्हांला निवान्त झोंप येऊं लागली. कोठें खुसखुस नाहीं, चरफर नाहीं, धडपड नाहीं, कांहीं नाहीं. लाकडाच्या ज्या ढिगाखालून मामा नेहमीं प्रवेश करीत त्याच्या समोरच चंडिका ठाण देऊन बसे. दबा धरून बसलेल्या या शत्रूचा सुगावा लागल्यामुळेंच मामांनीं आपला मोर्चा दुसरीकडे वळविला असावा. कांहीं असलं, तरी चंडिकेच्या आगमनाचा हा विलक्षण परिणाम पाहून आम्ही चकित झालों. सौ. नं नवसलेला सत्यनारायणही पुरा करून घेतला. इतक्या सहज रीतीनं घरांतली ती व्याद नाहींशी झाली ही कांहीं लहानसहान गोष्ट नव्हती!

चंडिकेचा लळा मुलांना इतका लागला, कीं तिला घटकाभर देखील कोणी विसंबत नसे. आमचं सुख पाहून चंडिकेची मागणी करण्याचा निर्लज्जपणा एकदां बुरकुल्यांनीं केला. पण आम्हीं चार्चिलसाहेबांप्रमाणें त्यांना सरळ धुडकावलं.

"ती गोष्ट विसरा आतां बुरकुले. जसं करावं तसं भरावं. चंडिका ही आमच्यापैकींच एक झाली आहे. तुम्ही करा खुशाल आपल्या घरांत उंदरांची कॉलनी!"

पण आमची घमेंड टिकायची नव्हती. पांच सहा दिवसांनीं एक गोष्ट आमच्या लक्षांत आली. दाम्यानं चंडिकेला स्वाधीन करतेवेळीं सुचविली होती ती मला. मी ती साफ विसरलों होतों. "चंडिका ही व्रतस्थ मांजरी आहे. चातुर्मास्यांत उंदराखेरीज ती दुसरं कांहीं खात नाहीं," असं म्हणाला होता तो. अन् खरंच दिसलं तें. घरांतील दूधदुभत्याला देखील चंडिका फारसा स्पर्श करीना, मग इतर जिनसा खाणं लांबच. साय खाई थोडीशी, पण ती देखील आंबुस झाली तर शिवत नसे. याचा परिणाम असा झाला कीं, ती दिवसभर भुकेनं तळमळे नि ओरडे. रात्रभर त्या ढिगापाशीं मामांची वाट पाहात बसल्यानं अंगावर बुरशी येऊं लागली तिच्या. रोडावत चालली, अंगावरचे केस झडूं लागले, हाड न् हाड दिसायला लागून खवाटं वर निघालीं. अंगावरून हात फिरवावा, तर उकरलेल्या रस्त्यासारखं शरीर खडबडीत लागे. थोडक्यांत सांगायचं, म्हणजे तिचं मूळचं गोंडस स्वरूप अजिबात नाहींसं झालं.

"वुरकुल्यांनीं चंडिकेला चेटुक केलंय्—" मीं एक दिवस विषय उकरून काढला.

"काय मिळालं मेल्यांना कुणास टाऊक? किती दशा झालीय माझ्या बाईची." सौ. गहिंवरून म्हणाली.

"आतां आपलं काम झालंय्, तेव्हां आपण चंडिकेला दामूकडे परत पोचवावी हें बरं."

"चेटूकंबिटूक कांहीं नाहीं नाना," छोटू म्हणाला, "तिला उंदीर खायला मिळत नाहींत."

"तें जरी खरं असलं, तरी तिला उपाशी मारून काय मिळणार आपल्याला?"

"हें काय हो नाना," छोटू गाल फुगवून म्हणाला, "चंडिका आपली आहे. तिला कां द्यायची लोकांकडे नेऊन?"

"अरे पण ती जर कांहीं खात पीत नाहीं तर जिवंत राहाणार कशी?"

"मला वाटतं, दवाखान्यांत नेऊन वापुरावांना दाखवावी एकदां." सौभाग्यवतीनं सूचना केली.

"म्हणतेस तरी काय तूं?"

"तिला कांहींतरी होतंयसं वाटतं. नेन्यांची कुसुम नव्हती का गेल्या भाद्व्यांत असंच करीत आठ दिवस?"

"नेन्यांच्या कुसुमला भूत लागलं होतं."

"इश्श! डॉक्टरांना जंत नाहीं का सांपडले तिच्या पोटांत?"

"पण मला नाहीं वाटत हीं जंतांचीं लक्षणं आहेतसं. ती उपास करतेय त्याचं खरं कारण छोटू म्हणतो तेंच असावं. रोगबीग कांहीं नाहीं. अन् असला तरी बापुराव काय करणार? त्याला गुरांचा डॉक्टरच आणला पाहिजे."

तरी पण तिच्या आग्रहाखातर बापुरावांना मीं विचारलंच. पहिल्यानं ते बरेच रागावले. 'गुरांच्या डॉक्टराकडे जा,' म्हणाले. पण आपल्या गांवांत तसा डॉक्टर नाहीं अशीं खात्री करून दिल्यावर त्यांनीं चंडिकेला तपासलं.

"कांहीं झालं नाहीं हिला. बरेच दिवस खायला न मिळाल्यामुळं सायटिकोटीमा झालाय. उंदीर मटकावायला मिळत नाहींत वाटतं?"

"पण बाकी कांहींच कशी खात नाहीं ती?—"

"नाहीं खाणार. उंदीर घाला तिला. दुसरा उपाय नाहीं."

मुकाट्यानं घरीं आलों. सौ. ला ती सारी हकीकत सांगून विचारलं,

"कुठून आणायचे उंदीर? आपण आपले तिला दामूकडे पोचवूं म्हणजे......."

"मी नाहीं जाऊं देणार माझ्या बबडीला—" सौभाग्यवतीनं चंडिकेला पोटाशीं धरून साफ सांगितलं.

"असं काय हो नाना? चंडिका गेली म्हणजे मग कोणाबरोबर खेळूं मी?" केविलवाणं तोंड करून छोटू बोलला.

"पण तिच्या खाण्यापिण्याची व्यवस्था—"

"पणबीण कांहीं नाहीं. चंडिका घरांतून गेलीं तर मी त्याच पावलीं माहेरीं जाईन."

"श्रीचंडिकेची इच्छा !" मी कपाळावर हात मारून म्हणालों.



' उंदीर घाला तिला. दुसरा उपाय नाहीं. '

त्यांच्या हट्टाचा परिणाम एवढाच झालाय, कीं सगळी लाज गुंडाळून बुरकुल्यांच्या घरांतून आम्हांला रोज एक उंदीर पकडून आणावा लागतो आणि चंडिकेच्या फराळाची सोय करावी लागते! उंदीर पकडणं हें वाघाच्या शिकारीइतकंच कठीण—पण छोटूला नि मला सरावामुळं आतां त्याचं कांहीं वाटत नाहीं! छोटू कधीं कधीं म्हणतो, 'ही मेटी पाहुणी म्हणून आली नि मालकीण बनली!"

मामा काय म्हणत असतील, कोण जाणे?

❀




**नागपंचमीचा** सण होता. आमच्या घरीं दिंड पचविण्याची ताकद कोणांत नसल्यामुळें आज भास्करच्या आईनं खांडवी केली होती. पाटावर चंदनानं नागोबा काढून आम्हीं त्याची पूजा केल्यावर जेवायला बसलों. माझं सारं लक्ष हपीसांतल्या माझ्या टेबलाकडे होतं. कारण त्या टेबलावर चढून बेबी दउतीशीं खेळत होती. आपल्या अंगावर नि माझ्या कागदांवर दऊत पालथी करून ती आज नागपंचमीबरोबर रंगपंचमी साजरी करणार या भीतीनं मन सारखं धागधुग करीत होतं. इतक्यांत शेजारीं आमटीचे भुरके मारणाऱ्या भास्करनं विचारलं,

“या खांडव्यांत चारच बेदाणे कां हो घातलेत?”

“अग,” मी सौ. ला म्हणालों, “भास्करला दुसरं खांडवं वाढ न् ती कारटी बघ टेबलावर–” बेबीची मस्ती पाहून माझ्या पोटांत कससच व्हायला लागलं होतं.

“शुः शुः” सौ. नं दटावलं, “आज सणासुदाचं मुलांना बोलायचं नाहीं.”

भास्करला तिनं आणखी खांडवीं वाढलीं. तीं एकामागून एक भास्करनं फोडलीं तों काय आश्चर्य? प्रत्येकांत चारच खिसमिसाच दाणे. भास्कर म्हणाला,

"सगळ्यांत चारचारच वेदाणे आहेत. मला पांच वेदाण्यांचं खांडवं हवं."

भास्करच्या या फाजीलपणाबद्दल मी पुन्हा एकदां चांगला खेंकसणार होतों, पण त्याच्या आईनं डोळे वटारले. तेव्हां मीं ठोकून दिलं,

"अरे, खांडव्याच्या वडींत चारचारच खिसमिसाचे दाणे टाकावे असं शास्त्र आहे. मांडवीनं पुरातनकाळीं घालून दिलेला हा नियम अजूनही तुझ्या आईसारख्या धार्मिक बायका पाळतात."

"मांडवी कोण?"

"होती एक नागकन्या."

"सांगा मला तिची गोष्ट." भास्कर दोन खांडव्यांचा एकदम तोबरा भरून म्हणाला.

"म्हॉणज्ये त्यॉच्चं ऑशं झॉलं—" मीही त्याचं अनुकरण करून म्हणालों,

"आपल्या जगावर सगळीकडे समुद्र पसरलेला होता."

"कुणीं पसरला?"

"हें बघ, मध्येंच भलतेच प्रश्न विचारायचे नाहींत. समुद्र म्हणजे कांहीं सतरंजी नाहीं, कुणीं तरी एकदम पसरायला. त्या वेळीं आभाळांतून पाऊस फारच पडे अन् त्यामुळं सगळी पृथ्वी पाण्याखालीं बुडे. तेव्हां काय बरं म्हणत होतों मी? हं. या सागराच्या तळाशीं मांडवपूर म्हणून एक गांव होतं. त्या गांवचा राजा मांडवराय म्हातारा झालेला होता—"

"कांहीं तरी सांगतां बाबा. पाण्याखालीं गांव कुठला? अन् त्यांत माणसं तरी कशीं राहातील?"

"काढलीस का पुन्हा शंका? तूं असं कर, दोन खांडवीं आणखी भर तोंडांत म्हणजे तें पुन्हा उघडणार नाहीं—" मी भास्करच्या ताटांत दोन खांडवीं माझ्यांतलीं टाकून म्हणालों, आणि सौ. ला सांगितलं, "अन् तूं त्या बेबीला घेऊन बस पाहूं जरा. नाहींतर गोष्टबिष्ट कांहीं नाहीं."

*　　*　　*

"त्या म्हाताऱ्या राजाला एकुलती एक पण अतिशय सुंदर मुलगी होती. तिचं नांव मांडवी. ती लग्नाची झाली तेव्हां देशोदेशींच्या राजपुत्रांनीं तिला मागण्या घातल्या. यांपैकीं पांच राजपुत्रांनीं मांडवीला प्रत्यक्ष पाहिलं होतं. तिच्या सौंदर्यानं ते इतके मोहित झाले, कीं त्यांपैकीं प्रत्येकजण तिनं आपल्याला माळ घालावी म्हणून जिवापाड खटपट करूं लागला. तिला काय काय आवडतं याची त्यांनीं माहिती काढली.

शूरसेनाला समजलं, कीं राजकन्या मांडवीला फुलांचा फार षोक आहे. लगेच त्यानं आपल्या राज्यांतल्या सगळ्या मोठमोठ्या बागांत हिंडून चित्रविचित्र अनेक तऱ्हेचीं अत्यंत रम्य अशीं फुलं गोळा केलीं, त्यांचा एक हार न् एक गुच्छ तयार केला आणि राहिलेलीं फुलं त्यानं आपल्या कानांत, डोक्यांत, गळ्यांत, हातांत सगळ्या आंगभर वाडी भरतात तशीं भरलीं. सगळा साज जमल्यावर, राजकन्या संध्याकाळीं जिकडं फिरायला जाई त्या वाटेवर तो जाऊन उभा राहिला.

थोड्या वेळांतच त्याच्या आगमनाचा कांहीं भ्रमरांना वास लागला. त्यांनीं ती बातमी आपल्या सर्व सवंगड्यांना सांगितली. लगेच एकेक भ्रमर शूरसेनाच्या अंगावरील फुलांवर येऊन वसूं लागला. राजकन्या आपल्या वाटेनें आली, तेव्हां शूरसेनाचं सगळं शरीर काळ्या काळ्या भुंग्यांनीं भरून गेलं होतं आणि त्यांना हांकलण्याकरतां तो वेड्यावांकड्या उड्या मारीत होता. जों जों तो भ्रमरांना हांकलायला पाही, तों तों ते गुं गुं करून ज्यास्तच लगट करीत. शेवटीं वैतागानं जमिनीवर पडून तो लोळूं लागला, तरीं भुंगे त्याचा पिच्छा सोडीनात. राजकन्या खूप मोठ्यानं हसूं लागली. तिच्या दासींनीं तर राजपुत्राची हवी तशी थट्टा केली आणि आल्या वाटेनं त्या निघून गेल्या.

कामसेनानं एक दिवस पाहिलं, राजकन्येला आपल्या पोपटाचा फार नाद आहे. आपल्या महालासमोरच्या सोनेरी पिंजऱ्यांतील पोपटांशीं ती तास न् तास खेळायची. एक दिवस राजपुत्र कामसेन गुप्तवेषानं तिथं आला आणि जवळ कोणी नाहींसं पाहून त्या पोपटाला घेऊन

गेला. संध्याकाळीं राजकन्या पाहाते, तों आपला जीवसखा पोपट नाहींसा झालेला. ती सारखा शोक करूं लागली. जेवणखाण सुचेना. तिच्या दासी कष्टी होऊन चारी दिशांना पोपट शोधूं लागल्या. राजानेंही या कामगिरीवर दूत नेमिले.

आतां ही वेळ आपली छाप पाडण्यास बरी आहे असं पाहून कामसेन तो पोपट घेऊन राजकन्येच्या उद्यानांत गेला आणि नम्रपणानं राजकन्येला म्हणाला—

"मीं आपला पोपट शोधून आणलाय. हा पहा, आपलाच ना ?"

"होय हो. माझाच हा विजू." अतिशय उल्हसित होऊन ती म्हणाली आणि पटकन तिनं त्या पोपटाला आपल्या कोमल हातावर बसवलं. बसल्याबरोबर प्रश्न केला,

"कुठं रे होतास इतका वेळ तूं विजू ?" आणि काय आश्चर्य ! विजू तात्काळ बोलला, "राजपुत्राच्या शामल्यांत."

हें ऐकल्याबरोबर शरमलेल्या राजपुत्राला विजू पुढं म्हणतो, "कां ? राजश्री ! आणून पोंचवलंच कीं नाहीं आम्हांला परत ? चला, चालूं लागा आतां."

सर्व प्रकार राजकन्येच्या ध्यानांत आला. तिनं रागानं राजपुत्राकडे पाहिलं, पण कामसेन तिथं उभा राहातो कशाला ? तो केव्हांच खजील होऊन निघून गेला होता.

वीरसेनानं एक दिवस राजकन्येच्या महालांतून येणारे संगीताचे स्वर ऐकले. "अरेच्च्या, ही वीणा वाजविण्यांत मोठी प्रवीण दिसतेय—" तो आपल्याशींच म्हणाला, "वाहवा ! किती गोड आवाज हिचा ! संगीताचीं आवडही फार दिसते हिला." लगेच आपल्या देशांत जाऊन त्यानं एक चंदनाची वीणा तयार करविली. तिला सोन्याचे पडदे बसविले. हिरेमाणकं जडवलीं आणि एका चांदण्या रात्रीं ती हातांत घेऊन तो राजकन्येच्या महालासमोर बसला. दाम दिड दाडा, दिडदाम् दिडदाम्—त्याच्या सतारीचे स्वर सुरू झाले.

ते बोल ऐकून आडोशास झोंपीं गेलेले कोल्हे जागे झाले आणि हळू हळू धीरसेनाभोंवतीं जमले. प्रत्येकानं जातां जातां बिट्ट्या गोळा केल्या होत्या. सतारीच्या नादांत ते इतके गुंग झाले, कीं मागच्या पायांवर उभे राहून पुढल्या दोन पायांनीं ते बिट्ट्या वाजवून ताल धरूं लागले. कित्येकांच्या पायांत घुंगरंही बांधलेलीं असावींत; कारण त्यांचं तांडव नृत्य सुरू झाल्यावरोबर तीं वाजूं लागलीं. या आवाजामुळं घुवडं व इतर पक्षी जागे झाले आणि सर्वांनीं त्या पटांगणांत एकच हलकल्लोळ उडवला.

हें काय चाललंय म्हणून दासी उठून पाहातात, तों राजपुत्र आपला मधोमध वीणा वाजवीत बसलाय् अन् भोंवताली सगळं जंगल सजीव होऊन नाचतंय. राजकन्येसकट सर्वांची झोंपमोड केल्याबद्दल त्यांना धीरसेनाचा फार राग आला आणि एकीनं रात्रीं धुण्याचं पाणी घंगाळांत भरून ठेवलं होतं, तें सरळ गच्चींतून राजपुत्राच्या डोक्यावर ओतून दिलं!

भीमसेनाला दरबारच्या एका हुजऱ्यानं सांगितलं, कीं राजकन्येला लहान मुलांप्रमाणं दोरीवरून उड्या मारायचा फार नाद आहे. नाग-लोकांतील सर्वांत बारीक असा जो पन्नगसूत्र त्याची दोरी करून तिनं या खेळाकरतां आपल्या महालांतल्या एका खुंटीवर टांगून ठेवली आहे.

ही अंतःस्थ गोष्ट समजतांच भीमसेनाला आनंद झाला. त्यानं इंद्र-धनुष्याची दोरी तयार केली आणि राजकन्या ज्या सरोवरावर स्नानाला जायची, त्याच्या रस्त्यावर उभं राहाण्यासाठीं एक जागा निवडून काढली. सूर्योदयाबरोबर सरोवराच्या वाटेवर गेलेले भीमसेन दोरीवरून उड्या मारण्याचा प्रयत्न करूं लागले. लंगोट कसलेला त्यांचा प्रचंड देह जेव्हां जमिनीवर आदळूं लागला, तेव्हां सारी पृथ्वीच थरथर हालते आहे असा कोणालाही भास झाला असता.

राजकन्या जवळ येतांच भीमकाय भीमसेन एका झाडाखालीं गेले आणि "एक-दोन-तीन, सरळ-तेढी एक. पुनः सरळ एक-" असं बडबडत उड्या मारूं लागले. इतक्यांत झाडावर एक भला मोठा वानर

येऊन बसला आणि त्याच्या भारानं फांदी वांकली. त्याबरोबर भीमसेनाची दोरी तिच्यांत अडकली आणि लगेच खालीं ओढल्याबरोबर पायांत अडकली. मग त्या विशाल देहाचा तोल राहाणार कसा? सारें धूडच्या धूड जमिनीवर कोसळलं. तो वानर खालीं उतरला आणि त्याच्या पोटावर तशाच कोलांट्या उड्या मारूं लागला. मांडवीला हसतां हसतां पुरेवाट झाली.

सूर्यसेनानं एक नवीनच ट्रम काढली. राजकन्येला पाण्यांत पोहण्याचा नाद आहे हें पाहिल्याबरोबर त्यानं आपल्या सर्व अंगाला माशाचं कातडं लपेटलं. तोंडाला सोनेरी माशासारखा रंग लावला आणि राजकन्येच्या आवडत्या सरोवरांत तो बुडी मारून लपून बसला.

त्या दिवशीं तिला यायला उशीर झाला. पण सूर्योदय झालेला पाहातांच कोळी मात्र आपलं जाळं घेऊन आले. पाण्यांत एक मोठा थोरला नवीन जातीचा मासा पोहत आहे हें पाहातांच त्यांना फार आनंद झाला. "आज मोटी शिकार साधणार" असं म्हणून त्यांनीं आपलं जाळं कांठाजवळच टाकलं आणि सूर्यसेनाला त्यांत पुरा गुरफटून घेऊन ते वर ओढूं लागले. सूर्यसेन सुटण्याकरतां धडपडूं लागला, तसा कोळ्यांना आणखीच जोर आला आणि या माशाची तडफड बंद करण्यासाठीं त्यांनीं त्याला जाळ्यांत चांगला आवळला आणि पाण्याच्या पृष्ठभागाजवळ बांधून ठेवला.

कोळी निघून गेल्यावर राजकन्या स्नानास आली. पाण्यांत उतरणार, इतक्यांत तिला तो जाळ्यांत गुरफटलेला मासा दिसला. दचकून ती मागं सरली. पाहाते तों मासा धडपड करून माणसाप्रमाण हांका मारतोय्! आतां मात्र ती घाबरली आणि स्नान न करतांच परतली.

एवंच पांचही राजपुत्रांचे राजकन्येला खूष करण्याचे प्रयत्न फिसकटले. एकावरही ती प्रसन्न झाली नाहीं. तेव्हां ते राजा मांडवरायाकडे गेले आणि सर्व हकीकत सांगून त्यांनीं राजाला विनंति केली, "महाराज. चालू कालमानाप्रमाणं आपण राजकन्येचं स्वयंवर जाहीर करावं. पण

लावावा. जो जिंकील त्याला आपली कन्या द्यावी. पण जर आपण असं न कराल तर आम्ही सगळे मिळून आपल्या राज्यावर चालून येऊं."

राजा म्हणाला, "तुम्ही म्हणतां हें उचित आहे. स्वयंवराची लवकरच तयारी करतों."

थोड्या दिवसांनीं स्वयंवराची मोठ्या थाटाची तयारी झाली. राजानं अटी जाहीर केल्या—"माझी मुलगी मांडवी खाद्यपदार्थ करण्यांत फार कुशल आहे. स्वयंवराच्या दिवशीं तुम्हां पांच राजपुत्रांना ती राजवाड्यांतच जेवावयाला बोलावील. जेवण्याचे तिचे नियम तुम्हीं पाळले पाहिजेत. तिनं आपल्या हातांनीं तयार केलेले रुचकर पदार्थ तुम्हांला वाढण्यांत येतील. तुम्हीं ते न टाकतां खाल्ले पाहिजेत. खातांना त्यांची स्तुति केली पाहिजे आणि राजकन्येचं स्वतःचं जेवण संपेपर्यंत तुम्हीं पानां-वरून उठतां कामा नये. सर्व अटी जो तंतोतंत पाळील त्याला मांडवी माळ घालील."

हा पण ऐकतांच राजपुत्र म्हणूं लागले, "यांत काय हो मोठा पराक्रम आहे? राजकन्येच्या सुंदर हातानं तयार केलेले मिष्ट पदार्थ मिटक्या मारीत खायचे आणि तिची तोंड भरून स्तुति करायची. यांत हो कसलं संकट? राजा तरी जरा वेडपटच दिसतो. अशानं म्हणावं, तुझ्या राजकन्येला पांच पांडवांची द्रौपदीच व्हावं लागेल."

स्वयंवराचा दिवस उजाडला. राजवाडयांतून निमंत्रणं आलीं. पांचही राजपुत्र आपआपल्या पालख्यांत बसून वाजत गेले. राजवाडयांतला थाट काय विचारावा? जिकडे तिकडे सोन्याचा चकचकाट, दिव्यांचा लखलखाट आणि अत्तरांचा घमघमाट. गुडघ्यापर्यंत पाय जातील असे गालिचे, रुजामे, चंदनाचे खांब, हिरेजडित मयूरासनं, अत्तरांचे दिवे. राजकन्येच्या दासी इकडे तिकडे हिंडत होत्या, त्यांचीं वस्त्रंभूषणं देखील अतिशय उंची दिसत होतीं. हें ऐश्वर्य पाहून राजपुत्रांचे डोळे दिपून गेले!

आसनावर बसतांच भीमसेनानं हातपाय धुण्यास पाणी मागितलं. त्याबरोबर एक दासी पुढं येऊन म्हणाली, "जरा थांबावं महाराज. पहिल्या प्रहराचा ठोका पडला म्हणजे पाणी मिळेल. तोंपर्यंत आपण सर्वांनीं सूर्यनमस्कार घालावे."

दोन तीनशें नमस्कार झाल्यावर कोठून तरी ढाण्ण्ण् असा तास वाजल्याचा आवाज आला. तेव्हां त्या सुंदर दासी हातांत सोन्याच्या झाऱ्या न् चांदीचीं तस्तं घेऊन धावत आल्या आणि त्यांनीं राजपुत्रांचे पाय गुलाबपाण्यानं धुतले. नमस्कार घालून दमलेला भीमसेन जरा प्रसन्न होऊन म्हणाला, "बरं आतां न्याहारीला गोरस आणा."

"दुसऱ्या ठोक्याला येईल महाराज. तोंवर आपण नागलोकांतील सर्व नागांचीं नांवं घ्यावीं." असं सांगून दासी निघून गेल्या.

दुसरा ठोका झाला. भीमसेनाची सारखी चुळबुळ चालली होती. शेवटीं एक दासी पांच सुंदर प्याले आटीव दुधानं भरलेले घेऊन आली. एका पेल्याचा एक घोट करून भीमसेन म्हणाला, "मी हंडाभर दूध घेत असतों."

"असं? मग चौथ्या ठोक्यापर्यंत थांबावं लागेल महाराज."

"अन् तोंपर्यंत आम्हीं काय करायचं?"

"छतावर रेशमानं भरलेल्या सगळ्या चिमण्या मोजाव्या महाराज."

"जेवण केव्हां?" भीमसेनानं अधीर होऊन विचारलं.

"नवव्या प्रहराच्या ठोक्याला. शिवाय नगारखान्यांतून ललकारी येईल."

जेमतेम चौथ्या ठोक्यापर्यंत भीमसेनानं दम काढला. स्वारी आधींच खादाड आणि त्यांतून सकाळपासून वाटीभर दुधापेक्षां पोटांत कांहीं नाहीं, त्यामुळं पोटांत कावळे काव काव करूं लागले. महालांत खाण्याचा एखादा जिन्नस सांपडेल म्हणून भीमसेनानं पुष्कळ कोने-कोपरे धुंडाळले, पण सुपारीचं एक खांडही तिथं मिळालं नाहीं. शेवटीं स्वारी चवताळली आणि एका दासीला हटकून म्हणाली, "अग ए

बया, एक ताट भरून साखरभात न् पन्नास पुरणपोळ्या घेऊन ये. मला आतां उपाशी राहावत नाहीं. हें तुमचं ठोकाठोकीचं प्रकरण कांहीं मला जमायचं नाहीं. तुमच्या राजकन्येच्या हातचं मला जेवणही नको. आणि तें स्वयंवरही नको."

दासीनं मुकाट्यानं त्यानं मागितलेले सर्व पदार्थ आणून त्याच्यापुढं ठेवले. स्वयंवराच्या चढाओढींतून भीमसेन अर्थातच बाद झाले.

बाकीच्या चौघांनीं कसाबसा नवव्या ठोक्यापर्यंत दम काढला. भूक वाढत चालली. तसतसा त्यांना एकेक प्रहर एकेका युगासारखा वाटूं लागला होता. शेवटीं तो ठोका एकदांचा पडला. त्याबरोबर नगारखान्यांतून शिंगाची ललकारी ऐकूं आली. महालांत मंजुळ वाद्यं वाजूं लागलीं. दोन नखशिखांत नटलेल्या दासींनीं येऊन वर्दी दिली, "पुष्पमहालांत जेवणाची तयारी आहे. असं इकडून यावं महाराज." त्याबरोबर अत्तराचे बोळे कानांत घालून चौघे राजपुत्र रुबाबांत डुलत डुलत त्या दासींच्या मागून चालूं लागले.

जेवणाचा थाट तसाच अपूर्व होता. सोन्याचीं ताटं, सोन्याच्या वाट्या, चंदनाचे पाट, चांदीचे चौरंग, रत्नांच्या रांगोळ्या, उदबत्त्यांचा घमघमाट, हात धुवायला गुलाबपाणी—आणखी असायचं तरी काय ?

राजपुत्र पाटावर बसले. राजकन्येच्या कांहीं मैत्रिणी समोरच्या चौरंगांवर बसलेल्या दिसल्या. अप्रतिम सौंदर्याचं प्रदर्शनच तें छोटंसं. सगळ्या हसतमुख न् बोलक्या.

पुन्हा ललकारी. राजकन्या आपलीं मंजुळ नूपुरं छुमछुम वाजवीत मंद पावलं टाकीत अंतःपुरांतून बाहेर आली आणि सर्वांना नमस्कार करून मधल्या रत्नजडित चौरंगावर बसली. पानांतल्या पदार्थांची चव काय विचारावी ? कितीही खाल्ले तरी तृप्ति व्हायची नाहीं. सगळ्या नागलोकांत राजकन्येच्या सुगरणपणाची ख्याति आहे ती उगीच नाहीं हें राजपुत्रांना कळून चुकलें. प्रत्येक पदार्थाची त्यांनीं मुक्त कंठानं प्रशंसा करायला प्रारंभ केला.

"वाहवा. अमरपुरीचं अमृतच जसं." आमटीचा भुरका मारीत सूर्यसेन म्हणाला.

"अन् हें रायतं पहा. प्रत्यक्ष श्रीविष्णूला देखील असं चाखायला मिळालं नसेल." कामसेन पांची बोटं रायत्यांत बुचकळून चोखीत म्हणाला. रायत्यांतली मोहरी झणाणल्यामुळं त्याच्या डोळ्यांतून पाणी येत होतं.

"ही कारल्याची भाजी देखील किती मधुर लागतेय. वा, वा." शूरसेन भाजीचा तोबरा भरून तो कसाबसा घशाखालीं ढकलीत उद्गारला.

"आणि मित्रांनो, ही गाजराची कोशिंबीर! गुलाबकळीसारखी लागते नाहीं ?" धीरसेन कोशिंबिरींत भाताचा घास कालवीत म्हणाला.

"आतां मुख्य पक्वान्न आणा बरं." राजकन्येनं दासीला सांगितलं.

मोठ्या उत्सुकतेनं राजपुत्र पाहातात, तों ती दासी एक परातभर खांडवी घेऊन बाहेर पडली. तरीपण आपला विरस बाहेर दिसूं न देतां प्रत्येकजण म्हणाला,

"वाहवा. खांडवी काय ? खांडवी म्हणजे अद्भुत मिठाई !"

"ए, ताटं भरून वाढा ग सगळ्यांना" राजकन्या गालांतल्या गालांत हसत म्हणाली. प्रत्येक राजपुत्रानं आपल्या पानांत खांडव्यांची रास घालून घेतली.

एक दोन खांडवीं खाऊन झालीं नसतील, तोंच सूर्यसेनाच्या तोंडांत कडाडकन् आवाज झाला. आणि "ओय ओय" करीत त्यानं आपलं गालफड आवळून धरलं.

"कां हो सूर्यसेन, असं तोंड आंबटसं केलंत ?" तिघांनीं विचारलं.

"कुठं ? कांहीं नाहीं. अशा लज्जतदार पदार्थाला आम्ही आंबट तोंड कसं करूं ? उलट ढेंकर येत होती ती दाबून ठेवली." असं म्हणत दांतांत उठलेल्या कळीकडे लक्ष न देतां सूर्यसेनानं आणखी दोन खांडव्यांचा बोकणा भरला. पण तो घशाखालीं उतरायच्या

अगोदरच पुन्हा विद्युल्लतेसारखा काडकन आवाज झाला ! विद्युत् वेगानं त्याचा हात दुसऱ्या गालफडाकडे गेला. खांडव्याचा घास त्यानं तसाच बाहेर काढला.

"मेलों रे मेलों. माझी दाढ. हाय. भयंकर कळ, छे छे–" असं ओरडत तो पानावरून उठला आणि गालांवर तसाच हात ठेवून, "राजवैद्य. अरे कुणी वैद्याला बोलवा रे." अशा हांका मारीत महालाच्या बाहेर पळत सुटला.

"माझ्या तोरड्यांची खीळ." राजकन्या हळूच आपल्या सखीला म्हणाली.

"इतके या गृहस्थाचे दांत खराब असतीलसं नव्हतं वाटलं." धीरसेन राजकन्येवर छाप पाडण्यासाठीं बोलला, "ज्याचा दांत ठिकाणावर राहात नाहीं त्याचं डोकं तरी कसं राहाणार ? वास्तविक किती सुंदर झालाय हा पदार्थ. नंदनवनांतल्या साऱ्या फळांची गोडी आलीय याच्यांत. पण नशिबांत हवा ना ? अरे बापरे ! आ आ—" काय झालं कुणास ठाऊक. त्यानं आपलं पाण्याचं भांडं उचलून पटकन तोंडाला लावलं.

"काय झालं एकाएकीं तुम्हांला धीरसेन ?" बाकीचे दोघे विचारू लागले.

"आ–आ–आ–म–म–" करीत धीरसेन घशावरून हात फिरवूं लागला. त्याला सांगायचं होतं कांहींतरी. पण तोंडांतून शब्द बाहेर पडत नव्हता.

"श्लोक म्हणताहेत वाटतं ?" कामसेन.

"असं दिसतं खरं. पण आवाज लागेल तेव्हां ना." शूरसेन हसत म्हणाला.

त्यांच्या शंका कुशंकांकडे लक्ष न देतां धीरसेनानं आणखी दोन खांडवीं कशींबशीं तोंडांत कोंबलीं. पण पुन्हा त्याच्या घशांतून चमत्कारिक आवाज निघूं लागले. शेवटीं नाइलाज होऊन "अ–आ–

ध-र्थ-टां टो-" असं कांही तरी ओरडत त्यानं पाण्याचा सबंध तांब्याच तोंडाला लावला, आणि जेवण तसंच टाकून स्वारी धूम म्हणत सुटली.

"सराट्यांचा प्रताप हा." राजकन्या खुदकन हसून सखीला म्हणाली.

राहातां राहिले दोघे. तेव्हां अधिक रवंथ कोण करतो आणि बेफाट स्तुति कोणाला सुचते यावर एक प्रकारची चढाओढच लागली त्यांच्यांत.

"धीरसेनाच्या नरड्यांत अडकलं वाटतं कांहीं-" शूरसेन.

"खांडवी. अमृततुल्य खांडवी."—कामसेन.

"खांडव्यांची उतरंड वाढा. खांडवडी खाऽऽतां मजा आला." शूरसेन गाऊं लागला. त्यांच्या पानांत लगेच खांडव्यांचे ढीग पडले.

"वाहवा. खावीं तशी रुचि वाढतच चाललीय यांची." कामसेन.

"फार मजेदार बुवा." शूरसेन.

"फार म्हणजे काय? फार फार फारच."

"अगदीं इंद्रानं हेवा करावा."

"इंद्राणीनं घास द्यावा."

"श्रीकृष्णाचं बालामृतच."

"नंदनवनांतला मकरंद."

"कामधेनूचा खरवस-ईईई—" कामसेन चमत्कारिक तोंड करीत ओरडूं लागला.

"कां हो? ईईई काय अन् एकदम वाईट तोंड कां करायला लागलांत?"

"उं हूं–उम्–" असे उद्गार काढीत आणखी दोन खांडवीं कामसेनानं तोंडांत चिणलीं. पण काय आश्चर्य, तीं तोंडांतच जाईनात. एका हातानं आपली हनुवटी धरून दुसऱ्या हातानं नाक वर ओढून त्यानं तोंड उचकटण्याचा प्रयत्न केला, पण तोंड कांहीं केल्या उघडेना. त्याची धडपड पाहून शूरसेनाला हसूं येऊं लागलें. तों तों कामसेनाचा



डोळे गरगरा फिरू लागले, चेहरा लाल झाला, तोंडावाटे फेस येऊ लागला. पण करतो काय बिचारा !

राग वाढत चालला. डोळे गरगरा फिरूं लागले, चेहरा लाल झाला. तोंडावाटे फेस येऊं लागला. पण करतो काय विचारा ! एकदां जी दांतखीळ बसली, ती कांहीं केल्या उचकटेना. जीव घाबरा झाला. तोंड वेडींवांकडीं, केविलवाणीं होऊं लागलीं. शेवटीं तो तसाच पाटावरून उठला आणि खालीं मान घालून, " उं उं आं आं " असे आवाज काढीत चालता झाला.

" वेलफळाचा मगज." राजकन्या पुन्हा हसून म्हणाली, " आतां वेखंडाचीं खांडं राहिलींत. जरा गंमत तर पहा."

पण तिचा हा अंदाज चुकला. मांडवीं करतांना तिनं त्यांपैकीं कांहींत तोरड्यांच्या खिळी, कांहींत सराट्यांचीं बोंडं, कांहींत वेलफळाचा मगज आणि कांहींत वेखंडाचे तुकडे घातले होते. यांपैकीं पहिल्या तीन वस्तूंनीं तिघां राजपुत्रांना चाटेला लावलं. आतां वेखंडाची घाण सहन न होऊन शूरसेनाचीही तीच गत होणार असं ती मनांत म्हणत होती. पण शूरसेनाला त्या दिवशीं जबर पडसं झालेलं होतं तें त्याच्या पथ्यावर पडलं. नाकांत असे दड्डे बसले होते, कीं वासाचं कांहींही ज्ञान त्याला होणं शक्य नव्हतं. त्यामुळं तोंडांत येणारीं वेखंडाचीं खांडं तो सुपारीच्या खांडासारखीं चावून फस्त करीत होता. तोंडानं स्तुतिपर बडबड एकसारखी चालू होतीच. शेवटीं जेवण्याचा कंटाळा येऊन राजकन्या उठली तरी आपला हा पठ्ठ्या जेवतोच आहे.

" वासाचं एक राहो. पण याचे दांत कसे टिकलेत अजुनी ? " ती मनांत म्हणाली.

अखेर शूरसेनानं पण जिंकला. मांडवीनं त्याला माळ घातली. लौकरच मोठ्या थाटानं दोघांचं लग्न झालं. चोंहीकडे आनंदी आनंद झाला.

* * *

"मांडवीनं आपल्या खांडव्यांत चार वस्तु घालण्याची जी युक्ति योजली तिची आठवण म्हणून बायका अजून खांडव्यांत चार चार बेदाणे घालतात, समजलास ?" मी भास्करला म्हणालों आणि आंचवण्या-करतां पानावरून उठलों. त्याचं पोट खांडवी खा खा खाऊन इतकं तट्ट फुगलं होतं, कीं तो जागच्या जागीं डुलक्या घेऊं लागला होता. आणि बेबीही सौ. च्या मांडीवर झोंपी गेली होती !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
95932
म. ग्रं. सं. ठाणे
क्र. 95932
IRBK-0115132


— वि. आ. बुवा